

ला माहीत असलेले —

# साधुसंत

— दत्तात्रय महादेव खेर

IRBK-0108196

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय जी चा
दा. क. ८१०६

3862

# मला माहीत असलेले

# साधुसंत

द. म. खेर

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
८७९९.
अनुक्रम
विभाग वा.वा.
नों. दि.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ८७२८ नों. दि
वि. वा. वा. क्र.

IRBK 0108196
IRBK-0108196

लोकमान्य प्रकाशन-पुणे

● सहायक
भा. द. खेर

● मुखपृष्ठ
नीलकंठ खेर

● पहिली आवृत्ति
२१ ऑक्टोबर १९६०

● मूल्य तीन रुपये

● प्रकाशक
सौ. कमल गोखले, बी. ए.
लोकमान्य प्रकाशन
२, नारायण पेठ,
पुणें २

● मुद्रक
ज. श्री. टिळक,
केसरी मुद्रणालय
५६८, नारायण पेठ,
पुणें २

ज्यांनीं माझ्या आध्यात्मिक
वृत्तीला सदैव चालना
दिली त्या माझ्या कर्तव्यदक्ष
वडील-मातुःश्रींच्या पवित्र
स्मृतीला सादर समर्पण

## आमचीं प्रकाशनें

- चारित्र्यदर्शन – श्री. भा. द. खेर
  मराठींतील एकमेव वैशिष्ट्यपूर्ण पुस्तक
- मला माहीत असलेले साधुसंत –
  श्री. द. म. खेर

## आगामी प्रकाशनें

- गंधाचे पट्टे ( खळबळजनक कादंबरी )
- कादंबरीमय महाभारत –
  ( अनेक भाग )
- महिपतीचा गोष्टीरूप भक्तविजय
- महाभारतांतील अमृतवाणी
- शूरा मी वंदिलें ( शूरांचें चरित्ररूप दर्शन )
- शंका-समाधान
- श्रीअष्टविनायकदर्शन

*लोकमान्य प्रकाशन, पुणें २*

## श्री. द. म खेर
यांचें प्रकाशित वाङ्मय

- किंग लियर
- टू जंटलमेन ऑफ व्हेरोना
  या नाटकांचा गोष्टीरूपानें मराठी अनुवाद

**संत चरित्रें :**

- गजानन महाराज – शेगांव
- गजानन महाराज गुप्ते – नाशिक
- माणिक प्रभु – माणिकनगर
- गुलाबराव महाराज – अमरावती
- माधवनाथ महाराज – चित्रकूट
- सिद्धारूढस्वामी – हुबळी
- मला माहीत असलेले साधुसंत

## दर्शनानुक्रम


❋ मनोगत

१. बिंदुमाधव ऊर्फ काका पुराणिक

२. बाबा वाईकर

३. सारंगे संन्यासी

४. हरिबुवा फलटणकर

५. भापकर महाराज

६. संतवृंद

❋ मांत्रिकांचे कांहीं चमत्कार.

## मनोगत

आज माझ्या वयाला ८६ वें वर्ष चालू आहे. आयुष्याच्या संध्यासमयीं अद्याप सारीं ज्ञानेंद्रियें कार्यक्षम आहेत. मानवी आयुष्याची अखेरी ठरलेली आहे. अज्ञाताच्या ओघांत सामावून जाणें हें सर्वसाधारण मानवी जीवनाचें सार असतें. पण याहिपेक्षां मानवी जीवनाचा भव्यतर अर्थ घेतला तर व्यक्तदर्शत—ज्ञात अशा ओघांत एकरूप होणें, हेंच खऱ्या मानवी जीवनाचें ध्येय आहे. ज्ञात अशा अवस्थेचा साक्षात्कार घडणें हें खरेंखुरें परमेश्वरी स्वरूपाचें दर्शन होय. प्रातःकालीं सारा पक्षीगण पूर्व दिशेला झेपावतो आणि संध्यासमयीं तोच पक्षीगण पश्चिम दिशेला धांव घेतो हा चमत्कार तुम्हीं कधीं जाणिवेनें बघितला आहे का? जीवित-समाप्तीची निश्चिति असून देखील केवळ अज्ञानानें पतंगानें दीपशिखेवर झडप घ्यावी, पक्षीगणानें प्रकाशाकडे झेपावें आणि मानवानें ज्ञातावस्थेकडे धांव घ्यावी या साऱ्या गोष्टींतून एकच प्राणि-प्रवृत्ति दृष्टोत्पत्तीस येते. प्रकाशाला मिळणें, ज्ञाताशीं मीलन करणें हाच प्राणिमात्राचा स्वाभाविक धर्म आहे. आज आयुष्याच्या अंतिमावस्थेंत मला अज्ञाताची मुळींच भीति वाटत नाहीं. संध्याछाया माझ्या अंतःकरणांत कातरावस्था मुळींच निर्माण करीत

नाहींत. उलट माझें मन याहि अवस्थेंत प्रकाशाकडे धांव घेतें. जें ज्ञात आहे त्याकडे मनाची ओढ जाते आणि म्हणूनच गतायुष्यांत जेथें जेथें मला प्रकाशाचे किरण दिसतात तेथें तेथें माझें मन विसांवतें. वयाच्या अडीच तीन वर्षांपासून आजपर्यंत माझ्या आयुष्यांत ज्या ज्या गोष्टी घडल्या त्यांचें स्मरण अद्यापहि कायम आहे, या गोष्टीचेंहि कारण तेंच आहे. त्या साऱ्या घटनांवर माझ्या स्मरणाचा प्रकाशझोत पडलेला दिसतो; आणि माझें मन त्या घटनांकडे आकर्षित होतें.

लहानपणापासूनच साधुसंतांचीं चरित्रें कानांवरून गेल्यामुळें माझ्या अंतःकरणांत एक प्रकारची दृढ श्रद्धा निर्माण झाली आहे. श्रद्धा हा मानवी जीवनांतील एक अलौकिक असा गुणधर्म आहे. एकदां का मानवी अंतःकरणांत श्रद्धा निर्माण झाली म्हणजे मग माणसाला कसलीहि भीति उरत नाहीं. उत्कट श्रद्धा आहे तेथें आज ना उद्यां परमेश्वरी साक्षात्कार ठेवलेलाच आहे. सुदैवानें अगदीं लहानपणापासून माझ्या अंतःकरणांत श्रद्धेचा उदय झालेला आहे. परमेश्वराचे जे अनन्य भक्त असतात त्यांच्या योगक्षेमाचा संपूर्ण भार परमेश्वर सांभाळीत असतो किंवा परमेश्वराच्या खऱ्या भक्तांचा विनाश कधींच होत नसतो या भगवान श्रीकृष्णांच्या वचनांवर माझी प्रगाढ श्रद्धा आहे; आणि ती श्रद्धा शतगुणित व्हावी, असे अनेक अनुभव मीं माझ्या दीर्घायुष्यांत घेतले आहेत.

इंग्रजी शाळेंत असतांना व पुढें कॉलेजमध्येंहि गुरुचरित्राचीं मीं अनेक पारायणें केलीं. अर्थात् त्या वेळीं तीं पारायणें ऐहिक कल्याण व्हावें याच उद्देशानें केलीं हें मान्य करणें भाग आहे. गुरुचरित्राचीं अनेक पारायणें केलीं खरी, पण वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत अमुकच एका देवतेची उपासना करावी, याविषयीं मनाचा कसलाच निश्चय झालेला नव्हता. देवळांत गेल्यावर तेथें जो देव दिसेल त्याला भक्तिभावानें नमस्कार करावा, यापेक्षां अन्य विचार मनांत कधींच येत नसे.

माझे वडील पुणें जिल्ह्यांत खेड तालुक्याला फडणीस होते. एकदां मे महिन्याच्या सुट्टींत मी खेडला गेलों होतों. एकें दिवशीं दुपारीं घरासमोरच्या पटांगणांत दगड फेकण्याचा खेळ खेळत असतांना सुपारीएवढा एक लहान दगड मी हातांत घेतला. तो थोडा गुळगुळीत लागला म्हणून मी लगेच घरांत गेलों आणि तो दगड स्वच्छ धुवून काढला. तेव्हां तो साधा दगड नसून ती गणपतीची सुंदर मूर्ति असल्याचें दिसून आलें. कठीण अशा तांबड्या दगडाची ती कोरीव

मूर्ति होती. कारागिरानें आपलें सारें कसब ती मूर्ति घडविण्यांत खर्च केलें होतें. मूर्तीची उंची तिच्या बैठकीसह पाऊण इंच व रुंदीहि जवळ जवळ तितकीच होती. मूर्ति इतकी लहान असूनहि तिचें कोरीव काम प्रमाणशीर होतें. मुकुट, चार हात, पैकीं दोन हातांत पाश आणि अंकुश, उरगयज्ञोपविताचा कंबरेभोंवतीं वेढा व बेंबीवर नागाची फणा वगैरे सर्व गोष्टी स्पष्ट कोरलेल्या होत्या. ती मूर्ति पाहून मला त्याहि वयांत परमावधीचा आनंद झाला.

संध्याकाळीं वडील घरीं आल्यावर ती मूर्ति मी त्यांना दाखविली. मूर्तीच्या सुंदर व रेखीव कोरीव कामाबद्दल सर्वांनाच मोठें कौतुक वाटलें. पुढें चतुर्थीच्या दिवशीं त्या मूर्तीची रीतसर प्राणप्रतिष्ठा केली व त्या मूर्तीची नित्य पूजा होऊं लागली. त्या मूर्तीबद्दल दिवसेंदिवस माझें आकर्षण वाढूं लागलें; आणि तेव्हां-पासून मला गणपतीची भक्ति जडली. त्या वेळीं माझें वय पंधरा वर्षांचें होतें.

माझी मुंज होण्यापूर्वींच माझ्या वडिलांनीं मला गायत्रीविरहित संध्या, गणपति अथर्वशीर्ष, पुरुषसूक्त आणि श्रीसूक्त शिकविलें होतें. मुंज झाल्यावर अथर्वशीर्ष, आणि दोन्ही सूक्तें मी नित्यनियमानें म्हणत असे. हाताशीं वेळ असला म्हणजे अथर्वशीर्षाचीं बरींच अवर्तनेंहि करीत असे. त्याचा फायदा दिसूं लागला. वयाच्या अकराव्या वर्षीं रुद्रहि शिकलों.

मी कॉलेजमध्यें असतांना माझ्या तेविसाव्या वर्षीं वडिलांनीं मला उपदेश दिला आणि गजाननाची उपासना दिली. आचरणाचे कांहीं नियमहि घालून दिले. ते सारे नियम मी आजपर्यंत कांटेकोरपणानें पाळीत आलों आहे. वडिलांनीं दिलेल्या उपासनेपासून अनेक लाभ आजवर माझ्या पदरांत पडलेले आहेत. उपासनेमुळें वृत्ति शांत व समाधानी झालेली आहे. तथापि जीवनांतील कर्तव्य मात्र मीं याहि क्षणीं सोडलेलें नाहीं.

मनाला पहिल्यापासूनच श्रद्धेचें बलिष्ठ अधिष्ठान असल्यामुळें संतसमागम घडावा अशी नेहमीच मला तीव्र इच्छा होई. परमेश्वरकृपेनें माझी तीहि इच्छा परिपूर्ण झालेली आहे. बिंदुमाधव ऊर्फ काका पुराणिक, केशवबुवा येवलेकर, सारंगे संन्यासी व भापकर महाराज या भगवद्भक्तांचा व योग्यांचा मला दीर्घकाळ सह-वास घडला. इतर संतांच्या हकीगती मला माझ्या वडिलांकडून व वडील बंधूं-कडून कळल्या. अर्थात् माझ्या मतें या साऱ्या संतकथा भरभक्कम पुराव्यावर

आधारलेल्या आहेत. केवळ 'चक्षुर्वैसत्यं' या पुराव्याखेरीज अन्य पुरावा न मानणाऱ्या वाचकांचा कदाचित् या पुस्तकांतील अद्‌भुत कथांवर विश्वास बसणार नाहीं; पण अशा वाचकांना केवळ वंदन करण्याखेरीज माझ्या हातांत तरी दुसरें काय आहे ?

भारतांत साधुसंतांनीं केलेल्या असंख्य चमत्कारांची अखंड परंपरा चालत आलेली आहे. बुद्धिवादी नि शास्त्रीय दृष्टीनें जरी बघितलें तरी त्यांचे ते चमत्कार सत्य नव्हते असें म्हणण्याचें धाडस कोणी करूं नये. त्यांच्या चमत्कारांचें सत्य पडताळून बघण्यासाठीं कांहीं पूर्वापार चमत्कारांची साक्ष काढणें वावगें ठरणार नाहीं. प्रत्येक युगायुगाच्या ठिकाणीं देवादिकांनीं नि संतमहात्म्यांनीं तत्सम चमत्कार करून दाखविले आहेत. सीताशुद्ध्यर्थ प्रभु रामचंद्र दक्षिण दिशेला निघाले होते; त्या दिशेनें जात असतांना, वृक्षाखालीं अदृश्य स्थितींत वावरत असलेल्या योग्यांना ते आलिंगन देत असत असें वर्णन आढळतें. आपलें भीमरूपी बळ एकवटून हनुमंतांनीं द्रोणागिरि पर्वत उचलून श्रीरामचंद्रांसमोर तो हजर केला. त्याच हनुमंतांनीं अंगुष्ठमात्र रूप धारण करून अशोकवनांत असलेल्या विरहाकुल सीतामाईंना राममुद्रा अर्पण केली. आपल्या ठायीं स्थिर असलेल्या सत्य नि धर्म या गोष्टी पणाला लावून भगवान् श्रीकृष्णांनीं अभिमन्यूच्या पुत्राला जिवंत केलें. तसेंच स्वकर्तव्याविषयीं भ्रांत झालेल्या अर्जुनाला निभ्रांत करण्यासाठीं त्याच श्रीकृष्णांनीं त्याला विश्वरूपदर्शनाचा चमत्कार करून दर्शविला. भगवान् विठ्ठलानें महाराचें रूप धारण करून भक्त दामाजीची आपत्तींतून सुटका केली. ज्ञानियांचा राजा ज्ञानदेव यांनीं रेड्याच्या तोंडांतून वेद वदविले. निर्जीव भिंतींत नि सच्चिदानंदबाबा यांच्या निर्जीव शरिरांत जीव ओतला. पतितांचा दीपस्तंभ नामदेव यांनीं दगडाच्या देवाला नैवेद्य खाण्यास भाग पाडलें. एका श्राद्धदिनीं 'आगंतव्यम्' हा शब्द म्हणतांच एकनाथांचे पितर स्वर्गांतून उतरून प्रत्यक्ष पानावर येऊन बसले. वैष्णवांच्या समुदायांत गरुड आसनावर आरूढ होऊन संत तुकाराम सदेह वैकुंठाला निघून गेले. गाणगापूरवासी श्रीनृसिंहसरस्वती स्वामी यांनीं ऐन दिवाळीच्या दिवशीं आपल्या भक्तांना अनेक रूपें धारण करून दर्शन दिलें. श्रीरामकृष्णांची तरी अवस्था काय झाली होती ? त्यांनीं देवालयांत जाऊन पहावें तों त्यांना श्रीजगदंबेची पाषाणमूर्ति दिसूच नये. तिच्या जागीं चिन्मयी माता अभयदान देत आहे असें दिसावें. त्यांच्याच नुसत्या शक्तिपूर्ण हस्तस्पर्शानें नरेंद्राची बाह्यसंज्ञा लोप पावली आणि तो एकदम ध्यानसिद्ध महापुरुष बनून 'विवेकानंद'

झाला. श्री. वासुदेवानंदसरस्वति नर्मदातीरीं परिभ्रमण करीत असतांना त्यांनीं एकदां वायुवेगानें आकाशांतून परिभ्रमण करून भक्तांना भेट दिली. नर्मदातीरीं असलेल्या अशाच एका साधूनें भंडाऱ्याच्या वेळीं तूप संपलें तेव्हां पाण्याचें तूप करून भंडारा साजरा केला.

हे नि असल्या प्रकारचे चमत्कार खोटे म्हणण्याचा वस्तुतः कोणालाच अधिकार नाहीं. मानवी मनाचें पूर्णत्व एकदां व्यक्त झालें म्हणजे असे अनंत चमत्कार जन्म पावतात. त्या चमत्कारांचें एक शास्त्र आहे. नियमबद्ध सामान्य सृष्टिरचनेप्रमाणें हे सारे चमत्कारहि निसर्ग-नियमांनीं बांधलेले आहेत. त्यानुसारच ते घडतात. अलौकिक अथवा निसर्गबाह्य अशी एकहि गोष्ट या विश्वांत घडून येत नाहीं; आणि याच दृष्टीनें संतांनीं केलेल्या चत्मकारांची संगति लावून बघणें मोठें उद्बोधक ठरेल.

या पुस्तकांत दिलेल्या माहितीपैकीं हरिबुवा व भापकर महाराज हे योगी होते; बिंदुमाधव ऊर्फ काका पुराणिकांवर ईश्वरी कृपा झालेली होती; बाबा वाईकर हे दत्तभक्त होते. काका पुराणिक यांचा संस्कृतचा अभ्यास नसतांना ते आपल्या तेराव्या वर्षी महाभारत, रामायण इत्यादि संस्कृत ग्रंथांतील गोष्टींवर अस्खलित पुराण सांगूं लागले. विद्यार्थिदशेंत मंदबुद्धि ठरलेला सारंगे संन्यासी हा विद्यार्थि आपल्या बाराव्या वर्षी कसलेल्या हरिदासाप्रमाणें कीर्तन करूं लागला, हे खरोखर असामान्य चमत्कार नव्हेत काय ?

या सत्पुरुषांपैकीं, काका पुराणिक यांचा व माझा सुमारें आठ-दहा वर्षे निकट सहवास होता. बाबा वाईकर, काऊ आक्का यांच्या हकीगती मला काकांकडून व थोरल्या बंधूंकडून समजल्या. भापकर महाराज यांचा नगर जिल्ह्यांतील कर्जत येथें सुमारें चौदा वर्षे जो सहवास घडून आला त्या अवधींत त्यांच्याविषयीं माहिती मिळाली. सारंगे संन्यासी हे पुणें येथें माझ्या लहानपणीं येत होते; आणि केशवबुवा येवलेकर हे प्रत्येक वर्षी जामखेड येथें आमच्या घरीं येऊन रहात असत. मुंबईलाहि ते आमच्या बिऱ्हाडीं येत असत. त्यांचाहि सहवास दहा-बारा वर्षे घडला. त्याचप्रमाणें व्यंकटशास्त्री द्रवीड यांच्या सहवासाचा लाभ पांच-सहा वर्षे मिळाला. या साऱ्यांचे चमत्कार मी या पुस्तकांत वर्णिले आहेत.

परमात्म्याला आपण 'बहु व्हावें' अशी इच्छा झाली (एकोऽहं बहुःस्याम्) आणि त्यानें ही सृष्टि निर्माण केली आणि यच्चयावत् स्थावर जंगम सृष्ट पदार्थांत

30.8.62 2482

त्यानें प्रवेश केला. कार्य आणि कारण अभेदरूप असतात यामुळें प्रत्येक सृष्ट पदार्थांत परमात्मशक्ति अंशमात्रानें वास करीत असते. अर्थात् ती मनुष्यमात्रांतहि आहेच. मनुष्यानें या शक्तीचा आपल्या ठायीं विकास केला असतां त्याला अलौकिक सामर्थ्य प्राप्त होत असतें आणि या सामर्थ्यामुळें त्याचीं कृत्यें लोकोत्तर अशीं होत असतात. ' नर करनी करे तो नरका नारायण हो जाय ' अशी एका संताची उक्ति आहे. नराचा नारायण होण्याला निरनिराळे मार्ग आहेत. उपासना, भक्ति, ज्ञान वगैरे मार्गांनीं मनुष्याला आपली आध्यात्मिक उन्नति करून घेतां येते. हे मार्ग जरी भिन्न असले तरी त्यांचें अंतिम ध्येय एकच आहे. कोणाला उपासनेनें, तर कोणाला भक्तीनें आणि कोणाला ज्ञानानें हें ध्येय गाठतां येतें. उपासना, भक्ति आणि ज्ञान यांना योगाची जोड असल्यावांचून हें ध्येय साध्य होत नाहीं. उपासनेंत, भक्तींत आणि ज्ञानांत धारणा आणि ध्यानाची आवश्यकता असते. त्यांचा आश्रय केल्यावांचून समाधिलाभ होणार नाही; आणि समाधीवांचून ईश्वराशीं तादात्म्य होत नाहीं.

ज्याप्रमाणें योग्याला त्याचप्रमाणें, उपासक, भक्त आणि ज्ञानी यांनाहि सिद्धींची प्राप्ति होत असते. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह हे यम आणि शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान हे नियम आहेत. या यमनियमांच्या परिपालनानें मनुष्याला कांहीं विशिष्ट सिद्धि प्राप्त होत असतात.

अहिंसाव्रताचें परिपालन केलें असतां मनुष्याची वृत्ति अहिंसामय बनते इतकेंच नव्हे तर तो आपल्या सभोंवतालीं अहिंसेचें वातावरण निर्माण करूं शकतो. वसिष्ठ ऋषींचा आश्रम घ्या किंवा जाबाली मुनींचा आश्रम घ्या, त्यांतील जनावरांनीं सुद्धां आपल्या नैसर्गिक वैराचा त्याग केला होता. या पुस्तकांतील विठोबाअण्णा कऱ्हाडकर यांनीं लंगडत असलेल्या वाघाला पाचारण करून त्याच्या पायांतील कांटा काढल्याचें उदाहरण आम्हीं या पुस्तकांत दिलें आहे. हा चमत्कार त्यांनीं केला तो अहिंसावृत्तीच्या जोरावरच केला. चिलवडी येथील अवलियाच्या झोपडीसमोर असलेल्या पटांगणांत मांजर आणि उंदीर एकमेकांबरोबर प्रेमानें खेळत असत असें लोकांनीं पाहिलेलें होतें. यावरून तेथील एकंदर वातावरण अवलियाबाबांनीं अहिंसामय करून टाकलें होतें हें उघड आहे.

सत्याची प्रतिष्ठा झाली म्हणजे मनुष्य जें जें म्हणेल तें तें खरें होत असतें. सत्यव्रती माणसाला वाचासिद्धि प्राप्त होत असते. फळ मिळविण्यासाठीं कोणा-

त्याहि एखादी क्रिया करावी लागते. पण ज्यानें सत्यव्रत पाळलेलें आहे अशा योग्यानें म्हटलें कीं, अमुक गोष्ट घडून येईल तर ती कोणतीहि क्रिया न करतां आपोआप घडून येते. त्याचप्रमाणें योग्याच्या चित्तांत अस्तेयवृत्ति प्रतिष्ठित झाली – अपहारबुद्धि समूळ नाहींशी झाली म्हणजे इच्छा न करतां साधनसंपत्ति त्याला प्राप्त होते.

अन्तःशुद्धि झाल्यानें चित्ताचें उपादानकारण जो सत्व गुण, त्यांतील रजस्तमोमल कमी कमी होत जाऊन त्याच्या योगानें मन प्रसन्न होतें; चित्ताची एकाग्रता साधूं लागते; इंद्रियें स्वाधीन रहातात; आणि या सर्व गोष्टी साधकाला अनुकूल झाल्यामुळें आत्मसाक्षात्कार होण्याची पात्रता त्याच्या अंगीं आपोआप येते. योग्याच्या चित्तांत संतोषवृत्ति पूर्ण बाणली म्हणजे अपरिमित सुखाची प्राप्ति होते. कोणत्याहि मनुष्यानें विद्यमान् स्थितींत संतोषवृत्ति कायम ठेवली तर त्याच्या गरजा परमेश्वर भागवीत असतो, असा अनुभव आहे. तपाचरणानें शरीर आणि इंद्रियें यांतील अशुद्धि नाहींशी होते; आणि त्यामुळें कांहीं कायसिद्धि आणि कांहीं इंद्रिय-सिद्धि योग्याच्या ठिकाणीं दिसूं लागतात.

स्वाध्याय या नियमामुळें स्वप्नांत, जागृतींत किंवा समाध्यवस्थेंत इष्टदेवतेचें दर्शन होतें, त्या देवतेशीं प्रत्यक्ष संभाषण होतें, तिचा साक्षात्कार घडतो किंवा तिचा अंगांत संचार होतो. मंत्रजपाचा अंतर्भाव स्वाध्यायांत होतो. सर्व कर्में ईश्वरार्पणबुद्धीनें करणें हें ईश्वरप्रणिधान होय. या योगानें समाधिमुळें प्राप्त होणाऱ्या सर्व सिद्धि भक्ताला प्राप्त होतात. योगदर्शनांत 'ईश्वरप्रणिधान' याचा अर्थ ईश्वरोपासना किंवा ईश्वरभक्ति असाहि होतो.

यमनियमांमुळें योग्याला ज्या सिद्धींची प्राप्ति होते त्या वर दिल्या आहेत. प्रत्याहारानें मनुष्य आपल्या इंद्रियांवर पूर्ण ताबा ठेवूं शकतो, संयमजयामुळें पूर्ण ज्ञान ( प्रज्ञालोक ) प्राप्त होतें. निरोध, समाधि व एकाग्रता यांच्या परिणामामुळें भूत-भविष्यकाळाचें ज्ञान होतें. पूर्वसंस्कारांच्या ज्ञानामुळें पूर्वजन्माचें ज्ञान होतें. कंठकूपावर संयम केला असतां तहान व भूक यांचें निवारण होतें. सहस्त्रार चक्रावर संयम केला असतां सिद्ध दर्शन होतें. हृदयावरील संयमानें मनोगताचें ज्ञान होतें. सर्वज्ञता व प्रतिभा यांच्या योगानें दिव्यध्वनि, दिव्यस्पर्श, दिव्यरूप, दिव्यास्वाद आणि दिव्यगंध यांचा अनुभव येतो. उदान वायूच्या जयानें, पाणी, चिखल कांटे

इत्यादिकांना स्पर्श न होतां तरंगत जातां येतें. समान वायूवर जय मिळविला असतां शरीर तेजोमय होतें. शरीर आणि आकाश यांचा जो संबंध आहे त्यावर संयम केल्यानें शरीर कापसासारखें हलक होतें आणि त्या योगानें मनुष्याला आकाशगमन करतां येतें.

स्थूल, स्वरूप, सूक्ष्म, अन्वय आणि अर्थवत्व या पांच अवस्था भूतांच्या ठिकाणीं आहेत. त्यांच्यावर क्रमानें संयम करून त्यांचा जय झाला असतां भूत जय होतो; आणि भूतजयापासून योग्याच्या ठिकाणीं अणिमादि अष्ट महासिद्धि प्रगट होऊं लागतात. अणिमा, लघिमा, महिमा, गरिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व आणि वशित्व या त्या अष्टमहासिद्धि होत.

या सिद्धि प्राप्त झाल्या असतां योगी आपलें शरीर अणूप्रमाणें अत्यंत लहान किंवा त्याच्या इच्छेप्रमाणें वाटेल तेवढें मोठें करूं शकतो. तसेंच तो तें अत्यंत जड किंवा कापसासारखें अत्यंत हलकें करूं शकतो. योग्याला 'प्राप्ति' नांवाची सिद्धि प्राप्त झाली असतां तो बसल्या ठिकाणाहून अतिशय दूर असलेल्या वस्तूला आपल्या हाताच्या बोटांनीं स्पर्श करूं शकतो. योगी आपल्या इच्छेप्रमाणें गोष्टी घडवून आणण्याचें सामर्थ्य 'प्राकाम्य' सिद्धीनें संपादन करूं शकतो. सर्व सृष्ट वस्तूंवर सत्ता चालणें हें ईशित्व होय, आणि योग्याच्या इच्छे-प्रमाणें सर्व भूतें त्याला वश होऊन रहाणें हें वशित्व होय.

इंद्रियजयामुळें मनाच्या वेगानें जाणें, कोणत्याहि काळांतील किंवा देशांतील विषयांचें इंद्रियाच्या मध्यस्थीवांचून सेवन करणें, आत्मज्ञानानें सर्व वस्तूंवर सत्ता आणि सर्व वस्तूंचें ज्ञान, या गोष्टी योग्याला साध्य होतात.

पातंजलयोगदर्शनांत ज्या सिद्धींचा विचार केला आहे त्यांपैकीं आवश्यक अशा सिद्धि वर नमूद केल्या आहेत. हेतु इतकाच कीं, सामान्य जनतेला सिद्धि म्हणजे काय याची थोडी कल्पना यावी. मानवी मन अत्यंत चंचल आहे. त्याच्या गतीचें मोजमाप करणें अशक्य. अभ्यास आणि वैराग्य यांच्यामुळें तें ताब्यांत आणतां येतें असें भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनाला सांगितलें आहे. चित्तवृत्ति-निरोध अभ्यास आणि वैराग्य यांनीं होतो असें पतंजलिमुनीहि योगदर्शनांत सांगतात. मनाची एकाग्रता झाली म्हणजे त्याची शक्ति वाढते आणि अखेरीस तें जीवशिवाचें ऐक्य घडवून आणण्यास कारणीभूत होतें. उपासना, भक्ति अथवा

योग या मार्गांत मनुष्यानें पहिलें पाऊल टाकल्यापासून तों आत्मसाक्षात्कार होईपर्यंत, मनुष्याच्या संवेगाप्रमाणें त्याला त्याच्या मार्गांत कमीअधिक शक्ति — सिद्धी प्राप्त होत असतात व सामान्य माणसाला आश्चर्यचकित करणारीं कृत्यें त्याच्याकडून घडूं लागतात. भौतिक शास्त्रांनीं अशा चमत्कारांची उपपत्ति लागणें शक्य नाहीं. कारण भौतिकशास्त्र स्थूल जगाविषयीं विचार करतें तर अध्यात्मशास्त्र मनुष्याला अंतर्मुख करून सूक्ष्मांत प्रवेश करायला लावतें.

या पुस्तकांत साधुसंतांचीं समग्र चरित्रें दिलीं नसून त्यांच्या चरित्रांतील ज्या ज्या हकीगतींची मला माहिती होती तेवढीच दिली आहे. या साधुसंतांचे जे चत्मकार मला कळले तेवढेच मी नमूद केले आहेत. कोणत्या सिद्धींच्या बळावर त्यांनीं हे चमत्कार केले हें समजण्यासाठीं योगदर्शनांतील आवश्यक अशा सिद्धींची यादी मागें दिली आहे. सर्वच सिद्धि उपासकाला, भगवद्भक्ताला किंवा योग्याला मिळतील असें नाहीं.

काका पुराणिक यांच्यावर ईश्वरकृपा झाली होती त्यामुळें त्यांना पौर्वदेहिक अभ्यासाचें स्मरण होऊन ते या जन्मीं अभ्यास न करतां आपल्या तेराव्या वर्षी पुराण सांगूं लागले. सारंगे संन्यासी यांचाहि गायन-वादन-कीर्तनाचा अभ्यास पूर्वजन्मीं झालेला असला पाहिजे. जो मुलगा आपल्या बाराव्या वर्षापर्यंत मराठी दुसऱ्या इयत्तेतहि यश मिळवूं शकला नाहीं तो एकदम सुंदर गायन करून उत्कृष्ट कीर्तन करतो याचा अर्थ काय? गोपाळबुवांच्या कृपेनें त्याच्या पूर्वजन्मांतील संस्कार जागृत झाले असें मानल्यावांचून गत्यंतर नाहीं. भक्तानें उत्कट भक्तीनें देव आपलासा करून घेतला असतां तो सदैव आपल्या भक्ताच्या पाठीशीं असतो. बाबा वाईकरांच्या वडिलांजवळ खंडोबाच्या नवरात्राचा उत्सव करण्याला एक पैहि नव्हती यामुळें नवरात्राचा उत्सव टळूं पहात होता. अशा वेळीं उत्सवाच्या खर्चासाठीं प्रत्यक्ष खंडोबानें मार्तंडरावांच्या वेषानें बाबा वाईकरांच्या आईला पांच रुपये नेऊन दिले होते. आबाजीबुवा पुराणिक यांनीं सातपुड्यांतील भिल्लांना आपलें सर्वस्व अर्पण केलें आणि आपली समाधान वृत्ति मावळूं दिली नाहीं. यामुळें भिल्लांनीं त्यांना त्यांचा माल देऊन टाकलाच; शिवाय एक हजार एक रुपये अर्पण केले. हें संतोषवृत्तीचें उदाहरण आहे. बाबा वाईकरांना प्रत्यक्ष दत्तदर्शन रोज होत होतें हा मंत्रप्रभाव होय. तसेंच ते अरण्यांत वाट चुकले असतांना गरूडपक्षी

येऊन त्यानें आपल्या पंखाच्या सावलीनें त्यांना मार्गदर्शन केलें ही गोष्ट केवळ दत्तकृपेनेंच घडली असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. काऊअक्कांना अतीत अनागत ज्ञान असल्याशिवाय त्यांनीं आमच्या बंधूंना संध्याकाळीं फिरावयास जाऊं नकोस असें सांगितलें नाहीं. हा इशारा दिल्यानंतर संध्याकाळीं गांवावर सुमारें दीडशें लोकांचा दरोडा आला. काऊअक्कांना हें ज्ञान उत्कट अशा दत्तभक्तीनें झालेलें होतें. विठोबाअण्णा कऱ्हाडकर यांच्या चित्तांत अहिंसावृत्तीची सुप्रतिष्ठा झालेली होती. म्हणूनच त्यांनीं निर्धास्तपणें वाघाच्या पायांतील कांटा काढला; आणि वाघहि एखाद्या माणसाळलेल्या जनावराप्रमाणें त्यांना उपद्रव न देतां मुकाट्यानें आपल्या वाटेनें निघून गेला. यशवंतराव महाराज ऊर्फ देव मामलेदार यांना ईश्वरप्रणिधानानें सिद्धींची प्राप्ति झालेली होती. आमच्या वडिलांचे गुरु यज्ञेश्वर दीक्षित. त्यांनीं मंत्रसामर्थ्यानें ( स्वाध्याय ) आपल्या बायकोचें कोड एकवीस दिवस अनुष्ठान करून घालविलें. आमच्या बंधूंचे गुरु व्यंकटशास्त्री द्रवीड यांना देवीची कडकडीत उपासना होती. या उपासनेच्या जोरावर त्यांना भविष्य-ज्ञान प्राप्त झालेलें होतें. यामुळेंच त्यांनीं आमच्या बंधूंना त्यांच्या नेमणुकीची तारीख सांगितली व पानसे मास्तर यांना त्यांच्या रकमा कोणकोणत्या दिवशीं येतील तें अचूक सांगितलें होतें. गणपतिबुवा म्हसकर यांना आपलें दारिद्र्य नष्ट व्हावें अशी तीव्र इच्छा निर्माण झालेली होती, यामुळें मोरगांवीं फक्त एकवीस दिवसांतच त्यांना उपासनेनें सिद्धि प्राप्त झाली आणि त्यांचा कार्यभाग झाला. एकवीस दिवसांच्या उपासनेनें त्यांचें जन्माचें दारिद्र्य नष्ट झालें. भापकर महाराज योगी होते. त्यांना उदान वायूवर जय मिळाला होता. त्याचप्रमाणें शरीर आणि आकाश यांचा जो संबंध त्यावर संयम करून वाटेल तेव्हां ते आपलें आसन अधांतरीं ठेवीत. त्यांनीं भूतजयादि बऱ्याच सिद्धि मिळविल्या होत्या. हरिबुवा फलटणकर यांना अणिमा, महिमा, भूतजय, क्षुत्पिपासानिवृत्ति इत्यादि बऱ्याच सिद्धि प्राप्त झाल्या होत्या. त्यांच्या बळावर ते टेंभुर्णी येथील एका दुकानांत त्यांना कोंडून ठेवलें असतांना तेथून ते नाहींसे झालें. त्यांना तुरुंगांत कुलूप लावून ठेवलें असतां तेथून ते एक-दोन वेळां तुरुंगाच्या बाहेर आले. हरिबुवांनीं आपलें आडवें-उभें अंग वाढवून विष्णुदास नागराला मोठा चमत्कार दाखविला. एक दोन मुलें जन्मतःच पांगळी असतांना त्यांना चालायला लावलें. असे अनेक प्रकारचे चमत्कार त्यांनीं केले.

तात्पर्य, या पुस्तकांत ज्या साधुसंतांचें वर्णन दिलें आहे त्यांच्या अंगीं निरनिराळ्या सिद्धि वास करीत होत्या व त्यांच्या अलौकिक सामर्थ्यामुळें भक्तगण त्यांच्या सभोंवतालीं गोळा होत होता. त्यांनीं कधीं बुवाबाजी केली नाहीं, फसवा-फसवी केली नाहीं, कोणाकडून कशाची अपेक्षा केली नाहीं आणि अखेरपर्यंत आपले देह परोपकारार्थ झिजवून, या जगांतून ते देहरूपानें निघून गेले, तरी कीर्तिरूपानें मागें उरले.

जातां जातां दोन शब्द सांगायचे राहिले ते सांगून हें मनोगत पुरें करतों. कांहीं लोक शाबरी मंत्रांच्या योगानें पेढे, बर्फी, फुलें, बुक्का इत्यादि वस्तु काढीत असतात. त्यांपैकीं कांहीं मांत्रिक आपण सत्पुरुष आहोंत असा बहाणा करतात व लोकहि त्यांना सत्पुरुष समजतात. परंतु शाबरी मंत्रासारख्या गौण मंत्रांनीं क्षुद्र देवता अनुकूल करून घेऊन त्यांच्या द्वारां कोणतीहि वस्तु आणविणें आणि योगबळावर वस्तु निर्माण करणें या दोन गोष्टींत जमीनअस्मानाचा भेद आहे. शाबरी मांत्रिक कैवल्याकडे धांव घेत नसतात. उपासक, भक्त किंवा योगी यांचें अंतिम ध्येय मोक्ष किंवा कैवल्य हें असतें. मांत्रिक हे सत्पुरुष किंवा संत असतात असा कोणाचा गैरसमज होऊं नये म्हणून मांत्रिकांच्या चमत्कारांविषयीं एक परिशिष्ट या पुस्तकाला शेवटीं जोडलें आहे.

केवळ स्वानुभवाच्या बळावर या संतकथा मीं वाचकांसमोर ठेवल्या आहेत. मला माहीत असलेल्या साधुसंतांचें हें गुणरूपदर्शन वाचकांनीं गोड करून घ्यावें हीच विज्ञप्ति.

२ नारायण पेठ, पुणें २ — द. म. खेर
विजयादशमी, शके १८८२

: १ :

# बिंदुमाधव ऊर्फ काका पुराणिक

* * * * * * * * * * * *

ज्या मुलाचें संस्कृतचें धड अध्ययनहि झालें नाहीं अशा मुलाला जर दत्ताचा दृष्टान्त झाला कीं, " तूं पुराण सांग " आणि तो मुलगा जर एखाद्या संस्कृत पंडितासारखा घडाघड पुराण सांगूं लागला तर तुम्हांला काय वाटेल ? तुम्हांला आश्चर्य वाटेल आणि कदाचित् त्या गोष्टीवर तुमचा विश्वासहि बसणार नाहीं. पण ही गोष्ट प्रत्यक्ष घडलेली आहे आणि त्या अधिकारी व्यक्तीशीं माझा अगदीं निकटचा संबंध आला आहे.

आज त्या गोष्टीला ७८ वर्षें उलटून गेलीं तरी साऱ्या गोष्टींचा चित्रपट आजहि माझ्या दृष्टीसमोरून जशाचा तसा सरकत आहे. वृद्धावस्थेंत माणसाची स्मृति क्षीण होते असें म्हणतात. ती गोष्ट कांहीं अंशीं खरीहि असेल. परंतु अशाहि अवस्थेंत ज्या ज्या घटनांनीं माणसाच्या मनावर सखोल संस्कार उमटविलेले असतात अशा घटना वृद्धापकालांत देखील मनावरून कधीं पुसून जात नाहींत. आतां हेंच पहा. ७८ वर्षांपूर्वींच्या घटना मला जशाच्या तशा स्मरतात. त्या घटनांतून गुंफलेल्या व्यक्ति आजहि मला स्पष्ट दिसतात. त्या वेळीं मी फार तर सात-आठ वर्षांचा असेन. त्या सुमारास माझी मुंज झालेली मला पक्की स्मरते आणि त्याच सुमारास घडलेल्या साऱ्या घटना व ऐकलेल्या साऱ्या साऱ्या गोष्टी मला पक्क्या आठवतात.

आम्ही त्या वेळीं पुण्यांत तांबड्या जोगेश्वरीच्या बोळांत पुराणिकांच्या वाड्यांत रहात होतो. घराचा क्रमांक ८५ होता हीहि गोष्ट माझ्या स्मृतींतून

गेलेली नाहीं. त्या घराच्या ओट्यावर गणपतीचें देऊळ होतें. त्यानंतर लक्ष्मीरोड झाला तेव्हां तें देवालय ऐन रस्त्यावर येऊन उभें राहिलें. म्हणजे घराचा ओटा गेला आणि गणपति मात्र जेथल्या तेथेंच राहिला. पुढें पुण्यांत अनेक परिवर्तनें होत चाललीं, सुधारणा होऊं लागल्या आणि मग ऐन रस्त्यावर उभ्या असलेल्या त्या गणपतीच्या देवालयाचा माणसांना अडथळा होऊं लागला. पुढें श्री. बर्वे हे पुण्याला म्युनिसिपल कमिशनर म्हणून आले आणि त्यांनीं पुण्याचा कायापालट केला तो इतका कीं, जुन्या मंडळींना लक्ष्मीरोडवरील गणपति एकदम दिसेनासा झाला. त्या वृद्ध मंडळींनीं जेव्हां सभोंवार नजर टाकली तेव्हां जवळच एका कोंपऱ्यांत देवालय बांधून त्या ठिकाणीं त्या विघ्नहर्त्याची प्रस्थापना केलेली दिसली. अशा तऱ्हेनें रहदारीला येणारें विघ्न विघ्नहर्त्याच्या उच्चाटनानें माणसांनीं दूर केलें होतें. देवांची देखील बदली होते ही गोष्ट मला त्या वेळीं समजली.

रस्तारुंदीमुळें पुराणिकबुवांचें घरहि आतां बरेंच मागें हटलें होतें. आज त्या घराच्या दर्शनी बाजूला तुम्हांला दुकानें थाटलेलीं दिसतील. ७८ वर्षांपूर्वी त्या घराची मालकी बिंदुमाधव पुराणिक यांच्याकडे होती. त्यांना सर्व लोक काका पुराणिक म्हणत. हे मूळचे नाशिक जिल्ह्यांतील नगरसूल या गांवचे रहाणारे. हें गांव सोडून पुराणिकांचें कुटुंब पुण्यांत नेमकें केव्हां आलें हें कळण्यास मार्ग नाहीं; परंतु काकांच्या नेहमींच्या बोलण्यावरून १८४८ सालच्या सुमारास काका व त्यांचे वडील बंधु आपला गांव सोडून पुण्याला आले असें मानण्यास हरकत नाहीं.

वडील बंधूंजवळ काकांचें त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें शिक्षण झालें. वयाच्या तेराव्या वर्षी काका रूपावलि व समासचक्र यांचें शिक्षण घेत होते. वासुदेवशास्त्री पर्वतीकर हे काकांचे परमस्नेही असून त्यांचे सहाध्यायी होते. दोघेहि अत्यंत भाविक आणि दत्तभक्त. अध्ययन करावें आणि परमेश्वरसेवेंत निमग्न असावें एवढाच या उभयतांचा व्यवसाय होता.

एकें दिवशीं या उभयतांनीं असा विचार केला कीं, दत्ताची सेवा करण्यासाठीं कुरगड्डीला जावें. कुरगड्डी म्हणजे पूर्वीचें कुरवपूर. हें गांव कृष्णेच्या कांठीं आहे. ज्यांनीं गुरुचरित्र हा प्रासादिक ग्रंथ वाचला असेल त्यांना कुरवपूर या गांवाचें नांव नवीन वाटणार नाहीं. गुरुचरित्रांतील पहिल्या नऊ अध्यायांत श्रीपाद श्रीवल्लभांच्या अवतारकृत्यांचें वर्णन आलेलें आहे. श्रीपाद श्रीवल्लभांचा हा अवतार याच कुरवपुरांत झाला. याच कुरवपुरांत या दोन स्नेह्यांनीं दत्तसेवेला जाण्याचें ठरविलें.

भक्तिभावानें प्रेरित होऊन कोणालाहि न कळवितां काका पुराणिक आणि त्यांचे स्नेही कुरगड्डीला पळून गेले. त्याच वेळीं महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांचे गुरु आळंदीचे श्रीनृसिंहसरस्वति स्वामी हे कुरगड्डी येथें कृष्णानदीच्या वाळवंटांत स्वस्थ पडून होते. श्रीनृसिंहसरस्वतींचा अधिकार फार मोठा होता यांत कांहींच शंका नाहीं. महर्षि पटवर्धन यांनीं त्यांना गुरुस्थानीं लेखलें होतें यावरून त्यांच्या अधिकाराची कल्पना करतां येईल. कुरगड्डीला गेल्यानंतर त्या ठिकाणीं स्वामी महाराजांच्याजवळच हे दोघेहि मित्र वाळवंटांत तेरा दिवस पडून राहिले. पांडुरंगाला कौल लावून तुकाराममहाराजहि इंद्रायणीच्या तीरावर असेच तेरा दिवस निर्धारानें पडून राहिले नव्हते का? जुन्या लोकांच्या ठायीं अपार श्रद्धा नांदत असे म्हणूनच परमेश्वर त्यांच्य पाठीशीं उभा रहात होता, ही गोष्ट खरी वाटूं लागते. त्या लोकांना श्रद्धेचा महिमा पुरता माहीत होता आणि श्रद्धावान् भक्तांना निश्चित फलप्राप्ति होत असते या श्रीकृष्णांच्या वचनावर त्यांचा पुरेपूर विश्वास होता. दत्तमहाराजांची आपल्यावर कृपा व्हावी यासाठीं काका पुराणिक आणि वासुदेवशास्त्री त्या वाळवंटांत तेरा दिवस पडून राहिले ते याच दृढ विश्वासानें !

या जगांतील श्रद्धा आजपर्यंत कधीं वायां गेली नाहीं हीच गोष्ट खरी! बरोबर तेराव्या दिवशीं रात्रीं काकांना दृष्टान्त झाला. "तूं पुराण

सांग ” असा आदेश त्यांना त्या दृष्टान्तांत मिळाला. “ तूं नैयायिक हो ” असा आदेश वासुदेवशास्त्री यांना मिळाला. दत्ताच्या कृपेसाठीं हे दोघे मित्र कुरगड्डीला आले होते. त्यांच्यावर दत्ताची कृपा झाली होती. प्रभूचा प्रसाद मिळाल्यानें उभयतांना धन्यता वाटली होती. कुरगड्डीला आल्याचें सार्थक झालें होतें. तो प्रभु-प्रसाद पदरांत पडल्यानंतर हे दोघे मित्र पुण्यास परतले.

आपलें संस्कृतचें अध्ययन अद्याप पुरें झालें नाहीं आणि “ तूं पुराण सांग ” असा दृष्टान्त तर झाला; पण अध्ययनावांचून पुराण कसें सांगतां येईल याविषयीं काका साशंक झाले; आणि न्यायशास्त्राची कसलीहि माहिती नसतांना “ तूं नैयायिक हो ” असा दृष्टान्त झाल्यानें वासुदेवशास्त्री गोंधळून गेले. पण दोघांचीहि दृष्टान्तावर परमावधीची श्रद्धा होती. दत्तप्रभूविषयीं दोघांच्याहि अंतःकरणांत पराकाष्ठेची भक्ति होती. त्यामुळें दृष्टान्त झाल्याप्रमाणें सारें कांहीं घडणार याच विश्वासानें हे दोघे मित्र पुण्याला परतले.

त्या वेळीं पुण्यांत बेलबागेंतील विष्णुमंदिरांत पुराणिकाची जागा रिकामी झाली होती. या जागेवर बिंदुमाधव पुराणिक यांची नेमणूक करावी, असा बेलबाग संस्थानच्या कारभाऱ्यांना दृष्टान्त झाला. त्या दृष्टान्तानुसार बेलबागेचे कारभारी काकांचा शोध करीत त्यांच्या घरीं आले. काकांना पाहून कारभाऱ्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. कारण काकांचें वय त्या वेळीं अवघें तेरा वर्षांचें होतें. रूपावलि, समासचक्रहि पुरें झालें नव्हतें. अशा स्थितींत हा मुलगा काय पुराण सांगणार असें वाटून कारभारी आल्या पावलीं घरीं परतले. रात्रीं झोपल्यावर कारभाऱ्यांना पुन्हां तोच दृष्टान्त झाला. “ पुराणिक म्हणून बेलबागेंत बिंदुमाधवची नेमणूक करा ” असा आदेश कारभाऱ्यांना पुन्हां मिळाला. बेलबागेंत पुराण सांगणें ही गोष्ट कांहीं साधी नव्हती. नाना फडणविसांचें हें संस्थान. त्या संस्थानची

प्रतिष्ठा फार मोठी होती; आणि त्या ठिकाणीं पुराण सांगणारे पूर्वीचे सारे पुराणिक विद्वान् होते. त्या जागेवर आतां या तेरा वर्षांच्या पोराची नेमणूक करायची म्हणजे पोरखेळ करण्यासारखेंच होतें. पण कारभाऱ्यांना एकदां नव्हे तर दोनदां तसा दृष्टान्त झाला होता. त्या दृष्टान्तांतील आदेश धुडकावून लावणें ही गोष्ट त्यांना शक्य नव्हती.

बेलबागेचे कारभारी पुन्हां काका पुराणिक यांच्या घरीं निमूटपणानें आले आणि आजपासून बेलबागेंत पुराण सांगा, असें निमंत्रण देऊन निघून गेले. त्या दिवशीं तिसऱ्या प्रहरीं काका बेलबागेंत गेले आणि खरोखरच तेथील पुराणिकाच्या व्यासपीठावर जाऊन स्थानापन्न झाले. तेथें असलेलीच पोथी त्यांनीं सोडली आणि पुराण सांगण्यास प्रारंभ केला. त्या तेरा वर्षांच्या मुलानें सुमारे दोन तास त्या दिवशीं पुराण सांगितलें. सारा श्रोतृगण अगदीं थक्क होऊन गेला. काकांच्या मुखांत जणुं सरस्वतीच अवतीर्ण झाली आहे असा भास सर्वांना झाला. बेल-बागेचे कारभारी तर अगदीं चकित होऊन गेले. त्या दिवशीं त्यांनीं या मुलाचें तोंडभरून कौतुक केलें आणि सारी मंडळी आपल्या मनांत आश्चर्य वागवीत घरोघरीं परतली. तेव्हांपासून काकांनीं पुढें ५३ वर्षें म्हणजे त्यांच्या वयाच्या ६६ व्या वर्षापर्यंत बेलबागेंत श्रीमहाविष्णूपुढें पुराण सांगितलें व श्रोत्यांचीं मनें त्यांनीं अखेरपर्यंत जिंकलीं.

काकांच्या श्रोतृगणांत मीहि अनेक वेळां बसलेला असे. मी त्या वेळीं लहान होतो. उत्कृष्ट वक्त्याचे गुण काय असतात हें मला त्या वयांत ठाऊक नव्हतें. तथापि एखाद्या धबधब्याचें पाणी पडावें अशी काकांची अस्खलित वाणी होती आणि त्या त्यांच्या वाक्गंगेंत सारा श्रोतृगण तल्लीन होऊन जाई, ही गोष्ट मी स्वतः डोळ्यांनीं पाहिली आहे. काकांच्या बालपणच्या गोष्टी मला अर्थात् ऐकून माहीत होत्या. दत्ताची सेवा करण्यासाठीं काका पुराणिक आणि त्यांचे स्नेही वासुदेवशास्त्री कुरगड्डीला

कसे गेले, त्या ठिकाणीं श्रीनृसिंहसरस्वती स्वामींच्या सान्निध्यांत कृष्णा नदीच्या वाळवंटांत ते तेरा दिवस कसे पडून राहिले, त्यांना तेराव्या दिवशीं " तूं पुराण सांग " असा दृष्टान्त कसा झाला व नंतर पुण्यांत आल्यावर बेलबागेंत पुराणिक म्हणून त्यांची कायम नेमणूक कशी झाली ही सारी हकीगत मी प्रत्यक्ष काकांच्या तोंडांतून अनेकवार ऐकलेली आहे. काका जेव्हां तो सारा इतिहास कथन करीत तेव्हां त्या इतिहासांत कांहीं कच्चे दुवे आहेत, असें मला कधींहि वाटलें नाहीं. कारण पुराणिक म्हणून काकांची चांगलीच ख्याति प्रस्थापित झालेली होती आणि त्या त्यांच्या महिम्याला साजेशी त्यांची अस्खलित वाणी मी प्रत्यक्ष ऐकली होती. काकांचा अधिकार मोठा होता याबद्दल मला कसलीहि शंका नव्हती.

माझ्या आठवणींत अनेक लोक काकांच्याकडे येत आणि शंका-समाधान पावून परत जात. संस्कृतचें अध्ययन करण्यासाठीं कांहीं विद्यार्थी येत. काका त्यांच्याकडून कांहींहि घेत नसत. उलट अत्यंत प्रेमानें व आपुलकीनें ते साऱ्यांना शिकवून शहाणे करून सोडीत. वासूनाना चरेगांवकर या नांवाचा एक शिष्य त्यांच्यापाशीं संस्कृत शिकत असे. हा विद्यार्थी कमालीचा मतिमंद होता. पण काकांचें त्याच्यावर अपार प्रेम असे. काका त्याला शिकवीत पण त्याचें डोकें रिकामेंच राही. एखाद्या वेळीं काकांनीं त्याला थट्टेंत हंसून म्हणावें, " वासुदेव, तूं खरोखर दगड आहेस. " पण दगडांतून देव घडविण्याची किमया काकांच्याजवळ भरपूर प्रमाणांत होती. काकांनीं याच दगडाला शिकवून इतका तयार केला कीं, तोच वासुदेव पुढें नामांकित पुराणिक झाला आणि त्यानें गुरूची परंपरा चालविली. तुळशीबागेंत याच वासुनाना चरेगांवकरांनीं रामापुढें अनेक वर्षें पुराण सांगितलें.

विद्यार्थ्यांना शिकवितांना काकांना पोथीची अगर पुस्तकाची कधींहि गरज लागत नसे. काकांनीं स्वतः तरी कोणती पोथी अगर पुस्तकें धांडोळलीं

होतीं ? वस्तुतः काकांचें ज्ञान हें परमेश्वरी प्रसादाचें फळ होतें. एकदां का परमेश्वरी कृपा झाली म्हणजे विश्वाचें ज्ञान होत असतें हें तत्त्व काकांना पुरेपूर लागू पडणारें होतें. तुम्ही गुलाबराव महाराजांचें नांव ऐकलें आहे ना ? या जन्मांध महापुरुषाला जन्मजात एवढें ज्ञान प्राप्त झालेलें होतें कीं, त्या ज्ञानाची अखिल विश्वांत देखील पुरती भरती होऊं शकणार नाहीं. ज्ञानेश्वरीसारखा गहन ग्रंथ कथन करावा असें ज्ञानेश्वरांचें का तें वय होतें ? पण विश्वनाथाची कृपा झाली म्हणजे विश्वज्ञानाचा त्यापुढें काय पाड ? काकांची देखील हीच अवस्था असली पाहिजे. त्यांचें ज्ञान बघून मोठे मोठे पंडित देखील थक्क होऊन जात.

एकदां फर्ग्युसन कॉलेजमधील संस्कृतचे प्रोफेसर धारप हे काकांच्याकडे कांहीं शंका विचारण्यासाठीं आलेले मला स्मरतात. कोण्या एका संस्कृत नाटकाच्या कथानकाला पुराणांत कोठें आधार आहे काय ? असा प्रश्न त्यांनीं काकांना विचारला. काकांनीं सांगितलें कीं, अमुक पुराणाच्या अमुक अध्यायांतील अमुक श्लोकापासून या कथानकाला प्रारंभ झालेला आहे; पण नाटकाच्या सोयीसाठीं नाटककारानें मूळ कथानकांत अमुक फेरफार केलेला आहे.

काकांच्याकडे प्रो. धारप येऊन प्रश्न विचारीत आहेत असा देखावा आजहि मला स्पष्ट दिसतो. कोणतीहि पोथी न पहातां काकांनीं धारपांना उत्तर दिल्याचें मला पूर्णपणें आठवतें. पण फार काळ लोटल्यामुळें व त्या वेळीं माझें वय त्या मानानें लहान असल्यामुळें मला त्या नाटकाचें नांव किंवा पुराणाचें नांव आज आठवत नाहीं. काका पुराणिकांच्या वाड्यांत माझें जवळ जवळ एक तप वास्तव्य होतें. पण त्या काळांत कोणत्याहि प्रश्नाचें उत्तर देतांना काकांनीं पोथीचें पान उघडल्याचें मीं कधीं पाहिलें नाहीं. अर्थात् त्यांच्या घरीं त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें महाभारत, रामायण, भागवत, चंपू व इतर सर्व पुराणें व संस्कृत

ग्रंथांच्या हस्तलिखित पोथ्या होत्या. हा सर्व ग्रंथसंग्रह हल्लीं चिंचवड येथें त्यांच्या वडील बंधूंचे नातू बाजीराव विष्णु पुराणिक यांच्या घरीं आहे.

✤ ✤ ✤

काकांच्या वडील बंधूंवरून आठवण झाली. त्यांचीहि हकीगत मोठी ऐकण्यासारखी आहे. त्यांना बघण्याचा योग मला आला नाहीं, पण काकांच्या तोंडून मीं त्यांच्या अनेक हकीगती ऐकल्या आहेत. त्यांचें नांव आबाजीबोवा पुराणिक. हेहि नामांकित पुराणिक होते. जें काय मिळेल त्यांत ते संतुष्ट असत. संतोषांतच खरा सुखलाभ घडत असतो या वृत्तीचे आबाजीबोवा होते. प्रत्येक चातुर्मासांत मुंबईच्या विठ्ठलवाडीं-तील विठ्ठलमंदिरांत पुराण सांगण्याचें त्यांना वर्षासन असें. त्यांची प्राप्तीहि कांहीं कमी नव्हती. पुराणाच्या समाप्तीच्या दिवशीं त्यांना रोख रुपये आणि वस्त्रप्रावरण मिळून तीन-चार हजार रुपयांची प्राप्ति होत असे. उरलेले आठ महिने चिंचवडला किंवा पुण्याला स्नानसंध्या करून ते कालक्रमणा करीत.

एकदां आबाजीबोवा सहकुटुंब सहपरिवार काशीयात्रेला निघाले. त्या काळीं आगगाडी नव्हती. कोणाला लांबचा प्रवास करावयाचा झाल्यास तो बैलगाडींतून, घोड्यावरून किंवा पायीं करावा लागे. आबाजीबोवा आपल्या कुटुंबियांसह बैलगाडींतून काशीयात्रेला निघाले. निवाऱ्यासाठीं त्यांनीं आपल्याबरोबर राहुट्या घेतल्या. आवश्यक तेवढेच कपडेलत्ते घेतले. स्वयंपाकापुरतीं भांडींकुंडीं घेतलीं आणि मंडळी बैल-गाडींतून काशीयात्रेला निघाली. मजल मारीत मंडळी सातपुड्यांत येऊन दाखल झाली. सकाळीं राहुट्या ठोकून दुपारचा स्वयंपाक तयार झाला आणि पुरुष मंडळी व मुलेंबाळें जेवायला बसणार इतक्यांत चाळीस-पन्नास भिल्लांच्या एका टोळीनें राहुटीला गराडा घातला. मंडळींचे घांस हातांतच राहिले. तो साराच प्रकार जितका अनपेक्षित तितकाच

भीतिदायक होता. बायकामुलें घाबरून जागच्या जागीं खिळून बसलीं. पण आबाजीबोवा मात्र शांत होते. जेथें कशाचाच लोभ नव्हता त्या ठिकाणीं भीति तरी कसली असणार ?

आबाजीबोवा राहुटीच्या बाहेर आले व त्यांनीं भिल्लांना विचारलें, " तुम्ही सारे कोण आहांत? येथें कां आलांत? काय पाहिजे तुम्हांला? "

भिल्लांचा नाईक म्हणाला, " आम्ही तुम्हांला लुटायला आलों आहोंत. "

आबाजीबोवा शांतपणानें म्हणाले, " नाईक, ठीक आहे. राहुटींत आमचा स्वयंपाक तयार आहे. मुलें-माणसें भुकेलीं आहेत. तरी आमचें तुम्हांला एवढेंच सांगणें आहे कीं, मेहेरबानी करून आम्हांला जेऊं द्या आणि मग आम्ही होऊनच आमची सर्व चीजवस्तु, सामानसुमान आणि भांडींकुंडीं तुमच्या हवालीं करतों. आमचीं जेवणें होईपर्यंत जर तुम्हांला दम नसेल तर आतांच्या आतां आम्ही सर्व माणसें राहुटीच्या बाहेर पडतों. तुम्हांला जें कांहीं हवें असेल तें तुम्ही घेऊन चला. आम्ही आज उपाशीं रहावें अशी देवाचीच इच्छा आहे, असें समजून आम्ही उपाशीं राहूं. "

आबाजीबोवांचें हें बोलणें ऐकून भिल्लांचा नाईक म्हणाला, " तुम्ही स्वस्थ जेवा, उपाशीं राहूं नका. तुमचें जेवण होईपर्यंत आम्ही येथेंच थांबतों."

आबाजीबोवा राहुटींत गेले तेव्हां बायकामंडळी आपले दागिने जमिनींत पुरून ठेवीत आहेत असें त्यांना दिसलें. आबाजीबोवांनीं त्यांना स्पष्ट सांगितलें कीं, " एकहि दागिना पुरून ठेवूं नका. मी आपलें सर्वस्व भिल्लांना देऊन टाकण्याचें वचन दिलेलें आहे, तरी आपण सर्वजण जेवण करून बाहेर जाऊं आणि आपला सर्व माल त्यांच्या हवालीं करूं. "

जेवण आटोपलें. सर्व माणसें राहुटीबाहेर आलीं; आणि आबाजीबोवांनीं आपलें सारें सामान भिल्लांच्या स्वाधीन केलें. मागें एकहि जिन्नस ठेवला नाहीं.

भिल्लांनीं सर्व सामानाचे गठ्ठे बांधले. बायांनीं आपण होऊन दिलेले दागिने त्यांनीं घेतले व भिल्ल मंडळी निघून गेली.

कांहीं अंतरावर ते भिल्ल गेले असतील इतक्यांत भिल्लांच्या नाईकाला मोठ्यानें हांका मारीत आबाजीबोवा त्यांच्यामागें पळत सुटले. त्यांच्या हांका ऐकू नाईक थांबला. आबाजीबोवा त्याच्याजवळ गेल्यावर म्हणाले, " नाईक, माझ्या बोटांत ही अंगठी विसरून राहिली. म्हणून ती अंगठी तुम्हांला देऊन टाकण्यासाठीं मुद्दाम पळत आलों. "

ती बहुमोल हिऱ्याची अंगठी पाहून नाईकाला फारच आचंबा वाटला. आबाजीबोवांना उद्देशून तो म्हणाला, " तुमची अंगठी तर आम्हीं पाहिली नव्हती. तुम्हीं ती मुद्दाम कां आणून दिलीत ? "

आबाजीबोवा म्हणाले, " आमचें सर्व कांहीं नेण्याची तुम्हांला इच्छा होती. तुमचा मनोरथ तृप्त व्हावा म्हणून चुकून राहिलेली अंगठी घेऊन आलों. "

अधिक न बोलतां नाईकानें ती अंगठी घेतली आणि इतर भिल्लां-बरोबर तो निघून गेला.

आबाजीबोवांच्याबरोबर असलेल्या माणसांपैकीं एकानें त्यांना विचारलें, " भिल्लांनीं तर आपणांस सर्वस्वीं लुटलें. आतां पुढें काय ? "

आबाजीबोवांनीं उत्तर दिलें, " त्याची काळजी तुम्ही कां करतां ? आतांपर्यंत ज्यानें आपली काळजी वाहून परामर्श घेतला तोच परमेश्वर पुढेंहि आपली काळजी वाहण्याला समर्थ आहे. स्वस्थ रहा आणि काय होतें तें पहा. "

तिसऱ्या प्रहरीं तीन-चार भिल्ल पुन्हां आबाजीबोवांकडे आले. त्यांनीं आपल्याबरोबर तांदूळ, डाळ, कणीक, तूप, साखर वगैरे भरपूर शिधा आणला होता. तो आबाजीबोवांच्या समोर ठेवून त्या भिल्लांपैकीं

एकजण त्यांना म्हणाला, " रात्रींच्या जेवणासाठीं आमच्या नाईकानें हा शिधा दिला आहे. "

मग स्वयंपाकाला लागणारीं भांडींहि पाठोपाठ आलींच, नंतर स्वतः नाईक आला व त्यानें आबाजीबोवांना विचारलें, " तुम्ही कोठून आलांत ? कोठें चाललांत ? "

आबाजीबोवांनीं उत्तर दिलें, " आम्ही पुण्यांत असतों. मी पुराण सांगत असतों. आम्ही आतां काशीयात्रेला चाललों आहोंत. "

" मग आज रात्रीं आमच्या मंडळींना पुराण सांगाल कां ? " या नाईकाच्या प्रश्नावर आबाजीबोवा म्हणाले, " आमची पोथी तुम्ही नेली आहे ती आणून द्या म्हणजे पुराण सांगेन. "

नाईकांनीं ती गोष्ट मान्य केली. मग मंडळींना रात्रीं बसण्यासाठीं राहुटीपुढील जागा भिल्लांनीं झाडून साफ करून ठेवली व सर्वजण तेथून निघून गेले.

कांहीं वेळानें एका भिल्लानें पोथी आणून दिली; आणि रात्रीं नऊ वाजतां भिल्लांची चार-पांचशें मंडळी पुराण ऐकण्यासाठीं तेथें जमली. जेवण झाल्यावर आबाजीबोवांनीं पोथी सोडली आणि पुराणाला विषय एकलव्याच्या आख्यानाचा घेतला. एकलव्य या भिल्लाचें कथानक चांगलेंच रंगलें. भिल्ल मंडळी बेहद्द खूष झाली.

पुराण आटोपल्यावर नाईक आबाजीबोवांना म्हणाला, " बोवा, आणखी चार-पांच दिवस तुमचें येथें पुराण झालें पाहिजे. "

आबाजीबोवांनीं ती गोष्ट मान्य केली. रात्रंदिवस जेवणासाठीं भरपूर शिधा मिळत होता. रात्रीं पुराणाचा कार्यक्रम होत होता. सहाव्या दिवशीं पोथीची समाप्ति झाली. त्या दिवशीं भिल्लांनीं मोठा उत्सव केला.

भिल्लांनीं आबाजीबोवांचा नेलेला सर्व माल तर आणून दिलाच पण शिवाय इतर वाटसरूंकडून भिल्लांनीं लुटलेल्या राम, सीता व लक्ष्मण

यांच्या पंचधातूंच्या सुंदर मूर्ति बोवांना अर्पण केल्या; आणि वर एक हजार एक रुपये पुराणाची बिदागी म्हणून दिली. सातपुड्यांतून काशीला जाऊन परत सातपुड्यांत येईपर्यंत त्यांच्या संरक्षणासाठीं दोन भिल्ल दिले. अशा रीतीनें आबाजीबोवांचा चोरीला गेलेला माल तर परत मिळालाच शिवाय एक हजार एक रुपयांची बोवांना प्राप्ति झाली.

त्यांना सातपुड्यांत मिळालेल्या त्या तिन्ही मूर्ति चिंचवड येथें त्यांच्या नातवाच्या घरीं अद्याप देव्हाऱ्यांत ठेवलेल्या आहेत.

काकांच्या तोंडून आपल्या वडील बंधूंची ही मनोरंजक हकीगत मी अनेकवार ऐकलेली आहे. एखादें पुराणांतील कथानक रंगवून सांगावें, पण सत्याला मात्र कोठेंहि दंश करूं नये, अशा थाटांत काका ही हकीगत नेहमीं सांगत असत. ती हकीगत ऐकतांना आम्ही अगदीं तल्लीन होऊन जात असूं. पुनः पुन्हां ऐकण्यानें त्यांतील गोडी कधीं कमी झाली नाहीं. ही हकीगत ऐकत असतांना त्याहि वयांत माझ्या मनांत असा विचार येई कीं, निर्लोभी आणि त्यागी वृत्तीच्या व्यक्तीला परमेश्वर कसें अनपेक्षित साहाय्य करीत असतो! जे माझे अनन्य भक्त आहेत त्यांच्या योगक्षेमाची सारी जबाबदारी माझ्या शिरावर आहे, हें भगवान् श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत दिलेलें आश्वासन कधीं खोटें पडत नाहीं, हा दृढ विश्वास माझ्या मनांत त्या काळीं रुजला आहे. तो अद्याप किमपि कमी झालेला नाहीं. तुकारामांनीं म्हटल्याप्रमाणें देवाचे देह देवच सांभाळतो !

✦ ✦ ✦

काकांना कुरगड्डी येथें श्रीदत्त महाराजांनीं पुराण सांग असा दृष्टान्त दिल्यापासून अखेरपर्यंत त्यांनीं दत्तोपासनेंत कधीं खंड पडूं दिला नाहीं. काका स्वतःला बाबा वाईकरांचे शिष्य म्हणवीत. वाईकरांची हकीगत मी पुढें सांगणारच आहे. या वाईकरांनीं काकांच्यावर केव्हां आणि कोठें अनुग्रह केला ही गोष्ट मला निश्चित माहीत नाहीं. मला फक्त एवढेंच

माहीत आहे कीं, काका पुराणिक वाईकरांना आपले गुरु मानीत आणि वाईकर काकांना शिष्य म्हणवीत. या उभयतां गुरुशिष्यांची भेट मीं कधीं पाहिली नाहीं. किंबहुना काका जेव्हां आपल्या गुरूची माहिती सांगत तेव्हां हे त्यांचे गुरु हयात नव्हते.

पुराण सांगण्यांत जो काळ जाईल त्याव्यतिरिक्त काकांचा सारा वेळ दत्तमूर्तीच्या ध्यानांत व चिंतनांत जात असे. 'अतिसारेण मरणं योगिनामपि दुर्लभम्' म्हणजे अतिसारानें मृत्यु येणें ही गोष्ट योग्यांना देखील दुर्लभ असते, असें काका नेहमीं आम्हांला सांगत. अखेरीस त्यांचीहि हीच अवस्था झाली. वयाच्या ६६ व्या वर्षी काकांना अतिसार झाला. काकांच्या शेवटच्या दिवसांतील आठवणी आजहि माझ्या मनांत वागत आहेत. अखेरच्या दिवसांतील काकांचें वर्तन आजहि माझ्या डोळ्यांसमोर आहे.

काकांना अतिसार झाला तेव्हां आपली आतां अखेर आली हें त्यांना उमगलें. मृत्यु त्यांना समोर दिसूं लागला आणि इतरांनाहि त्यांनीं त्याची जाणीव करून दिली. अतिसारानें काका आजारी पडल्यानंतर अंथरुणावरून उठतांना एकदां त्यांच्या कपाळावर खांब आपटला तेव्हां ते म्हणाले, "आतां फक्त आठच दिवसांचा प्रश्न आहे. तेवढ्यांत तूं कितीदा आपटशील?"

एके दिवशीं गंगाबाई गवळण आली आणि तिनें काकांना दुधाचे पैसे मागितले. त्यावर काका म्हणाले, "गंगाबाई, आतां किती दिवस माझ्याकडून पैसे मागणार? नानबाकडून घ्या कीं!"

नानबा म्हणजे काकांचे चिरंजीव. तेहि त्या वेळीं कर्तेसवरते झाले होते.

काकांनीं आतां इहलोकींचें प्रस्थान ठेवलें होतें. त्यांची अंत-काळची भाषा सुरू झाली होती. ऐहिक व्यवहारांतील भाषा आतां

सुटली होती, ऐहिक बंध निमाले होते आणि परलोकाची वाटचाल लवकरच सुरू होणार होती. काकांना अतिसार झाल्यानंतर ५३ वर्षं बेलबागेंत अव्याहतपणानें चाललेल्या पुराणाला खंड पडला होता. त्यांच्या दर्शनाला अनेक माणसें येत होतीं. एके दिवशीं जनोबा केळकर घरीं आले. काकांचें पुराण अव्वलपासून अखेरपर्यंत त्यांनीं ऐकलें होतें. जनोबांनीं काकांना विचारलें, "माधवजी, पुढची कांहीं तयारी केली आहे ना?"

काकांनीं उत्तर दिलें, "जनोबा, ५३ वर्षं माझें पुराण तुम्हीं ऐकलें तरी हा प्रश्न तुम्हीं विचारावा ही आश्चर्याची गोष्ट आहे. ५३ वर्षं पुराण सांगितल्यानंतर पारलौकिक गतीविषयीं मी गाफील असेन कां?"

'दत्त अवधूत' या नामाचा जप सतत चालू होता. अतिसार होऊन आतां आठ दिवस झाले होते. अखेरचा क्षण आतां जवळ आला होता. आपल्या महाप्रयाणाचा हाच दिवस त्यांनीं दिग्दर्शित केला होता. दुपारचे बारा वाजले होते. सूर्य ऐन मध्यावर आला होता. अखेरीस 'दत्त अवधूत' या नांवाचा जप शुद्धीच्या अवस्थेंत काकांनीं केला आणि आपला नश्वर देह दत्तचरणीं अर्पण केला. अशा तऱ्हेनें परमेश्वरी प्रसादाचें हें फळ परमेश्वराघरीं गेलें. ज्याचें होतें तो तें घेऊन गेला आणि मागें उरली ती फक्त त्यांच्या लोकोत्तर कृतीची कीर्ति!

मी लहान असल्यामुळें मला त्यांच्या अंत्यविधीला जातां आलें नाहीं. पण माझे वडील बंधू त्या वेळीं उपस्थित होते. अंत्यविधीच्या वेळच्या गोष्टी मी कुतूहलानें साऱ्यांना विचारल्या. बालपणीं कुतूहल हा मानवी स्वभावाचा स्थायीभावच नसतो कां? मला सांगितलेल्या माहिती प्रमाणें काकांच्या अंत्यविधीला ओंकारेश्वरापाशीं अनेक विद्वान् मंडळी गोळा झाली होती. त्यांत त्यांचे सहाध्यायी व परमस्नेही वासुदेवशास्त्री पर्वतीकर हेहि हजर होते. बालपणीं कुरगड्डीला जाऊन तेरा दिवस

काकांच्या बरोबर कृष्णा नदीच्या वाळवंटांत निर्धारानें पडून रहाणारे हेच ते वासुदेवशास्त्री पर्वतीकर ! त्या ठिकाणीं दृष्टान्त झाल्याप्रमाणें बिंदुमाधव ऊर्फ काका पुराणिक हे मोठे पुराणिक बनले होते आणि वासुदेवशास्त्री हे मोठे नैयायिक झाले होते. काका पुराणिकांचें पर्व समाप्त झालें होतें. काकांचा पार्थिव देह चितेवर ठेवून त्याला अग्नि दिल्यावर वासुदेवशास्त्रींना दुःखाचा उमाळा अनावर झाला. ते आपल्या परमप्रिय सहाध्यायाला उद्देशून म्हणाले, " अरे माधवजी, तूं मला दुःखांत लोटून माझ्या अगोदर चाललास ना ? पण मीहि आजपासून बरोबर सहा महिन्यांनीं तुला येऊन गांठतो. "

आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, वासुदेवशास्त्री पर्वतीकर यांनीं बरोबर सहा महिन्यांनीं आपली इहलोकींची यात्रा संपविली आणि ते आपल्या सहाध्यायाच्या भेटीला निघून गेले.

: २ :

## बाबा वाईकर

* * * * *

काका पुराणिकांनीं सांगितलेले ते चमत्कार ऐकून मी अगदीं चकित होऊन जाई. मात्र ते चमत्कार ऐकत असतांना मला असत्याचा वास कधींहि आलेला नाहीं.

सृष्टीच्या बुडाशीं नांदत असलेलें आदितत्त्व हुडकून काढण्यांत माझ्या मतें बालवयासारखें सुयोग्य असें वय नाहीं. कारण बालवयांत मन श्रद्धाळु असतें, उलट अश्रद्धा हा एक तारुण्याचा धर्म आहे; पण पोरवयांतच माझ्या मनावर असे कांहीं संस्कार घडले होते आणि अशा कांहीं गोष्टी मीं पाहिल्या व ऐकल्या होत्या कीं, त्यामुळें माझ्या अंतःकरणांत श्रद्धेनें कायमचें ठाण मांडलें होतें. म्हणून माझ्या तारुण्यांत मी पाखंडी मताच्या कधीं वाऱ्यालाहि उभा राहिलों नाहीं. वस्तुतः सत्संगती हीच माझ्या श्रद्धेची बैठक होती. सत्संगतीचा असा सुयोग फारच थोड्यांच्या आयुष्यांत येत असतो. सुदैवानें माझ्या आयुष्यांत तसा योग भरपूर आला. त्यामुळें श्रद्धा ठेवण्यालायक अशा ज्या ज्या गोष्टी मी ऐकत असे त्यांवर माझा चटकन् विश्वास बसे; आणि म्हणूनच काका पुराणिक यांचे गुरु बाबा वाईकर यांच्याविषयीं त्यांच्या तोंडून मीं ज्या ज्या हकीगती ऐकल्या त्या ऐकून माझें मन अधिकच श्रद्धाळु बनलें आहे. कारण त्या साऱ्या हकीगती सांगणारी व्यक्ति अधिकारी होती; आणि कोणत्याहि प्रकारची बतावणी करून आपली स्वयंसिद्ध प्रतिष्ठा वाढविण्याचें त्या व्यक्तीला कांहींच कारण नव्हतें. काकांनीं कथन केलेल्या चमत्कारांची

३०८३६ २ ता. १०-१ २६८२ ४-४-५१

संगति मला त्या बालवयांत लागलेली नसली तरी आज ८५ व्या वर्षी आयुष्याच्या संध्याकाळीं शांत विचारांच्या छायेखालीं मला ती संगति स्पष्टपणानें लागू शकते.

बिंदुमाधव ऊर्फ काका पुराणिक हे बाबा वाईकरांना आपले गुरु मानीत असत, हें मी मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. मी पंधरा वर्षांचा असतांना काका पुराणिकांच्या तोंडून बाबा वाईकरांचे कांहीं चमत्कार ऐकले ते मी आतां सांगणार आहें.

बाबा वाईकरांचें मूळ रहाण्याचें ठिकाण कोणतें तें कळण्यास मार्ग नाहीं. कदाचित् काकांनीं त्यांचें मूळ ठिकाण आम्हांला सांगितलें असेल, पण माझ्या तें लक्षांत राहिलें नाहीं. बाबा हे नैष्ठिक ब्रह्मचारी होते. त्यांच्या-मागें प्रपंचाचा व्याप नव्हता. मात्र बाबांना आपल्या वडिलांचा फार उज्ज्वल असा वारसा मिळालेला होता. बाबांचे वडील हे जबरे भगवद्भक्त होते. त्यांचा निर्वाह शेतीवर चाले. काकांनीं बाबांच्या वडिलांची जी हकीगत सांगितली ती ऐकून कोणीहि थक्क होईल. एकदां चंपाषष्ठीचें नवरात्र बस-वायला बाबांच्या वडिलांजवळ एक दिडकीहि नव्हती. तेव्हां ते आपल्या पत्नीला म्हणाले, “ यंदा नवरात्र राहूं पहातें. कारण खर्चाला जवळ कांहींहि नाहीं. ”

तो काळ फारच स्वस्ताईचा होता. १८२० सालाच्या सुमारास अवघ्या पांच रुपयांत नवरात्र उत्तम प्रकारें साजरें करतां येत असे. त्या वर्षीचें नवरात्र बसण्याच्यापूर्वी बाबांचे वडील शेतांत फेरा करायला गेले असतांना त्यांच्या घरीं पांढऱ्या घोड्यावर बसून एक गृहस्थ आले व बाबांच्या वडिलांचा तपास करूं लागले. ते शेतांत गेले आहेत असें त्यांच्या पत्नीनें त्या गृहस्थाला सांगितलें. तें ऐकून त्या गृहस्थानें बाईजवळ पांच रुपये दिले व ते गृहस्थ म्हणाले, “ दरवर्षीप्रमाणें नवरात्र करा; तें चुकवूं नका, असा निरोप आपल्या यजमानांना सांगा. ”

बाईनें त्यांचें नांव विचारलें तेव्हां तो गृहस्थ म्हणाला, " मला मार्तंडराव म्हणतात. तुमचे यजमान मला चांगले ओळखतात. मार्तंडरावांनीं रुपये दिले आहेत असें सांगा म्हणजे त्यांना खूण पटेल."

असें सांगून ते गृहस्थ घोड्यावर बसून चालते झाले. बाबांचे वडील शेतांतून घरीं आल्यावर त्यांच्या पत्नीनें त्यांच्याजवळ पांच रुपये दिले आणि म्हटलें, " मार्तंरावांनीं हे रुपये दिले आहेत."

पांढऱ्या घोड्यावरून आलेल्या मार्तंडरावांचें नांव कळतांक्षणींच त्यांचे डोळे आनंदाश्रूंनीं डबडबून गेले. ते उद्गारले, " देवा, तुम्ही माझ्या संकटाचें निवारण करण्यासाठीं माझ्या घरीं आलांत. पण तुमचें प्रत्यक्ष दर्शन होण्याचें माझ्या नशिबीं नव्हतें. केवढा मीं अभागी!"

मग त्यांनीं आपल्या पत्नीस सांगितलें, " मार्तंडराव म्हणजे मल्हारीमार्तंड. त्यांचेंच नवरात्र आपल्याला बसवायचें आहे. ज्या अर्थी त्यांनीं स्वतः रुपये आणून दिले आहेत आणि नवरात्र साजरें करण्याची आज्ञा दिली आहे त्या अर्थी त्या बाबतींत सर्व कांहीं यथासांग झालें पाहिजे."

त्या वर्षींचा नवरात्राचा उत्सव आनंदानें पार पडला. प्रत्यक्ष खंडोबानेंच उत्सवासाठीं पैसे आणून दिले हें बाबांच्या वडिलांनीं पुरतें ओळखलें होतें. त्याबद्दल त्यांना धन्यता वाटत होती.

संत नामदेव एकदां असेच काळजींत असतांना पंढरीनाथानें केशवशेट वाण्याचें रूप घेऊन नामदेवांचें घर भरलें होतें, या प्रसंगाची मला आठवण होते. आपल्या अनन्यभक्तांची अडचण परमेश्वर अशीच दूर करीत असतो असे अनेक अनुभव प्रस्तुत लेखकानें आपल्या आयुष्यांत घेतलेले आहेत. त्यामुळें अशा गोष्टींत मला कधींहि भाबडेपणा वाटलेला नाहीं आणि अशा गोष्टींच्या सत्यावर विश्वास ठेवण्याआड माझा बुद्धिवाद कधींहि आलेला नाहीं. तुम्हांला तुकाराम महाराजांचा पुढील

अभंग माहीत आहे ना ? " पडतां जडभारी दासीं आठवावा हरि । मग तो होऊ नेदी शीण आड घाली सुदर्शन । हरिनामाच्या चिंतनें पळती बारा वाटा विघ्नें ॥ " तुकारामांसारख्या श्रेष्ठ संतांनीं दिलेला हा निर्वाळा थिटा आहे असें मानण्याची माझी तरी कधीं प्राज्ञा झालेली नाहीं. या संत-श्रेष्ठांच्या अनुभविक बोलांपुढें माझा तथाकथित बुद्धिवाद अगदीं लंगडा-पांगळा ठरलेला आहे.

अशा श्रेष्ठ भगवद्भक्ताचा उज्ज्वल वारसा बाबा वाईकरांना लाभलेला होता. बाबा ब्रह्मचारी असल्यामुळें त्यांना मागचे कसलेहि पाश नव्हते. त्यामुळें तीर्थयात्रा करीत हिंडणें हा त्यांचा दैनंदिन कार्यक्रम बनला होता. पंढरीनाथ व अय्यारामबोवा हे त्यांचे दोन पट्टशिष्य सतत त्यांच्याबरोबर असत. या दोन शिष्यांनीं भिक्षा मागून आणायची आणि सर्वांनीं मिळून भोजन करायचें हा त्यांचा नित्यक्रम असे. सकाळपासून जेवण तयार होईपर्यंत बाबा आपला सकाळचा काळ स्नानसंध्या व उपास्यदेवतेचा जप करण्यांत घालवीत. संध्याकाळीं दत्तकवच म्हणण्याचा व भजन करण्याचा कार्यक्रम असे. भजन करतांना आपल्यासमोर बाबा एक पाट मांडून ठेवीत. प्रत्यक्ष दत्तमहाराजांची मूर्ति भजनाच्या वेळीं या पाटावर येऊन बसून राही, असें काका पुराणिक आम्हांला सांगत असत. अशा रीतीनें बाबांना रोज त्यांच्या उपास्यदेवतेचें प्रत्यक्ष दर्शन होत असें. या गोष्टीचें मला त्या वेळीं खरोखरच नवल वाटायचें. नाम्याचा नैवेद्य दगडाच्या देवानें प्रत्यक्ष ग्रहण केल्याची हकीगत त्याच वयांत मला माहीत होती. एखाद्या उपासकाचें उपास्यदवत आपल्या कृपाप्रसादाचा आविष्कार अन्य तऱ्हेनें करून त्या उपासकाला ऋणी करून ठेवीत असेल, पण प्रत्यक्षांत येऊन देव दर्शन देतो ही गोष्ट माझ्या श्रद्धाळु मनालाहि त्या वयांत पटत नसे. पण आज त्याहि चमत्काराची संगति मला लागते. बाबांचा उपास्यदेवतेचा मंत्रजप नित्यनियमानें चालू असे. योगशास्त्राच्या 'स्वाध्याय' या नियमांत जपाचा

अंतर्भाव होतो. " स्वाध्यायादिष्ट देवता संप्रयोगः " या पातंजलसूत्राप्रमाणें उपासनेचा परिपाक झाला असतां उपासकाला त्याच्या उपास्य-देवतेचें प्रत्यक्ष किंवा स्वप्नांत दर्शन होत असतें किंवा देवतेचा त्याच्या अंगांत संचार होत असतो. बाबांची उपासना अखंड होती, तिचा वेगहि तीव्र होता आणि आवेगहि अपार होता. आपलें उपास्यदैवत त्यांनीं पुरतें आपलेंसें केलें होतें. अशा स्थितींत त्यांच्या भजनाच्या वेळीं श्रीदत्तमूर्ति त्यांच्यासमोर प्रत्यक्ष उपस्थित असे यांत नवल तें काय ? ' हरि आमच्या ओटीवर बसले आहेत. आम्हांला काय कमी आहे ? ' असें म्हणण्याचा अधिकार तुकारामांना याच उपासनेच्या बळावर प्राप्त झाला होता. उपासनेची जेव्हां पराकाष्ठा होते तेव्हांच परमेश्वराचा सगुण साक्षात्कार होत असतो ही दृढ श्रद्धा माझ्या अंतःकरणांत आज कायमची घर करून बसली आहे.

या दत्तभक्ताच्या अंगीं सिद्धीहि वास करीत होत्या. एकदां बाबांचा मुक्काम अंबेजोगाई ( हल्लींचें मोमिनाबाद ) येथील धर्मशाळेंत होता. तेथील तहशीलदारानें सरकारी पैशाची अफरातफर केल्याच्या संशयावरून त्याला पकडायला निजाम सरकारनें अरब पाठविले होते. तहशीलदाराला ही हकीगत कळल्याबरोबर तो घरांतून निसटला व धर्मशाळेंत येऊन त्यानें बाबांचे पाय धरले. तहशीलदार काकुळतीनें म्हणाला, " अरब मला कैद करून नेणार आहेत, तरी या संकटांतून मला वांचवा. "

यावर बाबा म्हणाले, " कांहीं काळजी करूं नकोस. माझ्याजवळ बस. तुला कोणी सुद्धां पकडणार नाहीं. "

तहशीलदार बाबांच्याजवळ बसला. त्याचा पाठलाग करीत अरब त्याला पकडण्यासाठीं धर्मशाळेंत आले. तहशीलदारानें त्या अरबांना पाहिलें पण त्या अरबांना बाबा किंवा तहशीलदार हे मात्र दिसले नाहींत. कारण तेवढ्या क्षेत्रांत बाबांनीं नजरबंदी केली होती.

अरब निघून गेल्यावर बाबांनीं तहशीलदारास घरीं जाण्यास सांगितलें. तहशीलदार म्हणाला, "मी आपले उपकार जन्मभर विसरणार नाहीं. आपले पाय माझ्या घराला लागावेत एवढीच आतां माझी विनंती आहे."

बाबांनीं त्याला सांगितलें कीं, "आम्ही कोणाच्या घरीं जात नाहीं. तेव्हां मला तसा आग्रह करूं नकोस. आतां काळजीचें कारण राहिलें नाहीं. तुला कोणीहि पकडणार नाहीं."

बाबांच्या पायां पडून तहशीलदार निर्धास्तपणानें आपल्या घरीं निघून गेला. शरणागताला अभय देणें हाच संतांचा धर्म नसतो कां ?

❖ ❖ ❖

एकदां तीर्थयात्रा करतां करतां बाबा श्रीशैल्य पर्वतावरील मल्लिकार्जुनाच्या दर्शनाला निघाले. म्लेंच्छाक्रान्त राज्य झाल्यानंतर गाणगापुरस्थ गुरुनाथ नृसिंहसरस्वती गंगाप्रवाहावर दिव्यासन घालून गेले ते याच श्रीशैल्य पर्वताकडे. ही तीर्थयात्रा चालू असतांना बाबांच्या बरोबर त्यांचे शिष्य होतेच. वाट घनदाट जंगलांतून होती. बाबा व त्यांचे शिष्य त्या निर्जन जंगलांत वाट चुकून भलतीकडेच गेले. पुढें वाट खंडली. शिष्य काळजींत पडले तेव्हां बाबा त्यांना म्हणाले, "आतां येथेंच बसूं या. आपल्याला वाट दाखवायला प्रभु कोणाला तरी पाठवून देईलच."

ही मंडळी खालीं बसली. थोड्याच अवधींत आकाशांत सोसाट्याचा वारा सुटल्याचा आवाज येऊं लागला. तो आवाज वाढत वाढत जवळ ऐकूं येऊं लागला. इतक्यांत एक गरुड पक्षी आकाशांत त्यांच्या डोक्यावर येऊन स्थिरावला. त्याच्या पंखांचा आवाज होत होता. त्या गरुडाची सांवली जमिनीवर या मंडळींच्या अगदीं पुढें पडली. बाबा आपल्या शिष्यांना म्हणाले, "उठा, हे महाराज आपल्याला वाट दाखविण्यासाठीं आले आहेत."

सर्व लोक उठले. गरुड आकाशांत हलक्या गतीनें पुढें चालूं लागला. त्याची जमिनीवरील छायाहि पुढें सरकूं लागली. त्या छायेच्या आश्रयानें ही मंडळी पुढें जाऊं लागली. थोडक्याच अवधींत सारी मंडळी योग्य वाटेवर येऊन पोहोंचली. बाबांनीं गरुडाला नमस्कार केला. शिष्यांनींहि त्याला अभिवादन केलें. गरुडानें आपली गति वाढवून तेथून प्रयाण केलें व अल्पावधींत तो दृष्टिपथांतून नाहींसा झाला. गुरु व शिष्य राहिलेली वाट चालून गेले व श्रीशैल्याच्या पायथ्याशीं जाऊन पोचले.

शिवलिंगाचें दर्शन घेण्यासाठीं डोंगर चढण्यापूर्वींच या मंडळींना त्यांच्याकडे तोंड करून बसलेला दोन-अडीच पुरुष् उंचीचा असा एक अवाढव्य नंदी दिसला. या अलौकिक नंदिकेश्वराला पाहून बाबा आपल्या शिष्यांना उद्देशून म्हणाले, " आपण डोंगरावर ज्यांच्या दर्शनाला जाणार आहोंत तेच महाराज या नंदिकेश्वराच्या रूपानें आपणाला दर्शन देण्यासाठीं येथें येऊन बसले आहेत. तरी त्यांनाच आपण नमस्कार करूं या. आता वर जाण्याचें कारणच उरलेलें नाहीं. "

सर्वांनीं त्या नंदिकेश्वराला भक्तिभावानें नमस्कार केला आणि सर्वजण तेथून पुढें चालते झाले.

✦ ✦ ✦

यात्रामार्गावर बाबा एकदां गाणगापुरास आले. त्यांचा गाणगापुरांत मुक्काम असतांना काऊअक्का त्यांच्या दर्शनाला गेल्या. पराकाष्ठेची परमेश्वरसेवा करून या काऊअक्कांनीं पुढें आपला फार मोठा अधिकार प्रस्थापित करून ठेवला होता. ती हकीगत मी क्रमानें पुढें सांगणारच आहे. काऊअक्का सोळा-सतरा वर्षांच्या असतांनाच त्यांचा नवरा वारला. बाईना सारें जग शून्यवत् वाटूं लागलें. त्या विरक्त बनल्या आणि आपलें आयुष्य आतां देवाच्या सेवेंत घालवावें या हेतूनें त्या गाणगापुरीं येऊन राहिल्या. मधुकरी मागून बाई आपला उदरनिर्वाह करीत आणि

रात्रंदिवस त्या ईशसेवेंत निमग्न असत. या बाईंचीं सासरचीं व माहेरचीं माणसें फार श्रीमंत होतीं, पण त्या संपत्तीकडे त्यांनीं पूर्णपणानें आपली पाठ फिरविली होती. काऊअक्का बावांच्या दर्शनाला आल्या तेव्हां त्यांनीं आपली सर्व हकीगत बावांना सांगितली; आणि त्यांच्याबरोबर तीर्थ-यात्रेला जाण्याचा आपला हेतु कळविला. यावर बावा काऊअक्कांना म्हणाले, " मुली, तूं लहान आहेस. आम्ही पायीं हिंडणार. प्रवासांत जें मिळेल ते आणि मिळेल तेव्हां खावें लागतें. तुला त्याची संवय नाहीं. आमच्याबरोबर तुझा निभाव कसा लागणार ? आमच्याबरोबर तूं आलीस तर आमची कांहीं हरकत नाहीं, पण तुझे प्रवासांत हाल होतील याचा विचार कर. "

यावर काऊअक्का म्हणाल्या, " बावा, ज्या वेळीं माझ्यावर दुर्दैवानें अचानक घाला घालून मला संसारसुखांतून हद्दपार केलें त्याच वेळीं या सर्व गोष्टींचा मी विचार केलेला आहे. यापुढें हा देह देवाच्या स्वाधीन केलेला आहे. त्याच्या सेवेंतच देह झिजवावा अशी माझी इच्छा आहे. तुम्हांला मी वडील मानते. मला मुलगी समजून आपल्याबरोबर तीर्थ-यात्रेला न्या अशी पदर पसरून मी आपणांला विनंती करतें. "

काऊअक्कांची ती विलक्षण विरक्ति पाहून बावांना त्यांची करुणा आली आणि काऊअक्कांना बरोबर नेण्याचें त्यांनीं ठरविलें. मग बावांनीं पंढरीनाथ व अय्यारामबोवा या आपल्या शिष्यांना बोलावून सांगितलें, " तुमची ही बहीण समजून हिचा सांभाळ करा. "

बावांचें म्हणणें अर्थात् त्यांना शिरसावंद्य होतें.

गाणगापूरचा मुक्काम संपला आणि बावा, त्यांचे दोन पट्टशिष्य व काऊअक्का असे चौघेजण यात्रेला निघाले. दोघां शिष्यांनीं भिक्षा मागून आणायची आणि काऊअक्कांनीं चौघांचा स्वयंपाक करायचा असा क्रम कित्येक वर्षें चालू होता. अखेरीस बावांनीं काऊअक्कांना एके

दिवशीं सांगितलें, "आम्ही काशीला जावें अशी दत्तमहाराजांची आम्हांला आज्ञा झाली आहे. तरी आतां आपण काशीला जाऊं या. काशीला मनुष्याचें प्राणोत्क्रमण होतेवेळीं श्रीविश्वेश्वर त्याच्या कानांत तारक-मंत्राचा उपदेश करतात आणि मग तो मनुष्य मुक्त होतो अशी प्राचीन काळापासून आपणां हिंदूंची दृढ समजूत आहे."

या बोलण्यावरून बाबांनीं आपल्या शिष्यांना आपल्या अखेरीची कल्पनाच करून दिली नव्हती का? शिष्यांनाहि तसें वाटूं लागलें आणि शिष्यांची ती कल्पना खरीहि ठरली. बाबांच्या इच्छेप्रमाणें त्यांचे शिष्य आणि काऊअक्का अशी मंडळी काशीला गेली. तेथें गेल्यावर बाबांनीं सर्वांना सांगितलें, "आम्ही लवकरच या क्षेत्रीं देह ठेवणार आहोंत. आमचे सारे अंत्यसंस्कार पार पाडल्यानंतर काऊअक्कांना गाणगापुरांत नेऊन ठेवावें व तुम्हीं उभयतांनीं तीर्थयात्रा करीत रहावें.

मग बाबा काऊअक्कांकडे वळून म्हणाले, "तुम्ही गाणगापुरांत राहून तेथें दत्तमहाराजांची सेवा करावी व तेथें सेवा करावयास आलेल्या माणसांना, दत्तमहाराजांच्या आज्ञेप्रमाणें उपदेश करीत जावा. तुमच्यावर दत्तमहाराजांची पूर्ण कृपा झालेली आहे. त्यामुळें तुम्ही म्हणाल तें दत्त-महाराज खरें करतील."

पुढें कांहीं दिवसांनीं बाबांनीं तिघांना हांक मारली आणि त्यांना सांगितलें, "आम्ही आतां देवापाशीं जातों."

असें म्हणून बाबा खालीं जमिनीवर निजले. त्यांचे एक पट्टशिष्य अय्यारामबोवा यांनीं त्यांना मांडी दिली आणि आपल्या पट्टशिष्याच्या मांडीवर बाबांना कायमची झोंप लागली.

पंढरीनाथाला बाबांच्या अंत्यसंस्कारांची काळजी वाटूं लागली. कारण या गुरुशिष्यांनीं आपल्याजवळ द्रव्य बाळगण्याची कधींच काळजी केली नव्हती. पंढरीनाथाला अंत्यसंस्कारासाठीं द्रव्याची चिंता लागली मात्र,

तोंच बाबांच्या मस्तकांत एक आवाज होऊन त्यांच्या टाळूला छोटें छिद्र पडलें आणि त्यांतून गंगेसारखें शुभ्र आणि स्वच्छ पाणी वाहूं लागलें. तें पाहून दुसरें शिष्य अय्यारामबोवा पंढरीनाथाला म्हणाले, “ बाबांची काय आज्ञा झाली ती तुला समजली का? ”

पंढरीनाथानें विचारलें, “ कसली आज्ञा? ”

अय्यारामबोवांनीं सांगितलें, “ बाबांच्या देहाला अग्निसंस्कार करण्याचें कारण नाहीं. ज्या अर्थी त्यांच्या मस्तकांतून गंगोदकच वहात आहे त्या अर्थी त्यांचा देह गंगार्पण करून गंगेला गंगा मिळवून टाका. ”

आपल्या गुरूप्रमाणेंच शिष्यांचेहि सारे ऐहिक बंध तुटले होते. गुरूच्या पार्थिव देहाची त्यांना आतां चिंता उरली नव्हती. गुरूच्या आज्ञेप्रमाणें त्यांचा देह गंगेच्या प्रवाहांत सोडण्यांत आला. पावित्र्यांत पावित्र्य पावलें आणि बाबांच्या अवताराची परिसमाप्ति झाली.

✦ ✦ ✦

बाबांच्या आज्ञेप्रमाणें पंढरीनाथ व अय्यारामबोवांनीं काऊअक्कांना गाणगापुरास नेऊन पोहोंचविलें आणि ते उभयतां गुरुबंधु पुनश्च तीर्थ-यात्रेला निघून गेले.

आपल्या गुरूच्या आज्ञेप्रमाणें काऊअक्का गाणगापुरांत अखेरपर्यंत राहिल्या. बाबांनीं सांगितल्याप्रमाणें गाणगापुरांत देवाच्या सेवेसाठीं येणाऱ्या माणसांना त्यांचें मार्गदर्शन होत असें. “ काऊअक्कांना विचारा, त्या सांगतील तसें वागा म्हणजे तुमचा कार्यभाग साधेल ” असे सेवेकऱ्यांना दृष्टान्त होत असत; आणि ते त्यानुसार काऊअक्कांकडे आले म्हणजे त्या सेवेकऱ्यांना सुयोग्य मार्गदर्शन होत असें. स्वतः निरिच्छ राहून गांजलेल्या माणसांचीं संकटें दूर करण्यांत त्यांनीं आपलें सारें आयुष्य वेचलें. गाणगापुरांत काऊअक्कांना फार मोठा मान असे. स्वतः मधुकरी मागून त्या आपला निर्वाह करीत. कोणापासून त्यांनीं कधीं कांहीं

घेतलें नाहीं, मात्र साऱ्यांनाच त्यांनीं आपलें प्रेम दिलें. त्यांच्या ठिकाणीं अंतर्साक्षित्वहि होतें. कोणी त्यांना कांहीं शंका विचारायला गेला तर त्या माणसानें प्रश्न विचारण्याच्या अगोदरच काऊअक्का त्याच्या शंकेचें समाधान करीत असत. भविष्यकाळीं घडून येणाऱ्या गोष्टींचेंहि त्यांना यथार्थ ज्ञान होत असें. पुढें येणाऱ्या संकटाची त्यांना आधींच कल्पना असे आणि त्या लोकांना सावध करून ठेवीत.

त्यांच्या अंतर्साक्षित्वाचा पडताळा खुद्द माझ्या वडील बंधूंनाच आलेला आहे. माझे वडील बंधू कै. गंगाधर महादेव ऊर्फ तात्यासाहेब हे १८९१ सालीं बी. ए.ची परीक्षा पास झाले. निष्पाप अंतःकरण आणि भाविक वृत्ति या त्यांच्या जन्मजात गुणांना आधुनिकतेचा स्पर्श झालेला नव्हता. ते बी. ए. नंतर एल्‌एल्. बी. झाले पण त्यांचें शिक्षण त्यांच्या श्रद्धेच्या आड कधींहि आलें नाहीं. बी. ए. ची परीक्षा पास झाल्यावर गाणगापुराला जाऊन तेथें श्रीगुरुचरित्राचें एक पारायण करावें असें तात्यासाहेबांच्या मनांत आलें. त्यांनीं काका पुराणिकांना आपला मनोदय कळविला. काकांनीं त्यांना काऊअक्कांकडे जाण्यास सांगितलें.

तात्यासाहेब गाणगापुरास जाऊन काऊअक्कांना भेटले व म्हणाले, "मला काकांनीं तुमच्याकडे धाडलें आहे. येथें राहून तीन दिवसांत गुरुचरित्राचें पारायण करावें असा हेतु मनांत धरून मी येथें आलों आहें."

काऊअक्का म्हणाल्या, "तात्या, तीन दिवसांत काय पण कोणी एक दिवसांत सुद्धां पारायण करतात. पण पारायण करणें म्हणजे गवत कां कापायचें आहे? बाबा रे, गुरुचरित्र वाचायचें तर तें नीट लक्षपूर्वक वाचलें तर त्यांतील कथांचा अर्थ पूर्णपणें लक्षांत येतो आणि त्यांचा इष्ट परिणाम मनावर होत असतो. त्या योगें श्रद्धा बळावते, ईश्वराविषयीं प्रेम वाढत जातें आणि मनुष्य सन्मार्गापासून ढळत नाहीं. अशाच माणसा-

वर ईश्वराची कृपा होत असते. तूं संसारांत एकदां गुरफटलास म्हणजे पुन्हां तुला येथें यायला सांपडणार नाहीं. म्हणून तूं येथें आल्यासारखा सात-आठ दिवस रहा आणि पारायण करायचें तें सावकाशपणानें सात दिवसांत कर. रोज जे अध्याय पुरे करायचे ते सूर्य माध्यान्हीला येण्या-पूर्वी पुरे कर. नंतर मी सांगेन त्या घरीं जाऊन मधुकरी मागून आण. माझी मधुकरी येतच असते. आपण जेवीत जाऊं. दिवसभर नामजप चालू ठेव. देवळांत आरतीला जात जा. अशा रीतीनें येथें राहून दिवस घालव. प्रभु समर्थ आहे. तुझ्यावर तो कृपा करील."

काऊअक्कांच्या ओवरींत राहून त्यांच्या सांगण्याप्रमाणें तात्यांनीं दैनंदिन कार्यक्रम चालू ठेवला. सात दिवसांचें पारायण त्यांनीं सुरू केलें. सकाळीं पारायण करावें, दुपारीं मधुकरी मागून काऊअक्कांबरोबर जेवावें व संध्याकाळीं फिरायला जावें, असा त्यांचा नित्यक्रम चालू होता. पारा-यणाच्या पांचव्या दिवशीं दुपारीं एक वाजण्याच्या सुमारास काऊअक्कांनीं तात्यांना जवळ बोलावून सांगितलें, "तूं आज संध्याकाळीं फिरायला जाऊं नकोस. येथेंच माझ्यापाशीं ओवरींत बसून रहा."

फिरायला न जाण्याचें कारण तात्यांनीं काऊअक्कांना विचारलें तेव्हां त्या म्हणाल्या, "तें कारण तुला संध्याकाळीं समजेल."

दुपारचें जेवण झाल्यापासून संध्याकाळपर्यंत तात्या देवळाच्या ओवरींतच बसून राहिले. संध्याकाळीं पांच साडेपांच वाजण्याच्या सुमारास देवळांत सिंहनाद होऊं लागला. बंदुकीचे आवाज ऐकूं येऊं लागले. गोफणींच्या दगडांचा गांवावर वर्षाव होऊं लागला. ओवरीच्या बाहेर दगड येऊन पडूं लागले. थोड्याच अवधींत गांवांतील लोकांची धांदल होऊन पळापळ सुरू झाली. घरांतील माणसांनीं आपापल्या दारांचीं कवाडें बंद करून घेतलीं. सर्वत्र दहशतीचें वातावरण निर्माण झालें. सुमारें सहा

वाजण्याच्या सुमारास सव्वाशें-दीडशें दरोडेखोरांची हत्यारबंद टोळी एका पुजाऱ्याच्या घरावर चाल करून आली. दारें लावून घेतलीं असल्यामुळें एक दरोडेखोर भिंतीवरून चढूं लागला. खालच्या बाजूस सुमारें कंबरे-इतका खोल मोरीचा खड्डा होता; आणि त्यांत सांडपाणी भरून बाहेर वहात होतें. पुजाऱ्याचा गडी धाब्यावर गेला आणि वर असलेलें एक मोठें तुळवट भिंत चढणाऱ्या दरोडेखोराच्या अंगावर वरून त्यानें लोटून दिलें. तें तुळवट त्याच्या मांडीवर पडून मांडीचें हाड मोडलें आणि तेथें मोठी जखम होऊन भयंकर रक्त वाहूं लागलें. तुळवट मांडीवर पडतांक्षणींच तो खालीं कोसळून मोरींत पडला आणि त्या घाण पाण्यानें त्याला सचैल स्नान घडलें. दरोड्याच्या कामीं प्रारंभींच अपशकुन झालेला पाहून, त्या टोळींतील कांहीं ताकदवान माणसांनीं त्या जखमी माणसाला मोरीच्या बाहेर काढलें आणि तशाच रक्तबंबाळ स्थितींत त्याला पासोडीच्या खोळींत घालून सर्व दरोडेखोर त्याच्यासह 'दीन दीन' करीत तेथून चालते झाले. सुमारें अर्ध्या-पाऊण तासानें दरोड्याची भीति नाहींशी झाल्यावर गांवांतील व्यवहार पुन्हां सुरू झाले.

काऊआक्का आमच्या तात्यांना म्हणाल्या, " तूं बाहेर जाऊं नकोस म्हणून मी तुला सांगितलें त्याचें कारण आतां तुला कळलें ना ? वडील-धारी माणसें सांगतात तें मुलांनीं ऐकण्यांतच त्यांचा फायदा असतो. "

काऊअक्कांच्या ठिकाणीं तपःसामर्थ्यामुळें ही भविष्यकथनाची शक्ति आलेली होती या गोष्टीचा तात्यांना पडताळा आला. गाणगापूर येथें बसल्याजागीं काऊअक्कांनीं आपल्या तपःसामर्थ्याचा अनंत लोकांना लाभ करून दिला. स्वतःचा संसार जरी मोडला होता, तरी त्यांनीं जनता-जनार्दनाची सेवा केली आणि त्यांच्या संसारांत आनंद निर्माण केला. त्यांचा सहवास ज्यांना घडला त्यांना त्यांनीं संकटांतून मुक्त केलें आणि सन्मार्गाला लावलें. बालपणींच वैधव्याचा घाला आला असतांना त्या

डगमगल्या नाहींत. घरच्या श्रीमंतीकडे त्यांनीं पाठ फिरविली आणि आपल्या गुरूपासून वैराग्याचे पाठ घेऊन त्या गाणगापुरांत येऊन राहिल्या.

या महातपस्विनीचा देहत्याग केव्हां झाला याची मला माहिती नाहीं. जी कथा मला माहीत नाहीं ती मी सांगणार नाहीं. मात्र काऊ-अक्कांच्या ज्या ज्या विश्वसनीय गोष्टी मी ऐकल्या त्या माझ्या मनांत कायमच्या घर करून राहिल्या आहेत.

: ३ :

## सारंगे संन्यासी

* * * * * *

एखाद्या योगभ्रष्ट महापुरुषाचे चमत्कार तुम्हीं कधीं ऐकले आहेत का ? अशा योगभ्रष्ट महापुरुषाचें श्रीज्ञानेश्वरांनीं उत्कृष्ट वर्णन केलेलें आहे. " सूर्योदयापूर्वींच जशा दिशा प्रकाशित होतात, त्याप्रमाणें योग्य वयोमर्यादेपूर्वींच ज्ञानरूप सूर्याचा अरुणोदय त्याच्या ठिकाणीं दिसतो. अशा पुरुषाला योगाभ्यासहि आपोआप कसा येतो, हें कांहीं सांगतां येत नाहीं. समाधि ही देखील त्याच्या मनाचा पत्ता विचारीत येते. " अशा बहारदार शब्दांत ज्ञानेश्वरांनीं योगभ्रष्ट महापुरुषाची अवस्था वर्णन केलेली आहे. अशा एका योगभ्रष्ट महापुरुषाची अद्भुत कथा मी तुम्हांला सांगणार आहें. त्या जन्मजात थोर पुरुषाला मी स्वतः पाहिलें आहे आणि त्या महापुरुषानें केलेले चमत्कार खुद्द माझ्या वडिलांच्याच तोंडून मीं अनेकवार ऐकले आहेत.

* * *

मराठी शाळेंतील परीक्षेच्या निर्णयाचा दिवस उजाडला. हुषार विद्यार्थ्यांना आपण पास होणार याची खात्री होती. इतरांना काय होतें, काय नाहीं याविषयीं मनांत एक प्रकारची धास्ती वाटत होती. दुपारीं मुलें शाळेंत गेलीं. परीक्षेचा निकाल बाहेर पडला. त्यांत एक मुलगा तिसऱ्या वर्षीं दुसऱ्या इयत्तेंत नापास झाला. त्या वेळीं त्या मुलाचें वय बारा वर्षांचें होतें. नापास झाल्यामुळें हिरमुसलें तोंड करून जड पावलांनीं तो घरीं आला. दुपारची बाराची वेळ होती. दिवस उन्हाळ्याचे होते.

सूर्यदेव आपल्या प्रचंड तापाची आगच जणुं पृथ्वीवर ओकीत होता. अशा उन्हांतून मुलगा घरीं आल्यावर परीक्षेचें काय झालें म्हणून बापानें मुलाला विचारलें. मुलानें लाजेनें मान खालीं घालून भीत भीत नापास झाल्याचें सांगितलें.

मुलगा नापास झाल्याचें ऐकून बापाच्या संतापाचा पारा चढला व तो म्हणाला, "तूं दुसऱ्या इयत्तेंत तीनदां नापास झालास, घरांतून चालता हो. तूं दगड आहेस, भीक मागून पोट भर."

असें म्हणून रागाच्या भरांत बापानें मुलाला चांगले दोन-चार रट्टे लगावून घराबाहेर हांकलून दिलें. सावत्र आईनें केलेला अपमान सहन न होऊन अशाच बालवयांत परमेश्वरप्राप्तीसाठीं ध्रुव निघून गेला नव्हता कां? अर्थात् बालध्रुव मातेच्या प्रेरणेनें घराबाहेर पडला होता आणि या मुलाला नापास झाल्यामुळें बापानेंच घराबाहेर काढलें होतें. घराचा उंबरठा ओलांडतांना दोघांच्याहि अंतःकरणांत अपमानाचें शल्य खुपत होतें. कधीं कधीं अपमानाच्या पोटांत केवढाले महापराक्रम दडलेले असतात! कदाचित् सृष्टीच असे चमत्कार घडवून आणीत असेल.

अर्थात् ऐन उन्हाच्या कहारांत घराबाहेर काढलेल्या त्या मुलाच्या मनांत या पराक्रमाची कल्पना कोठून नांदणार? त्या मुलाला नजिकच्या भविष्यकाळांत घडणाऱ्या चमत्काराची कसलीहि कल्पना नव्हती. तो घराबाहेर पडला आणि त्याच्या डोळ्यांसमोर त्या भरउन्हांतहि काजवे चमकूं लागले. घरांतून बाहेर पडण्याचा प्रसंग आल्यावर 'घर घर' करीत कित्येक मुलें वायां गेलेलीं आपण बघतों. पण या मुलाच्या बाबतींत योगायोग अगदीं वेगळा होता. घर सुटलें, आईबापांचा प्रेमळ आधार तुटला, दोन प्रहरची वेळ, ऊन चटके देत आहे, अशा वेळीं जावें कोठें, आपल्याला जेवायला कोण घालणार, आश्रय कोण देणार, या विचारांच त्या मुलाच्या मस्तकांत काहूर उठलें. भुकेनें जीव व्याकुळ झालेला,

डोळ्यांत अक्षरशः प्राण आलेले आणि त्याचबरोबर अश्रुधारा लागलेल्या! अपमानाचें शल्य अधिक तापदायक होतें, का भर उन्हांत रस्त्यावर उभें रहाणें ही गोष्ट अधिक तापदायक होती या गोष्टीचा निर्णय त्या मुलाला करतां येईना. उन्हांत उभें राहिल्यानें त्याचें सारें शरीर तापलें होतें — घामानें ओलेंचिंब झालें होतें.

त्या वेळीं वाईत गोपाळबोवा या नांवाच्या महान् सत्पुरुषाचें वास्तव्य होतें. तेथें त्यांचा मठ होता. या मुलाला त्या मठांत जाण्याची अनिवार इच्छा झाली. तो तडक मठांत गेला आणि तेथें जाऊन तो गोपाळबोवांच्या समोर ओक्साबोक्सी रडूं लागला. गोपाळबोवांनीं त्या मुलाला रडण्याचें कारण विचारलें तेव्हां त्यानें घडलेली सारी हकीगत बोवांना सांगितली. त्या मुलाची हकीगत ऐकून बोवांनीं आपल्या एका शिष्याला बोलावलें व म्हटलें, "या मुलाला स्नान घालून जेवायला घाला व नंतर त्याला माझ्याजवळ आणून बसवा."

मुलाचें जेवण उरकल्यावर तो मुलगा बोवांजवळ बसून राहिला.

तिसऱ्या प्रहरीं बोवांनीं आपल्या शिष्यांना हांक मारली आणि सांगितलें, "आज रात्रीं कृष्णाघाटावर एका बालहरिदासाचें कीर्तन आहे, तरी सर्व ग्रामस्थांनीं कीर्तनाला यावें अशी गांवांत द्वाही फिरवा."

त्या मुलाकडे पाहून बोवांचा साराच शिष्यवर्ग साशंक बनला. हा मुलगा कीर्तन करणार ही गोष्ट कोणालाच पटेना. पण गुरुआज्ञेपुढें कोणालाच कांहीं बोलणें शक्य नव्हतें. शिष्यमंडळी मनाशीं आश्चर्य करीत पुढील व्यवस्थेला लागली. बाणभट्टाच्या कादंबरींतील शबर सेनापतीच्या भीषण दृष्टींतून सुटलेल्या व हारितानें सरोवरापासून आश्रमांत आणलेल्या शुकशावकाची पूर्वजन्मकथा जशी जाबालि मुनींनीं अंतर्ज्ञानानें जाणली होती तशीच गोपाळबोवांनीं या मुलाचीहि पूर्वकथा अंतर्ज्ञानानें जाणली होती.

त्या दिवशीं कृष्णाघाटावर कीर्तनाला अलोट गर्दी लोटली. कीर्तनाला गोपाळबोवांचें निमंत्रण आणि बालहरिदासाचें कीर्तन. मग काय सारा कृष्णाघाट माणसांनीं नुसता फुलून गेला. कीर्तनाचा पोशाख परिधान करून तो बालकीर्तनकार त्या अफाट जनसमुदायांत बसला होता. सारे लोक त्याच्याकडे कुतूहलानें बघत होते. ध्रुवाप्रमाणें निग्रही दिसणारा हा बालहरिदास कोण, कोठला आणि तो कसें कीर्तन करतो याविषयीं त्या समुदायांत कुतूहलपूर्ण कुजबूज सुरू होती. फराळ आटोपल्यावर गोपाळबोवा कृष्णाघाटावर आले. कीर्तनकाराचे साथीदारहि आपापल्या हत्यारांसह तेथें उपस्थित होते. गोपाळबोवांनीं मुलाला आपल्यासमोर बसविलें आणि त्याला तोंड उघडण्यास सांगितलें. मुलानें तोंड उघडल्यावर त्याच्या तोंडांत विभूति टाकून गोपाळबोवा म्हणाले, " बोवा, आज तुमचें कीर्तन आहे; रहा उभे आणि करा आरंभ. "

गोपाळबोवांच्या आज्ञेप्रमाणें मुलगा कीर्तनाला उभा राहिला. त्या मुलाचे पूर्वजन्मांतील संस्कार जागृत झाले. पूर्वजन्मींचे कोणतेहि संस्कार स्मरणरूपानें एकदां चित्तांत स्फुरूं लागले म्हणजे प्रस्तुत जन्माशीं संबंध नसलेल्या अनेक गोष्टी माणसाला स्मरूं लागतात. कोणत्याहि जन्मीं एकदां अंतःकरणावर एखाद्या प्रसंगाचें चित्र उमटलें किंवा संस्कार ठसले म्हणजे ते जन्मजन्मांतरीं कधीं पुसून जात नाहींत. सुप्त रूपानें ते अंतःकरणांत वावरत असतात. त संस्कार विस्मृतींत जरी दाखल झाले तरी एखाद्या विशिष्ट परिस्थितींत ते जागृत होतात आणि त्यानुरूप माणूस वर्तन करूं लागतो. सूर्योदयापूर्वीच जशा दिशा प्रकाशित होतात, त्याप्रमाणें योग्य मर्यादेपूर्वींच ज्ञानरूप सूर्याचा अरुणोदय अशा माणसाच्या ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येतो. अशा माणसाचा अधिकार कथन करतांना ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे कीं, " समाधि ही देखील अशा माणसाच्या मनाचा

पत्ता विचारीत येते." या मुलाचीहि गतजन्मींची अशीच योगभ्रष्ट अशी अवस्था असली पाहिजे.

गोपाळबोवांनीं त्या मुलाची ही अवस्था बरोबर हेरली आणि त्यांनीं त्या मुलाला कीर्तनाला उभा केला. कीर्तन सुरू झालें. मंगलचरणाला प्रारंभ झाला. पूर्वार्धांत अध्यात्मनिरूपण आणि त्याला अनुसरून उतरार्धांत आख्यान लावलें. ज्या मुलाला कधीं गायनाचा गंध नव्हता त्याच्या तोंडून तालबद्ध आणि सुरेल गायन बाहेर पडूं लागलें. एखाद्या कसलेल्या कीर्तनकाराप्रमाणें त्याचें कीर्तन झालें. त्याच्या कीर्तनावर सारा श्रोतृसमाज बेहद्द खूष झाला. कित्येक लोक आश्चर्यचकित झाले तर कित्येकांनीं त्याचें आनंदानें कौतुक केलें. कीर्तनाला त्या मुलाचें आई-बापहि आले होते. आपल्या मुलाचें तें प्रभावी कीर्तन ऐकून त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. मुलाला मारून घराबाहेर हाकलून दिल्याबद्दल त्याच्या बापाला मनस्वी दुःख झालें. आपल्या हातून भलताच प्रमाद घडला अशी हुरहूर त्यांना वाटूं लागली.

दुसऱ्या दिवशीं त्याचे आई-बाप गोपाळबोवांकडे गेले व मुलाला घरीं पाठविण्याबद्दल त्यांना विनवूं लागले. बोवा म्हणाले, " आतां मुलगा तुमचा राहिला नाहीं. हा मुलगा आतां कीर्तनें व त्याचबरोबर तीर्थयात्रा करीत हिंडणार आहे. त्याच्या कीर्तन-कीर्तीचा सर्वत्र डंका वाजणार आहे."

हें ऐकून मुलाच्या आई-बापांना एका बाजूनें आनंद व आश्चर्य वाटलें तर दुसऱ्या बाजूनें झाल्या प्रकाराबद्दल परमावधीचा खेद वाटूं लागला. मुलगा आतां आपल्याला कायमचा अंतरला असें वाटून त्याचे आई-बाप निराश झाले व दुःखित अंतःकरणानें घरीं परतले.

इकडे मठांत गोपाळबोवांनीं त्या मुलाला कीर्तनें करण्याची आज्ञा केली. त्यांची आज्ञा झाल्यावर त्या मुलानें गोपाळबोवांचा निरोप घेतला व ठिकठिकाणीं कीर्तनें करण्यास प्रारंभ केला. त्या मुलाचीं कीर्तनें इतकीं

रंगूं लागलीं कीं, विद्वान् लोकांनींहि आश्चर्यानें व कौतुकानें तोंडांत बोटें घातलीं. त्या मुलाची कीर्ति सर्वत्र फैलावली; आणि गोपाळबोवांनीं भविष्य केल्याप्रमाणें त्याच्या कीर्तीचा डंका सर्वत्र वाजूं लागला. पुढें हा मुलगा गाण्यांत व वाद्यें वाजविण्यांतहि निष्णात बनला. सारंगी हें त्या मुलाचें आवडतें वाद्य बनलें.

या मुलानें आपल्या वयाच्या बाराव्या वर्षापासून विसाव्या वर्षापर्यंत ठिकठिकाणीं कीर्तनें करून चांगलीच कीर्ति कमावली. आपल्या प्रवासांत हा मुलगा एकदां अक्कलकोटला गेला. तेथें त्यांनीं स्वामीजींचें दर्शन घेतलें. त्या वेळीं त्यांनीं त्याला काशीच्या कृष्णानंदांकडे जाण्याची अनुज्ञा दिली. त्याप्रमाणें या मुलानें काशीला जाऊन कृष्णानंदांचें दर्शन घेतलें. कृष्णानंद हे महान् आत्मसाक्षात्कारी व अंतर्साक्षी महापुरुष होते. या मुलाकडे पाहून ते म्हणाले, " अक्कलकोटच्या स्वामींना तुला संन्यास देतां येत नव्हता का ? तुला त्यांनीं माझ्याकडे कशाला पाठविलें ? बरें, आतां आलास तर रहा. उद्यां तुला संन्यास देऊं. "

कृष्णानंदांनीं त्याला दुसऱ्याच दिवशीं नैष्ठिक ब्रह्मचर्यांतून संन्यास-दीक्षा दिली व त्याला तीर्थयात्रा करीत रहाण्याची आज्ञा दिली. हा मुलगा सारंगी वाजविण्यांत प्रवीण असल्यामुळें त्याला लोक ' सारंगे संन्यासी ' म्हणत. या मुलाचें पूर्वाश्रमींचें नांव मात्र मला कधींच समजलें नाहीं.

त्या वेळीं आम्ही पुण्याला होतों. हे संन्यासी दरसाल आमच्या घरीं माझ्या वडिलांना भेटण्यासाठीं येत असत. गोरा वर्ण, नीट नाक, पाणीदार डोळे, उंची सुमारे पावणेसहा फूट आणि चेहरा तेजःपुंज आणि तरतरीत अशी त्यांची मूर्ति आजहि माझ्या डोळ्यांसमोर उभी असल्या-सारखी दिसते. माझ्या वडिलांच्या व त्यांच्या देवाधर्माच्या व अध्यात्म-विषयक गोष्टी चालत. मी त्या वेळीं दहा वर्षांचा होतो. आज माझें वय ८५ वर्षें पूर्ण झालेलें म्हणजे आज त्या गोष्टीला ७५ वर्षें झालीं. १८८५

सालचा सुमार होता, पण साऱ्या गोष्टी जणुं काय आजहि डोळ्यांसमोर उभ्या आहेत असा स्पष्ट भास होतो.

माझ्या वडिलांचाहि अध्यात्माविषयींचा अधिकार मोठा होता. अध्यात्मशास्त्रांतील बराच अनुभव त्यांच्या गांठीशीं होता. माझे वडील व सारंगे संन्यासी हे दोघेजण एकत्र गप्पा मारीत बसले म्हणजे त्यांच्या अध्यात्माविषयींच्या गप्पा कळण्याचें माझें वय नव्हतें तरी सारंगे संन्याशांविषयीं माझ्या मनांत त्या वेळीं जो आदर निर्माण झाला तो आजहि कायम आहे.

सारंगे संन्यासी यांची दिवसेंदिवस गायन-वादनांत चांगलीच प्रगति होत होती. चतुर्थाश्रम स्वीकारण्यापूर्वी नामांकित गवई, बजवय्ये, गाणाऱ्या कलावंतिणी यांच्याशीं त्यांचा दाट परिचय झालेला होता. ही सारी मंडळी संन्यासीबोवांना चांगलाच मान देत असत. अल्पवयांत त्यांनीं गायनवादनांत मिळविलेलें नैपुण्य पाहून सर्वांनाच त्यांच्याविषयीं एक प्रकारचें कौतुक व प्रेम वाटत असें.

त्या वेळीं पुण्यांत मिश्राजी या नांवाची एक अत्यंत सभ्य अशी कलावंतीण रहात होती. हिंदुस्थानांतलि प्रख्यात गवई तिचें गाणें ऐकण्यासाठीं मुद्दाम लांबून लांबून येत व तिचें गाणें ऐकून आपल्या कानांचें पारणें फेडून घेत. संन्यासग्रहणापूर्वीपासून सारंगे संन्यासी व मिश्राजी यांचा चांगलाच परिचय झाला होता. उभयतां गुणवान् व गुणज्ञ असल्यामुळें ते एकमेकांना अतिशय मान देत असत.

एकदां सारंगे संन्यासी पुण्याला आमच्या घरीं उतरले होते. तेव्हां माझ्या वडिलांचे आतेबंधू माझ्या वडिलांना भेटण्यासाठीं आले होते. ते रत्नागिरीला फौजदार होते. माझे वडील त्या वेळीं पुण्यांतलि फरास-खान्यांत शिरस्तेदार होते. दोघेहि गाण्याचे भारी शोकी. माझ्या वडिलांचा व मिश्राजीचा चांगला परिचय होता. माझ्या वडिलांना त्यांचे आतेभाऊ

म्हणाले, “ बाबा, तुझा व मिश्राजींचा परिचय आहे, तरी मला त्यांचें गाणें ऐकव कीं ! त्यांचें गाणें ऐकण्याची मला भारी इच्छा आहे. ”

यावर माझे वडील सारंगे संन्याशांना म्हणाले, “ महाराज, आज आपण आमच्याबरोबर मिश्राजींकडे आले पाहिजे. आज आपली मैफल करूं या ! ”

बाबांच्या या बोलण्यावर सारंगे संन्यासी हंसून म्हणाले, “ बाबा-साहेब, आम्ही आतां संन्यासी; आम्हांला कलावंतिणीकडे जाणें शोभेल कां ? ”

आणि थोडा वेळ थांबून ते पुढें म्हणाले, “ तरी पण तुमच्या मनाला धक्का बसूं नये म्हणून मी तुमच्याबरोबर येईन. ”

त्या दिवशीं रात्रीं आठ वाजल्यावर माझे वडील, त्यांचे आतेभाऊ व सारंगे संन्यासी असे त्रिवर्ग मिश्राजींकडे गेले. मी त्या वेळीं लहान असल्यामुळें आम्हांला कलावंतिणीकडे कोण नेणार ? पण त्या वेळेचा तो सारा प्रसंग मला चांगलाच आठवतो आणि माझ्या वडिलांनीं पुनः पुन्हां सांगितलेली मिश्राजींकडे घडलेली सारी हकीगत मला चांगलीच स्मरते.

त्या दिवशीं सारंगे संन्यासी आपल्या घरीं आलेले पाहून मिश्राजींना पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें व परमावधीचा आनंद झाला. त्या म्हणाल्या, “ महाराज, आपले पाय माझ्या घरीं कशानें लागणार ? केवळ बाबा-साहेबांच्या निमित्तानें आपण येथें आलांत, मी खरोखर धन्य आहें. ”

असें म्हणून त्यांनीं आपली जरीची शालजोडी त्यांना बसायला घातली. सर्व मंडळी बसल्यावर त्यांनीं तेथें जाण्याचा उद्देश सांगितला.

नंतर गवसणींतून सारंगी बाहेर निघाली व ती सारंगे संन्याशां-समोर ठेवण्यांत आली आणि बाईनीं स्वतः तंबोरा घेऊन त्या गाण्यास बसल्या. थोड्याच अवधींत रसरंगानें सारी मैफल न्हाऊन निघाली.

दोघेहि आपापल्या कलेंत निपुण. सारंगींत संन्यासीबुवांचा कोणी हात धरणारा नव्हता आणि गाण्यांत मिश्राजींच्या पंक्तीला बसण्याची कोणाची पात्रता नव्हती. तीन-साडेतीन तास मिश्राजी मनसोक्त गायल्या. संन्यासीबोवांनीं सारंगीची अप्रतिम साथ केली आणि श्रोतृवर्ग एकसारखा डोलत राहिला. बैठक अगदीं रंगून गेली. मिश्राजींच्या गाण्याचा व सारंगेबोवांच्या सारंगीच्या साथीचा अलभ्य लाभ घडल्यानें सारी मंडळी एक प्रकारच्या अनामिक समाधानांत घरीं परतली. पुढें कित्येक दिवस त्या अभूतपूर्व अशा मैफलीचें वर्णन आमच्या घरीं मुक्तकंठानें चाललेलें मीं ऐकलें होतें. प्रत्यक्ष मैफल ऐकली त्यांनीं. मला मात्र त्यांनीं केलेल्या वर्णनावरच समाधान मानावें लागलें. मलाहि संगीत-श्रवणाचा भारी नाद आहे. आणि पुढें जेव्हां मी स्वतः संगीताचे धडे घेतले तेव्हां लहानपणीं हुकलेल्या त्या मैफलीची हुरहूर मात्र माझ्या मनांत कायमची राहिली. मिश्राजींचें गाणें व सारंगेबोवांच्या सारंगीची संगत. हा मिलाफ ऐकण्याचा योग राहून गेला तो गेलाच. आयुष्यांत अशा किती तरी सुयोगांना माणसाला मुकावें लागतें हें मानवी आयुष्याचें तत्त्वज्ञान फक्त माझ्याजवळ शिल्लक आहे.

पुढें सारंगेबोवांनीं संन्यास घेतल्याचें आम्हांला समजलें. संन्यास-ग्रहणानंतर तिसऱ्या वर्षीं पुन्हां हा सत्पुरुष आमच्या घरीं आला. दोन दिवसांच्या मुक्कामानंतर ते वडिलांना एकदम म्हणाले, " बाबासाहेब, कदाचित् आपली ही भेट अखेरचीच ठरणार आहे. कारण ईश्वरी इच्छा तशी दिसत आहे. "

त्यांचे हे शब्द मी त्या वेळीं एकले खरे, पण माणसाला मरावें लागतें ही कल्पना त्या वयांत माझ्यापासून फारच दूर होती. थोर लोक क्वचित्प्रसंगीं अधांतरी किंवा दुर्बोध असें कांहीं तरी बोलतात, तशाच प्रकारचें तें बोलणें असावें, अशी माझी कल्पना झाली, पण त्यांचें तें बोलणें खरोखरच खरें ठरलें. पांच-सहा महिन्यांनीं सारंगे संन्यासी

समाधिस्त झाल्याची वार्ता आम्हांला कळली. ती दुःखद वार्ता ऐकून वडिलांच्या डोळ्यांना अश्रुधारा लागल्या. माणूस मरतो म्हणजे काय या गोष्टीची नेमकी कल्पना नसतांना देखील आम्हीं त्या वेळीं आमचे डोळे पुसले. सारंगे संन्यासी समाधिस्त झाल्याचें कळलें आहे व माझे बाबा रडत आहेत हा प्रसंग आजहि माझ्या डोळ्यांसमोर जसाच्या तसा स्पष्ट उभा आहे.

उद्बोधक स्थितीमुळें पूर्वजन्मींचे संस्कार जागृत होऊन चमकलेला हा तारा, वयाच्या केवळ चोविसाव्या वर्षीं आपली कीर्ति व स्मृति मागें ठेवून अस्तंगत झाला.

अनुक्रम 30862
विभाग आ.वी.
क्रमांक 2572
नों. दि.

## : ४ :

# हरिबुवा फलटणकर

* * * * * * *

या महापुरुषानें आमच्या घराण्यावर अनंत उपकार करून ठेवलेले आहेत. 'अवघें विश्वचि माझें घर' अशी या महात्म्याची वृत्ति होती. स्वतःच्या अंगावर हरिबुवांनीं कधीं कपडा घातला नाहीं किंवा आपल्या पोटापाण्याची त्यांनीं कधीं पर्वा केली नाहीं; परंतु दुसऱ्याच्या कपड्या-लत्त्याची व पोटापाण्याची त्यांनीं जन्मभर काळजी वाहिली. एखाद्या पक्ष्याप्रमाणें 'आज इथें तर उद्यां तिथें' याप्रमाणें त्यांचा संचार सदैव चालू असे. परमेश्वराला वस्तीचें एक ठिकाण कां असतें ? तो सर्वव्यापी आहे त्याप्रमाणें हरिबुवा हे खरोखरच सर्वव्यापी होते. त्यांच्या सर्वव्यापक-त्वाच्या कथा ऐकून तुम्ही अगदीं थक्क होऊन जाल. परमेश्वराप्रमाणेंच हरिबुवांना आदिअंत नव्हता. त्यामुळें कोणालाच त्यांचें जातगोत कधीं कळलें नाहीं किंवा त्यांच्या मूळ ठिकाणाचाहि कधीं पत्ता लागला नाहीं. त्यांना मल्याळी, तेलगू व मराठी या भाषा चांगल्याच अवगत होत्या. त्या त्या भाषेंत त्यांचें भजन सुरू झालें म्हणजे ते स्वतः तर रंगून जातच पण ऐकणारी मंडळीहि आपलें देहभान विसरून जात.

त्या गोष्टीला आज पंचाऐंशी वर्षें होऊन गेलीं. त्या वेळीं माझे वडील इंदापूरला फौजदार कचेरींत कारकून होते. तेव्हां माझ्या वडिलांचा व हरिबुवांचा तीन वर्षें अगदीं निकटवर्ति असा सहवास झाला. त्यांच्यादेखत हरिबुवांचे जे चमत्कार घडून आले ते वडिलांनीं मला सांगितले. त्यांची नोंद मीं करून ठेवलेली आहे. हरिबुवांना समक्ष बघण्याचा योग मला सहज आला असतां. कारण त्यांनीं समाधि घेतली तेव्हां मी चांगला पंचवीस वर्षांचा होतों. आज-उद्यां हरिबुवांच्या दर्शनाला जाण्याची भाषा मी त्या

वेळीं सतत करीत होतो. कारण वडिलांनीं सांगितलेले त्यांचे चमत्कार ऐकून त्या महापुरुषाचें दर्शन घेण्याची मला अनिवार इच्छा होई; पण माझी ती इच्छा पूर्ण होण्याच्या आधींच या महापुरुषानें समाधि घेतली आणि माझ्या मनांत त्यांचें दर्शन हुकल्याची हुरहूर कायमची घर करून राहिली.

माझ्या वडिलांचा व हरिबुवांचा जेव्हां निकटवर्ति संबंध आला त्या काळीं हिंदुस्थान देशावर इंग्रजांचें राज्य होतें. त्या वेळीं सर्वत्र सुबत्ता होती. पैशाला किंमत होती. येथें राज्य करतांना इंग्रजांनीं लोकांपाशीं चौकशी करून प्रत्येक माणसाला दरमहा किती खर्च येतो त्याचा हिशेब काढला होता आणि त्यानुसार सरकारी नोकरांचे पगार ठरवून दिले होते. शाळामास्तराचा पगार दरमहा चार रुपये असे व कारकुनाचा पगार दर-महा सात रुपये असे. माझ्या वडिलांचा नोकरीसाठीं अर्ज नसतांना त्यांची कारकुनीच्या जागेवर नेमणूक झालेली होती. नोकरी लागल्यापासून सहा-सात महिन्यांनीं त्यांना त्यांच्या हुषारीबद्दल एक रुपयाची बढती मिळाली. म्हणजे त्यांना दरमहा आठ रुपये पगार मिळूं लागला. परंतु एवढ्या पगारावर त्यांच्या कुटुंबाचा खर्च भागेना म्हणून नोकरी सोडण्याचे विचार त्यांच्या मनांत येऊं लागले.

त्याच सुमारास माझ्या वडिलांची व हरिबुवांची रस्त्यांत गांठ पडली तेव्हां हरिबुवांनीं त्यांना विचारलें, " काय रे बाबा खेर, तूं नोकरी सोडणार आहेस ? "

माझ्या वडिलांनीं उलट त्यांना विचारलें, " मी नोकरी सोडणार हें तुम्हांला कोणीं सांगितलें ? "

हरिबुवा म्हणाले, " मला कोणीं सांगावें लागतें का ? "

पुढें त्यांनींच वडिलांना विचारलें, " नोकरी कां सोडतोस ? "

"आठ रुपये पगारांत खर्च भागत नाहीं म्हणून नोकरी सोडून द्यावी असा मनांत विचार आला." या वडिलांच्या उत्तरावर हरिबुवांनीं पुन्हां विचारलें, "तुला किती पगार हवा?"

वडिलांनीं उत्तर दिलें, "निदान दरमहा तीस रुपये तरी मिळावेत."

यावर हरिबुवा पुन्हां म्हणाले, "नोकरी सोडूं नकोस. आजपासून एकोणिसाव्या दिवशीं तुला तीस रुपये पगार देतों."

आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, पुण्याचे पोलिस सुपरिंटेंडेंट कर्नल स्कॉट यांनीं माझ्या वडिलांच्या वरचे सहाशें लोक टाकून नक्की एकोणिसाव्या दिवशीं तीस रुपये दरमहा पगारावर वडिलांची डेप्युटी शिरस्तेदार म्हणून नेमणूक केल्याचा हुकूम सोडला.

हरिबुवांचा शब्द खरा झाला व भलतीच अनपेक्षित बढती मिळाल्यामुळें माझ्या वडिलांच्या व तदनुषंगानें आमच्याहि आयुष्याचा रंगच पार पालटून गेला. पुढें वडिलांनीं मॅजिस्ट्रेटची परीक्षा दिली व नंतर सोळा वर्षें मॅजिस्ट्रेट म्हणून काम करून ते सेवानिवृत्त झाले. हरिबुवांच्या कृपेनें आमच्या वडिलांना बढती मिळाल्यानें आम्हां उभयतां बंधूंचें शिक्षण पुरें होऊन आम्ही दोघेहि वकील झालों व पुढें आम्ही आपल्या मुलांनाहि शिक्षण देऊं शकलों. अशा रीतीनें आमच्या कुटुंबाला ऊर्जितावस्था येण्याला हरिबुवांची कृपाच कारणीभूत झाली.

हरिबुवांची एकंदर वृत्तीच फकिरी होती. त्यांनीं कोणाकडून कसलीहि अपेक्षा कधीं केली नाहीं. त्यांची एखाद्या व्यक्तीवर कां कृपा होई व अन्य एखाद्या व्यक्तीवर कां अवकृपा होई हें सांगणें कठीण आहे. माझ्या वडिलांच्यावर त्यांची कृपा झाली या गोष्टीला एकच कारण सांगतां येण्यासारखें आहे. तें म्हणजे माझ्या वडिलांची त्यांच्यावर अपार भक्ति होती म्हणून कदाचित् ते हरिबुवांच्या कृपेला पात्र ठरले असतील. माझ्या

वडिलांनीं त्यांच्या ज्या बारीक-सारीक आठवणी मला सांगितल्या आहेत त्यांवरून माझ्या वडिलांचें व त्यांचें हार्दिक नातें जडलें होतें यांत कांहीं संशय दिसत नाहीं. एकदां एखाद्या व्यक्तीवर हरिबुवांची कृपा झाली म्हणजे ते त्या व्यक्तीला कधींहि अंतर देत नसत. ते त्या व्यक्तीच्या नेहमीं पाठीशीं असत.

एकदां माझे वडील सकाळींच कांहीं कामासाठीं घरांतून बाहेर पडले. रस्त्यानें जातांना सूर्यकिरणांत चांदीचा पत्रा समोरच रस्त्यावर चकाकत असलेला त्यांना दिसला. इकडेतिकडे पाहून त्यांनीं तो पत्रा उचलून घेतला आणि तो न्याहाळून बघितला. त्या पत्र्यावर मारुतीची प्रतिमा कोरलेली होती. त्यांनीं तो टांक आपल्या खिशांत घातला आणि वर चंची ठेवली. फिरतां फिरतां ते पेठेंत गेले असतांना एका दुकानांतून हरिबुवांनीं त्यांना हांक मारली तेव्हां ते आंत गेले. हरिबुवांनीं त्यांना खिशांत काय आहे म्हणून हंसत विचारलें.

यावर वडील म्हणाले, "कांहीं नाहीं, चंची आहे!"

हरिबुवांनीं पुन्हां विचारलें, "अरे, चंचीच्याखालीं काय आहे? तो तांबडतोंड्या, लांब शेपट्या, काढ त्याला बाहेर."

आपल्या खिशांत मारुतीचा टांक ठेवल्याचें वडिलांना स्मरण झालें आणि तो टांक त्यांनीं खिशांतून काढून हरिबुवांच्या हातांत दिला. त्यांनीं तो आपल्याजवळ घेतला आणि त्याला डोक्या-खांद्यावर ठेवून बराच वेळ हरिबुवा नाचत राहिले; त्यांना अत्यानंद झालेला दिसत होता. मग तो मारुतीचा टांक माझ्या वडिलांच्याजवळ देऊन हरिबुवा म्हणाले, "आज शनिवार, महाराजांचा वार आहे. आजपासून दर शनिवारीं तूं उपोषण करीत जा; आणि संध्याकाळीं मारुतीसमोर उदबत्ती-कापूर लावून उपास सोडीत जा. मारुतीराया तुझें कल्याण करील."

त्या दिवशीं हरिबुवांच्या आज्ञेप्रमाणें वडिलांनीं उपोषण केलें. संध्याकाळीं हरिबुवांनीं जेवायला यायचें कबूल केलें होतें. त्याप्रमाणें ते जेवायला आले होते. त्यांचें जेवण झाल्यावर मग वडिलांनीं उपवास सोडला. त्या दिवसापासून आयुष्याच्या अखेरपर्यंत :म्हणजे चाळीस वर्षें वडील शनिवारचा उपवास करीत असत. हरिबुवांच्या सांगण्याप्रमाणें वडिलांचा काळ सुखांत जाऊन प्रपंचहि व्यवस्थित झाला. त्यांना कधीं कसलीहि वाण पडली नाहीं. परमेश्वरावर अनन्यसाधारण श्रद्धा ठेवली म्हणजे परमेश्वर आपल्या भक्ताला कांहींहि उणें पडूं देत नाहीं, हा माझ्या वडिलांचा विश्वास आयुष्याच्या अखेरीपर्यंत बळकट होता.

त्याच सुमारास इंदापुरांत नरसिंगराव देशपांडे या नांवाचे एक सुखवस्तु गृहस्थ रहात होते. ते हरिबुवांचे निस्सीम भक्त होते. हरिबुवांचें दर्शन घेतल्यावांचून अन्न ग्रहण करावयाचें नाहीं असा त्यांचा निर्धार होता. एकदां नरसिंगराव देशपांडे यांना विषमज्वराचें दुखणें झालें. आठ-दहा दिवस झाल्यावर त्यांची शुद्ध हळूहळू कमी होत चालली; पण बेशुद्धावस्थेंत हरिबुवासंबंधींच त्यांची एकसारखी बडबड सुरू होती. ताप उतरण्याचें चिन्ह कांहीं केल्या दिसेना. अशा तऱ्हेनें विषमज्वराचे बेचाळीस दिवस उलटले. सर्वांनीं त्यांची आशा सोडली. बेचाळिसाव्या दिवशीं रात्रीं दहा-अकरा वाजण्याची वेळ होती. नरसिंगरावांच्या पुढील दरवाजावर कोणी तरी थाप मारल्याचा आवाज घरांतील माणसांना ऐकूं आला. दार उघडलें. बाहेरून हरिबुवा आंत आले ते थेट नरसिंगरावांच्या छातीवर बसले आणि म्हणाले, " माझा इतका ध्यास कां करीत होतास ? तूं काय मरतोस का ? "

असें म्हणून त्यांनीं नरसिंगरावांचे दोन्ही हात धरून खसकन् त्यांना उठविलें. या प्रकारानंतर नरसिंगरावांनीं डोळे उघडले, त्यांचा ताप निघाला आणि ते म्हणाले, " मला भूक लागली आहे हो ! मला कांहीं तरी खायला द्या. "

हरिबुवा म्हणाले, "याला भात खायला द्या, म्हणजे चांगली झोंप लागेल. आतां याचें दुखणें गेलें."

नरसिंगराव पुढें थोड्याच दिवसांत पूर्ण बरें झालें.

* * *

इंदापुरांत विष्णुदास नागर या नांवाचे एक व्यापारी होते. आम्हांला कांहीं चमत्कार दाखवा असा त्यांचा हरिबुवांच्या मागें नेहमीं तगादा असे. हरिबुवा म्हणत, "तुला चमत्कार कशाला पाहिजेत? तूं आपला व्यापार सांभाळ आणि पैसे मिळवीत रहा."

तरी चमत्कार दाखविण्याबद्दल विष्णुदासांचा हरिबुवांच्या मागें एकसारखा तगादा चालूच होता. एका अमावस्येच्या रात्रीं हरिबुवा विष्णुदासांच्या घरासमोर गेले व त्यांनीं विष्णुदासांना हांक मारली. हांकेसरशीं विष्णुदास बाहेर आले. हरिबुवांनीं त्यांना विचारलें, "तुला चत्मकार पहायचा आहे ना? कपडे घालून ये आणि चल माझ्याबरोबर!"

विष्णुदासांना आनंद झाला आणि घरांत जाऊन ते कपडे घालून आले. हरिबुवांनीं त्यांना गांवाबाहेर एका शेतांत नेलें, व ते त्यांना म्हणाले, "आतां तुला चत्मकार दाखवतो तो नीट पहा, पण घाबरूं नकोस."

असें म्हणून हरिबुवा उंच वाढूं लागले. विष्णुदास त्यांच्याकडे पहात होते. इतक्यांत ते आपल्या डाव्या व उजव्या बाजूनें आडवे वाढूं लागले. हरिबुवांची उंची चांगली वीस फूट वाढली आणि त्यांच्या शरिराची रुंदी पंधरा फूट झाली. तें विलक्षण दृश्य पाहून विष्णुदास घाबरले व त्यांना चक्कर येऊं लागली. इतक्यांत हरिबुवांच्या चेहऱ्यासभोंवतालीं डोळे दिपविणारा सूर्यासारखा लख्ख प्रकाश पडला आणि तो पाहिल्याबरोबर विष्णुदास देहभान विसरून जमिनीवर धाडकन् पडले.

सुमारें अर्ध्या तासानें विष्णुदास शुद्धीवर आले. त्यांनीं भेदरलेल्या नजरेनें सभोंवार बघितलें. तुकतेंच पाहिलेलें दृश्य अद्यापहि त्यांच्या

डोळ्यांसमोर होतें. नंतर कांहीं वेळानें त्यांना हरिबुवाहि दिसले नाहींत आणि दुसरेहि कोणी दिसलें नाहीं. मग विष्णुदास मनस्वी घाबरले व त्याच अवस्थेंत पळत सुटले; आणि एक-दीड फर्लांग अंतरावर असलेल्या कुंभारगांव टोलनाक्यावर जाऊन पोहोंचले. पळतां पळतां एक-दोनदां ठेंच लागून पडल्यामुळें त्यांच्या गुढग्यांना व हातांना दुखापती झालेल्या होत्या. त्यामुळें त्यांनीं ती रात्र नाक्यावरच कशीबशी काढली. सकाळीं ते आपल्या घरीं गेले आणि जखमांवर हळदबोळ घालून शेकत बसले. इतक्यांत हरिबुवा त्यांच्याकडे गेले आणि विष्णुदासांना म्हणाले, " काल रात्रीं कशी गंमत झाली ! "

विष्णुदास म्हणाले, " तुमची गंमत झाली पण माझे मात्र गुढगे फुटले. "

हरिबुवा म्हणाले, " मी तुझ्याजवळ राहून तुला चमत्कार दाखवीत होतो. तूं घाबरलास कां ? तूं घाबरला नसतास तर तुला पुरा चमत्कार दिसला असता. तुला आणखी चमत्कार पहायचा आहे का ? "

विष्णुदासांनीं यावर म्हटलें, " आतां मला चमत्कार नकोत. तुमचा एक चमत्कार पाहूनच माझी हौस पुरी फिटली. "

* * *

एखाद्या दिवशीं सकाळीं मुलें शाळेंत जात असतांना हरिबुवा वाटेंत भेटले म्हणजे मुलें त्यांच्या मागें लागत व मग हरिबुवा पळत सुटत. ' हरि वेडा पळाला, हरि वेडा पळाला ' असें ओरडत मुलें त्यांच्या मागें पळत. अशा वेळीं ते कधीं कधीं निवडुंगाच्या वाडींत शिरून निवडुंगाच्या कांट्यांवर खुशाल पडून रहात किंवा एखाद्या विहिरींत उडी टाकीत आणि पाण्यांत बुडून बसत. मग संध्याकाळपर्यंत पाण्यांतून वर डोकें काढीत नसत. हरिबुवा सकाळपासून विहिरींत शिरले आहेत हें

कळल्यावर सारे गांवकरी विहिरीच्या कांठावर गोळा होत. कांहीं लोक तर विहिरींत उड्या टाकून त्यांच्या शोधार्थ विहीर ढवळून काढीत पण त्यांचा पत्ता लागत नसे. मग संध्याकाळीं दिवे लागणीच्या सुमारास हरिबुवा हळूच आपलें डोकें पाण्यावर काढीत आणि सर्वांना चकित करून सोडीत. कधीं कधीं शंकराच्या देवळांत पंचवीस-तीस दिवस हरिबुवा डोळे सताड उघडे ठेवून एका कुशीवर पडून रहात. त्या अवधींत त्यांचे सारे नैसर्गिक व्यवहार बंद असत.

एकदां हरिबुवांचा मुक्काम टेंभुर्णीला होता. हरिबुवांच्या पाठीमागें गांवांतील लहान मुलें नेहमींच लागत. एकदां गांवांतील व्यापाऱ्यांच्या मुलांनीं त्यांना एका लहानशा कापडाच्या दुकानांत सकाळच्या प्रहरीं कोंडून ठेवलें व बाहेरून कुलूप ठोकलें. त्या मुलांच्या वडील मंडळींना ही हकीगत समजली तेव्हां त्यांनीं दुकानाचें दार उघडलें आणि दुकानांत पाहिलें तेव्हां हरिबुवा त्या ठिकाणीं दिसले नाहींत. हरिबुवा दुकानांतून कसें नाहींसे झाले याबद्दल मंडळी आश्चर्य व्यक्त करूं लागली. हरिबुवांना लहान मुलांनीं दुकानांत कोंडले व दुकान उघडल्यावर ते त्या ठिकाणीं दिसले नाहींत, ही बातमी गांवांत वाऱ्यासारखी पसरली; आणि त्या दुकानाभोंवतीं लोकांची गर्दी जमली. इतक्यांत पंढरपुराहून एक गृहस्थ तेथें आला. इतकी मंडळी कां जमली असें त्यानें विचारलें तेव्हां त्याला समजलें कीं, हरिबुवांना दुकानांत कोंडून ठेवलें होतें पण तेथून ते नाहींसे झाले. तो गृहस्थ म्हणाला, " तो हरि वेडा ना ? तो तर दुपारीं बारा वाजतां पंढरपूरच्या बाजारांत हिंडत होता. "

नंतर टेंभुर्णीहून कांहीं भाविक मंडळी पंढरपुराला गेली व हरिबुवांना पुन्हां टेंभुर्णीला येण्याबद्दल आग्रह करूं लागली तेव्हां हरिबुवा त्यांना म्हणाले, " तुम्ही मला कोंडून ठेवतां. आतां तुमचे बाप आले तरी तुमच्या गांवाला मी येणार नाहीं. "

हरिबुवा कधीं कधीं फारच अचाट कृत्यें करीत. इंदापूरला असतांना एकदां ते वाण्याच्या दुकानांत बसले होते. तेथें बिब्यांनीं भरलेली एक पिशवी होती. त्यांनीं त्यांतले बरेच बिब्बे घेतले. ते एका लोखंडी वजनावर ठेवून दुसऱ्या वजनानें चांगलें ठेचले आणि त्यांतून त्यांनीं बरेंच तेल काढलें. तेल काढल्यावर त्यांनीं तें आपल्या शरिराच्या नाजूक भागावर व सर्वांगाला चोळून चोळून लावलें. माझ्या वडिलांनीं त्यांना विचारलें,

" हरिबुवा, तुम्ही हें काय करतां ? "

हरिबुवा म्हणाले, " गंमत करतों. "

वडील म्हणाले, " बिब्बा उतेल आणि तुम्हांला त्रास होईल. "

यावर हरिबुवा फक्त ' राम, सीता, लक्ष्मण ' एवढेंच म्हणाले.

दुसऱ्या दिवशीं वडिलांची व हरिबुवांची गांठ पडली तेव्हां हरिबुवांच्या शरिरावर बिब्याच्या तेलाचा एकहि डाग नव्हता.

* * *

हरिबुवा इंदापुराहून सरकत सरकत बारामती व तेथून पंधारें या गांवीं गेले. तेथें सहा-सात वर्षें राहिल्यावर पुढें ते पंढरपुरांत कांहीं दिवस राहून शिंगणापूरला गेले. तेथेंहि त्यांनीं बराच काळ घालविला; आणि नंतर ते फलटणला आले. फलटण येथें ते सुमारें पंचवीस वर्षें होते. फलटणला बराच काळ त्यांचें वास्तव्य होतें म्हणून त्यांना सारे लोक हरिबुवा फलटणकर म्हणत.

हरिबुवा फलटणला आल्यावर त्यांनीं कोणाच्याहि घरांत शिरावें आणि सामान इकडेतिकडे फेकून द्यावें, नासधूस करावी असा प्रकार चालू होता. खरोखरच ते जन्मजात विदेही अवस्थेंत होते. नग्न स्थितींत गांवभर हिंडावें व रस्त्यावरून जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांना त्रास द्यावा, त्यांच्या डोक्यावर घाण टाकावी, त्यांचे कपडे मळवावेत, मुलांशीं खेळावें, त्यांची कांहीं तरी गंमत करावी, अशी त्यांची कालक्रमणा सुरू असे. लोक त्यांना

'वेडा हरि' म्हणत; व त्यांच्या पाठीमागें लागून आपली करमणूक करून घेत. पण कांहीं वेळां हरिबुवांचा त्रास अनावर होई. एकदां गांवांतील लोकांनीं हरिबुवांच्याविरुद्ध सरकारांत तक्रार केली. पोलिसांनीं चौकशी करून त्यांच्यावर उडाणटप्पूपणाचा खटला भरला. खटला रीतसर कोर्टांत चालला; आणि हरिबुवांना सहा महिन्यांची शिक्षा ठोठावण्यांत आली. त्यांना कोठडींत ठेवलें व कोठडीला कुलूप लावून पहारेकरी बाहेर पडला. लगेच हरिबुवा कोठडीबाहेर पडले आणि पाठीमागून त्या पहारेकऱ्याचा डगला धरून हरिबुवांनीं त्याला ओढलें. पहारेकऱ्यानें मागें पाहिलें तेव्हां हरिबुवा मागें उभे असलेले दिसले. पहारेकऱ्यानें त्यांच्याकडे नीट न्याहाळून बघितलें. तेव्हां हरिबुवा त्याला उद्देशून म्हणाले, "तुझ्या बापाला आंत रहाणार नाहीं." पहारेकरी अगदीं थक्क होऊन गेला. त्याला वाटलें, आपण कोठडीला कुलूप लावलें नसावें. त्यानें कुलपाकडे बघितलें. तेव्हां कुलूप लावलेलें दिसलें. आपल्याला कांहीं तरी भ्रम झालेला असावा असें वाटून त्यानें पुन्हां कोठडीचें कुलूप उघडलें आणि हरिबुवांना आंत टाकून त्यानें कोठडीला नीट कुलूप घातलें. त्या पहारेकऱ्याची पाठ फिरली तोंच पुन्हां हरिबुवा त्याच्यामागें उभे राहिले आणि पुन्हां म्हणाले, "तुझ्या बापाला आंत रहाणार नाहीं. तुला काय वाटलें !"

हा सारा प्रकार पाहून पहारेकरी खरोखरच दिङ्मूढ होऊन गेला. त्यानें संस्थानच्या कारभाऱ्यांना निरोप धाडला. त्या वेळीं भालचंद्र कृष्ण बापट या नांवाचे संस्थानचे कारभारी होते. तुरुंगाच्या पहारेकऱ्याचा निरोप मिळाल्यावर ते स्वतः कोठडीपाशीं आले आणि स्वतःदेखत त्यांनीं हरिबुवांना कोठडींत कोंबलें. कुलूप लावून मंडळी दूर उभी राहिली तोंच हरिबुवा त्यांच्यासमोर हजर झाले. असा प्रकार दोनदां घडल्यावर कारभाऱ्यांनीं खुद्द राजेसाहेबांना बोलावणें पाठविलें. राजेसाहेब तडक तुरुंगांत येऊन दाखल झाले आणि हरिबुवांच्या पायां पडून म्हणाले,

" आपला अधिकार आम्हांला कळला नाहीं. आम्हांला क्षमा करा." याप्रमाणें हरिबुवांची क्षमा मागून राजेसाहेबांनीं हरिबुवांना राजवाड्यांत नेलें.

हरिबुवा राजवाड्यांत एक वर्षभर राहिले. राजेसाहेबांची त्यांच्यावर अपार भक्ति जडली. पहारेकऱ्यांनीं त्यांच्यावर सक्त नजर ठेवावी व त्यांना कोठेंहि जाऊं देऊं नये अशी राजेसाहेबांनीं खास व्यवस्था केली होती. कारण असा थोर सत्पुरुष राजवाड्यांत कायमचा राहिला तर आपलें कोटकल्याण होईल, असा राजेसाहेबांना विश्वास वाटत होता. परंतु एके दिवशीं ही स्वारी राजवाड्यांतून अचानक नाहींशी झाली आणि शेजारींच मलठणांत प्रगट झाली. ही गोष्ट जेव्हां राजेसाहेबांना समजली तेव्हां त्यांना अतिशय वाईट वाटलें. त्यांनीं हरिबुवांना पुन्हां राजवाड्यांत आणण्याचा प्रयत्न केला, पण हरिबुवा राजवाड्यांत पुन्हां कधींहि परतले नाहींत.

हरिबुवांचें फलटणांत वास्तव्य असतांना त्यांनीं असंख्य चमत्कार केले. ते सारेच चमत्कार मी नमूद करीत नाहीं. वानगीदाखल कांहीं चमत्कार सांगतों. कोणाचा कसलाहि रोग बरा करणें, हा हरिबुवांचा अगदीं हातखंडा असे. फलटणांत श्रीधर गोसावी या नांवाचा एक यजुर्वेदी ब्राह्मण रहात असे. त्याला आबा नांवाचा मुलगा होता. हरिदासी वृत्ति व गायनकला यामुळें या घराण्याची ख्याति होती. एकदां आबाला महामारीनें गांठलें. ढाळ, वांत्या होऊन तो मृत्युपंथाला लागला. अखेरीस त्याला थोडी धुगधुगी राहिली असतां त्याला घोंगडीवर काढून ठेवलें. खूप औषधें करूनहि गूण आला नाहीं याबद्दल सर्वांना अतिशय वाईट वाटलें. सर्वांनीं त्याची आशा सोडली. आबाला दोन मुले व एक सून होती. हें संकट टळावें म्हणून त्या सर्वांनीं हरिबुवांचा मनोभावें धांवा केला व सर्व मंडळी उदासवृत्तीनें आबाच्या बिछान्याजवळ अश्रु ढाळीत बसली. त्या वेळीं हरिबुवा अचानक तेथें आले व त्यांनीं

आबाचा हात धरला. पुष्कळांनीं तो सोडविण्याचा प्रयत्न केला पण कांहीं केल्या हरिबुवा त्याचा हात सोडीनात. त्यांनीं आबाला उठवून उभा केला. आबा पडूं नये म्हणून तेथें असलेल्या कांहीं माणसांनीं आबाला धरलें. हरिबुवा आबाला कडकडून भेटले आणि त्याला सोडून देऊन त्याच्या कपाळाला माती लावून ते निघून गेले. हरिबुवा निघून गेल्यावर आबाला सपाटून रेच झाला आणि त्याचा कोठा साफ झाला. थोड्या वेळानें आबा शुद्धीवर आला आणि म्हणाला, " मला फार भूक लागली आहे; मला खायला द्या."

त्याला मग घोंगडीवरून उचलून स्नान घातलें व स्वच्छ गादीवर निजविलें. थोडें खाऊन पाणी प्याल्यावर त्याला चांगली झोंप लागली. जागा झाल्यावर त्याला चांगली हुषारी वाटूं लागली व पुढें लवकरच तो खडखडीत बरा झाला. हरिबुवांनीं आबाला केवळ मृत्यूच्या दाढेंतून बाहेर काढून त्याचा जीव वांचविला यामुळें लोकांना मोठेंच आश्चर्य वाटूं लागलें व त्यांच्या अलौकिक सामर्थ्याबद्दल सर्वांची खात्री पटली.

* * *

हरिबुवांची निसर्गावरहि अधिसत्ता चालत असे. फलटणला आबा गोसावी यांचा मुलगा एकदां मार्तंडबुवांच्या घरीं गप्पागोष्टी करण्यास गेला असतांना तेथें हरिबुवा आले. मार्तंडबुवांचा मुलगा, आबाचा मुलगा व हरिबुवा यांच्या गप्पागोष्टी चालू होत्या. बोलतां बोलतां मार्तंडबुवांचा मुलगा सहज हरिबुवांना म्हणाला, " भाद्रपदाचा महिना गेला, अजून पाऊस पडत नाहीं. पावसावांचून लोक हवालदिल झाले आहेत. पाऊस पडला तर ठीक होईल."

हें ऐकतांच हरिबुवांनीं डोळे लाल केले आणि जवळच असलेला बत्ता लांब भिरकावून दिला. हरिबुवांचें तें उग्र स्वरूप पाहून आबाचा मुलगा आपल्या घरीं पळून गेला. मार्तंडरावांचा मुलगाहि आपल्या

परसांत पळून गेला आणि त्यानें परसाचें दार बंद करून घेतलें. दोघेहि अगदीं घाबरून गेले होते. हरिबुवांनीं दाराला धक्के दिले व "तुला पाऊस पाहिजे ना?" असें म्हणून ते आबाच्या घरीं गेले. आबाचा मुलगा घरांत दार लावून बसला होता. तेथें येऊन त्यांनीं दारावर दोन-तीनदां थाप मारली व म्हटलें, "तुला पाऊस पाहिजे तर हा घे."

थोड्या वेळानें हरिबुवा गेले असतील असें समजून आबाचा मुलगा मार्तंडबुवांच्या घरीं आला व घरीं घडलेली हकीगत त्यानें मार्तंडबुवांच्या मुलाला सांगितली. त्या दोघांनींहि हरिबुवांना अशा भीषण स्वरूपांत कधीं पाहिलें नव्हतें. सायंकाळ होतांच पूर्व बाजूला विजा चमकूं लागल्या; मेघांचा गडगडाट सुरू झाला, वारा सुटला आणि पर्जन्यवृष्टीला प्रारंभ झाला. पुढे तीन दिवस एकसारखी पर्जन्यवृष्टि सुरू होती. पाऊस आल्यानें सगळीकडे आनंदीआनंद झाला. हरिबुवांचें सांगणें तंतोतंत खरें ठरलें म्हणून लोकांची त्यांच्याविषयींची भक्ति अधिकच वाढली.

* * *

फलटणांत दगडू या नांवाचा एक सहा वर्षांचा मुलगा होता. तो पांगळा असल्यामुळें त्याचे आईबाप त्याला रस्त्यावर जाऊं देत नसत. एखादे वेळीं आईबापांची नजर चुकवून हळूच तो बाहेर पडत असे. एकदां असाच रस्त्यांत लहान मुलांबरोबर तो खेळायला गेला. त्या वेळीं त्या रस्त्यानें हरिबुवांची स्वारी त्या ठिकाणीं आली. हरिबुवांना भिऊन सर्व मुलें भराभर आपापल्या घरीं पळून गेलीं पण दगडू पांगळा असल्या-मुळें त्याला पळतां येईना. तो भिऊन जागच्या जागींच बसून राहिला. हरिबुवा त्याच्या जवळ आले आणि त्याच्या डोक्यावर हात फिरवून ते म्हणाले, "अरे, तुझे सर्व सोबती पळून गेले. तूं येथें कां बरें स्वस्थ बसलास? जा, घरीं जा."

हरिबुवांचे हे शब्द ऐकतांच आपण पांगळे आहोंत या गोष्टीचा त्याला विसर पडला आणि तो उठून पळत पळत घरीं गेला. त्या दिवसापासून दगडूचा पंगूपणा पार नाहींसा झाला आणि इतर मुलांप्रमाणें तो चांगला चालूं लागला. सर्वांना या गोष्टीचें अत्यंत आश्चर्य वाटलें.

* * *

हरिबुवांचे एकेक चमत्कार पाहून फलटणला लोक त्यांना मान देऊं लागले होते, पण अद्यापहि कांहीं लोक त्यांना वेड्यांतच काढीत होते. त्या सुमारास गणेश वाळिंबे या नांवाचे एक वकील फलटणांत राहात होते. त्यांच्या घरांतील काम करणारी एक बाई नदीवर कामासाठीं गेली असतांना हरिबुवांनीं नदींत दगड फेकण्यास सुरुवात केली. एक दगड त्या बाईजवळ येऊन पडला व त्यामुळें तिच्या अंगावर पाणी उडून तिचें कपडे भिजले. ती बाई शिव्या देत घरीं वकीलांना गाऱ्हाणें सांगण्यासाठीं गेली. ती हकीगत ऐकून वकिलांना फार राग आला. ताबडतोब नदीवर जाऊन त्यांनीं हरिबुवांचा हात धरला व ते हरिबुवांना म्हणाले, " तुम्हीं याच हातानें दगड फेकला नाहीं कां ? चला आतां त्या हाताचा चांगलाच समाचार घेतों. "

असें म्हणून त्या वकिलांनीं हरिबुवांचा हात एका दगडावर ठेवून दुसऱ्या दगडानें हरिबुवांचा हात ठेचण्यास त्यांनीं सुरुवात केली. अखेरीस हरिबुवांच्या हाताचा त्या वकिलांनीं चेंदामेंदा केला.

हरिबुवांचा हात रक्तबंबाळ झालेला पाहून दोन-तीन माणसांनीं जवळ जाऊन हरिबुवांचा हात सोडवून घेतला. मग त्या माणसांनीं हरिबुवांना कारभाऱ्यांकडे नेलें व झालेला सर्व प्रकार त्यांना निवेदन केला.

कारभाऱ्यांनीं हरिबुवांना विचारलें, " आपणांला कोणी मारलें ? "

या प्रश्नावर हरिबुवांनीं फक्त ' विठ्ठल, विठ्ठल ' एवढेंच शब्द उच्चारले. कारभाऱ्यांनीं त्यांना त्यांच्या वडिलांचें नांव, आडनांव, गांवाचें

नांव इत्यादि माहिती विचारली. त्यावरहि हरिबुवा फक्त ‘ विठ्ठल, विठ्ठल ’ एवढेंच म्हणाले.

या प्रसंगानंतर बरोबर एक महिन्याच्या आंत वाळिंबे वकील वारले. लोक म्हणाले, “ हरिबुवांना मारल्याचें प्रायश्चित्त वकिलांना मिळालें.”

* * *

हरिबुवांच्याबद्दलचे वरील दोन-तीन चमत्कार त्यांच्या त्रोटक चरित्रांतून येऊन गेले आहेत, पण माझ्या वडिलांच्या तोंडून त्यांचा उच्चार मी कधीं ऐकलेला मला स्मरत नाहीं. किंबहुना हरिबुवा फलटणला गेल्यानंतरचे त्यांचे चमत्कार माझ्या वडिलांना फारसे माहीत नसावेत. कारण त्यांचा व हरिबुवांचा निकटवर्ति संबंध त्या वेळीं राहिलेला नव्हता. माझ्या वडील बंधूंनीं हरिबुवांसंबंधीं सांगितलेलीं पुढील आठवण मात्र मला चांगलीच स्मरते. त्या आठवणींतील कांहीं दुवे माझ्या स्मरणांतून निखळले आहेत परंतु त्या आठवणींतील हरिबुवांचा अलौकिक चमत्कार मात्र माझ्या कायमचा लक्षांत राहिला आहे. माझ्या मतानें हरिबुवांच्या चमत्कारांचा तो कळसच मानावा लागेल.

एका गांवीं एक भिक्षुक ब्राह्मण रहात होता. त्या गांवाचें नांव मात्र मी विसरून गेलों आहें. वयाच्या साठ वर्षांनंतर माणसाची स्मृति हळूहळू क्षीण व्हायला लागते, असें म्हणतात; पण माझ्या बाबतींत निसर्गानें—नव्हे परमेश्वरानेंच मला पक्क्या स्मृतीचें वरदान दिलेलें दिसतें. अर्थात् वयाला ८५ वर्षें उलटून गेल्यानंतर एखाद्या गोष्टींतील एखाद्या घटनेचा धागा तुटून जावा, ही गोष्ट अगदीं अपरिहार्य आहे. क्षम्य तर आहेच आहे. माझ्या वडील बंधूंनीं सांगितलेल्या हरिबुवांच्या आठवणींतील गांवाचें नांव मला मुळींच स्मरत नाहीं, पण त्यामुळें गोष्ट कांहीं अडणार नाहीं.

त्या गांवीं रहाणारा भिक्षुक ब्राह्मण रोज सकाळीं स्नानसंध्या, देवपूजा करून हरिबुवांच्या दर्शनाला नियमानें जात असे. एकदां महोदयपर्वाच्या निमित्तानें त्या गांवांतील कांहीं मंडळी काशी येथें गंगास्नानासाठीं गेली. महोदयपर्वाच्या दिवशीं तो ब्राह्मण नित्यनियमाप्रमाणें हरिबुवांच्या दर्शनाला गेला असतां त्यांनीं त्याला विचारलें, " अरे, गांवांतील कांहीं लोक काशीला गेले, तूं कां नाहीं गेलास ? "

त्या ब्राह्मणानें उत्तर दिलें, " महाराज, जीं माणसें काशीला गेलीं तीं श्रीमंत आहेत. मी गरीब, मला काशीयात्रेचें आणि गंगास्नानाचें पुण्य कोठून घडणार ? "

हरिबुवा म्हणाले, " येतोस कां माझ्याबरोबर ? मी तुला काशीला नेतों. "

त्या ब्राह्मणानें 'होय' म्हटलें तेव्हां हरिबुवांनीं त्याचा हात धरला आणि त्याला डोळे मिटण्यास सांगितलें. थोड्याच वेळांत त्याला हरिबुवांनीं डोळे उघडण्यास सांगितलें. तो ब्राह्मण डोळे उघडून पहातो तों आपण एका घाटावर उभे असून समोर मोठ्या नदीचें पात्र त्याला दिसलें. नदीचें पाणी दुथडी भरून वहात होतें. ब्राह्मण अगदीं चकित होऊन गेला.

तो ब्राह्मण गोंधळलेल्या अवस्थेंत असतांनाच हरिबुवा त्याला म्हणाले, " ही गंगा नदी. या गंगा नदींत स्नान कर, कोणाशीं बोलूं नकोस. वर जा आणि विश्वेश्वराचें दर्शन घेऊन ये. मी येथेंच उभा रहातो. "

त्या ठिकाणीं त्याच्या गांवचीं मंडळीहि दिसूं लागली. त्यांनीं त्याला विचारलें, " तूं केव्हां आलास ? "

परंतु हरिबुवांनीं त्याला बजावल्याप्रमाणें तो कांहींहि बोलला नाहीं. त्यानें विश्वेश्वराचें दर्शन घेतलें व पुन्हां तो हरिबुवांजवळ येऊन उभा राहिला.

हरिबुवा मग त्याला म्हणाले, " चल, तुला आतां दक्षिण काशी दाखवितों. "

हरिबुवांनीं त्याचा हात धरला व त्याला पुन्हां डोळे मिटण्यास सांगितलें. त्यानें डोळे उघडले तेव्हां आपण देवीच्या देवळांत आहों असें त्याला आढळून आलें.

हरिबुवा त्याला म्हणाले, " ही कोल्हापूरची देवी. कोल्हापूर म्हणजे दक्षिण काशी. घे आतां देवीचें दर्शन. "

देवीचें दर्शन घेतल्यावर हरिबुवा म्हणाले, " आतां तुला पंढरपूरच्या पांडुरंगाचें दर्शन करवितों. "

पुन्हां हरिबुवांनीं त्याचा हात धरला आणि त्याला डोळे मिटण्यास सांगितलें. थोड्या वेळानें डोळे उघडून पहातो तों समोर पांडुरंगाची मूर्ति त्याला दिसली. पांडुरंगाचें दर्शन झाल्यावर हरिबुवांनीं त्याला डोळे मिटण्यास सांगितलें व त्याचा हात धरून त्याला घरीं आणून सोडलें.

तो ब्राह्मण आपल्या गांवीं परत आला तेव्हां दुपारीं अकरा वाजण्याची वेळ होती. सकाळीं आठ वाजल्यापासून दुपारीं अकरापर्यंत काशीपासून कोल्हापूरपर्यंत मनोवेगानें हरिबुवांनीं त्याला प्रवास करून परत घरीं आणून पोहोंचविलें होतें. अवघ्या तीन तासांत हा चमत्कार घडून आला होता.

हा चमत्कार खरोखरच अलौकिक होता – अगदीं विश्वास न बसण्याइतका. त्या ब्राह्मणाचें नांव व गांव माझ्या वडील बंधूंनीं मला सांगितलें होतें, पण त्या गोष्टी माझ्या विस्मृतींत जाऊन दाखल झालेल्या आहेत. परंतु या चमत्काराची मीमांसा आपल्या योगशास्त्रांत सांगितलेली माझ्या वाचनांत आलेली आहे. महायोगी सत्पुरुषाला अशा तऱ्हेचे चमत्कार सहज करतां येतात यासंबंधींचीं सूत्रें 'पातंजल योगदर्शनांत' सांपडतात. म्हणून अशा चमत्कारांवर विश्वास ठेवणें मला शक्य झालें आहे. हरिबुवा

हे महान् योगी व ज्ञानी होते. त्यांनीं असे अनंत चमत्कार करून जगाला थक्क करून सोडलें आहे. केवळ चमत्काराच्या बळावर समाजांत भोळा-भाव वाढविण्यापेक्षां समाजांत खरीखुरी श्रद्धा निर्माण झाली पाहिजे असें त्यांना वाटत असल्यामुळें, आपले चमत्कार गुप्त ठेवण्याबद्दल हरिबुवांनीं आपल्या निकटवर्ति भक्तांना व शिष्यांना निक्षून सांगितलें होतें. त्यामुळें त्यांचे सर्वच चमत्कार आज उजेडांत आलेले नाहींत. परंतु शितावरून भाताची परीक्षा होते या न्यायानें हरिबुवांचें अलौकिकत्व आज साऱ्यांना पटलेलें आहे.

* * *

हरिबुवा फलटणला येऊन पंचवीस वर्षें झालीं आणि नंतर नश्वर देह सोडण्याची त्यांची वेळ झाली. शके १८२० सालीं फलटणला रथसप्तमीचा मोठा उत्सव झाला. भजन करीत सर्व मंडळी मलठणांत हरिबुवांकडे आली. श्रीमंत निंबाळकर राजेसाहेबहि भजनी मंडळी बरोबर होते. पुढें गांवांतील लोकांनीं भंडारा केला. हरिबुवांच्या जयघोषांत सर्वांनीं प्रसाद घेतला. हरिबुवांनीं मात्र कांहींहि खाल्लें नाहीं. गोपाळदास नांवाचे त्यांचे एक निकटवर्ति भक्त होते. त्यांनीं हरिबुवांना प्रसाद भक्षण करण्यास लावले. रात्रीं सुप्रसिद्ध कीर्तनकार नारायणबुवा फलटणकर यांचें कीर्तन झालें व पुढें दहीहंडी झाली.

तिकडे दहीहंडी चालू असतांना इकडे हरिबुवांनीं समाधि लावली. नित्याप्रमाणें शिष्यमंडळी त्यांची सेवा करूं लागले तेव्हां त्यांचे पाय गार लागले. वैद्यांना बोलावून आणले, त्यांनीं हरिबुवांना नमस्कार केला व प्रकृति तपासून पाहिली. एकदम त्यांचा कंठ दाटून आला, दुःखाचा हुंदका त्यांच्या मुखावाटे बाहेर पडला व ते म्हणाले, “ हरिबुवा आप-ल्याला सोडून गेले हो ! ”

वैद्यांचे ते कर्णकटु शब्द ऐकतांच जिकडेतिकडे हाहाकार उडाला. साऱ्या मंडळींवर दुःखाचा डोंगर कोसळला. सर्व फलटणभर व आसपास ही दुःखद वार्ता वाऱ्यासारखी पसरली. त्यांच्या अंत्यदर्शनासाठीं लोकांच्या झुंडीच्या झुंडी धांवून आल्या. श्रीमंतांच्या कानांवर हरिबुवांच्या समाधीची वार्ता पडतांच त्यांची स्वारीहि हरिबुवांच्या दर्शनाला आली. त्यांनीं हरिबुवांची समाधि बांधण्याची आज्ञा केली. समाधि-मंदिर बांधण्याला सर्व सामग्री ताबडतोब हजर झाली. समाधि-मंदिरासाठीं जागा पसंत करण्यांत आली. पाथरवटाकडून समाधि-स्थान सिद्ध करण्यास प्रारंभ झाला. नंतर हरिबुवांना ऊन पाण्यानें स्नान घातलें व विधीपूर्वक त्यांची पूजा केली. त्यांच्या डोक्याला टोपी, अंगावर कफनी, कपाळावर केशर व कस्तुरीचा टिळा, त्यावर अक्षदा, गळ्यांत फुलांच्या माळा, टोपीवर तुळसीपत्र अशा तऱ्हेनें पूजा झाल्यावर धूप, दीप, नैवेद्य वगैरे विधि होऊन आरती करण्यांत आली. बँड, ताशा, ढोल वगैरे वाद्यें आणि भजन यांच्या गजरांत त्यांच्या पार्थिव देहाची मिरवणूक काढली; व अखेरीस त्यांना समाधिस्थानीं आणलें. समाधीच्या आंत एका आसना-वर त्यांना बसविलें. दोन्ही बाजूंस दोन जळत्यो समया ठेवल्या. शेवटीं यथाविधि समाधि पूर्ण करण्यांत आली. नंतर समाधीवर हरिबुवांच्या पादुका कोरण्यांत आल्या व त्यांचीहि पूजा करण्यांत आली.

अशा रीतीनें माघ शुद्ध एकादशी शके १८२० सालीं हा लोकोत्तर संत समाधिस्त झाला.

हरिबुवांचें समक्ष दर्शन घेण्याचा योग आयुष्यांत राहून गेला या गोष्टीचें शल्य माझ्या अंतःकरणांत सतत सलत राहिलें होतें. अगदीं अलीकडे हरिबुवांच्या समाधीवर फार सुंदर मंदिर उभारण्यांत आलें आहे. हरिबुवांचें समक्ष जरी दर्शन नाहीं तरी त्यांच्या समाधीचें दर्शन घ्यावें या हेतूनें गतवर्षी मी मलठणला जाऊन आलों. तेथील समाधि-

मंदिरानजिकचें दृश्य पाहून माझें भान खरोखरच हरपून गेलें. मी मंदिराभोंवतीं सर्वत्र दृष्टिक्षेप टाकला. मंदिरासमोर भव्य सभामंडप आहे. सर्व बाजूंनीं तो मोकळा आहे. समाधि-मंदिराचें आवार विस्तीर्ण आहे. मंदिराच्या एका बाजूला यात्रेकरूंना उतरण्यासाठीं दोन मोठ्या ओवऱ्या आहेत. त्यांच्याजवळ एक मोठी विहीर आहे. विहिरीचें पाणी फारच गोड आहे व कांठावर पाण्याचा नळ आहे. मंदिरासमोर आवाराच्या बाहेर नदी असून तिच्या पलीकडे फलटण गांव आहे. हें समाधि-मंदिर फलटण या गांवाच्या बाहेर अत्यंत रमणीय नि शांत अशा जागीं वसलें आहे. या पवित्र वास्तूंत पाय टाकला म्हणजे माणसाची तहानभूक हरून जाते. निदान माझी तरी गेली. तेथील आनंदमय वातावरणांत माणूस शिरला म्हणजे त्या शांत वातावरणाशीं तो सर्वस्वीं समरस होऊन जातो. अधूनमधून पक्ष्यांचा गोड किलबिलाट शांततेचा भंग करील तेवढाच ! मी ह्या समाधि-स्थानावर गेलों तेव्हां सकाळची वेळ होती व तें मंदिर सोडलें तेव्हां दुपारचा समय होता. हजारों स्त्री-पुरुषांची दर्शनाला गर्दी लोटलीं होती, पण तेथील शांत व पवित्र वातावरणाचा भंग होईल तर शपथ ! मी गेल्याबरोबर गाभाऱ्यांत प्रवेश केला आणि हरिबुवांच्या पादुकांचें दर्शन घेतलें. नंतर माझी दृष्टि पादुकांच्या मागें असलेल्या त्यांच्या भव्य छायाचित्राकडे गेली आणि माझ्या डोळ्यांना ज्या अश्रुधारा लागल्या त्या किती तरी वेळ थांबेनात. मला कांहींहि दिसेनासें झालें. मी मनांत म्हटलें, “ याच महापुरुषानें माझ्या कुटुंबावर अपार कृपा करून ठेवली आहे. ” कांहीं वेळानें बाहेर येऊन मी समाधि-मंदिराला आपल्या रिवाजाप्रमाणें प्रदक्षिणा घालूं लागलों. प्रदक्षिणा-मार्गावरच मला एक भव्य शिला दिसली. चौकशी-अंतीं मला असें समजलें कीं, हरिबुवांनीं याच शिलेवर आपली अखेरची समाधि लावली होती. त्या शिलेवर आज हरिबुवा बसलेले मला दिसले

नाहींत, पण त्यांच्या सान्निध्यानें त्या शिलेचें पावित्र्य अजरामर होऊन राहिलें आहे. असंख्य भाविकांनीं वाहिलेल्या हळद-कुंकवानें त्या साध्या दगडांतून आज देव साकारलेला आहे.

दुपारची वेळ झाली. माझा पाय त्या पवित्र वास्तूंतून कांहीं केल्या निघेना. संतचरणांची धूळ सतत माथीं लागावी म्हणून संत नामदेवांनीं आपली पायरी पंढरपुरांत कायमची करून ठेवली तशी आपण या ठिकाणीं तयार करून ठेवावी, असाहि एक वेडा विचार माझ्या मनांत येऊन गेला. तेथून जाण्यासाठीं मी प्रत्यक्ष मोटारींत येऊन बसलों, पण माझें मन मात्र त्या परम पवित्र वास्तूभोंवतीं रेंगाळत होतें. आमची मोटार निघाली तेव्हां धरित्री उन्हानें न्हाऊन निघत होती. मोटारीनें वेग धारण केला तरी मी एकसारखा त्या समाधि-मंदिराकडे बघत होतों. सोनेरी आकाशाच्या पार्श्वभूमीवर तें मंदिर मला कित्येक वेळ स्पष्ट दिसत होतें. तें दूर दूर जात होतें आणि मग जणुं काय आकाशाच्या एका कोंपऱ्यावर त्याचें रेखाचित्र दिसावें असा देखावा दिसूं लागला. थोड्या वेळानें तोहि देखावा दृष्टीसमोरून नाहींसा झाला तेव्हां अंतर्मुख बनून मी तो सारा देखावा पाहूं लागलों. माझ्या मनश्चक्षूंसमोर मला हरिबुवांची प्रेमळ मूर्ति एकसारखी दिसत होती.

३०४६२
: ५ : वा. भा.
२५५२
भोपटकर महाराज
६७

त्या पडक्या वाड्याकडे बघितलें म्हणजे गेल्या अर्ध्या शतकांतील साऱ्या स्मृति माझ्या मनांत गर्दी करूं लागतात. त्या भव्य वाड्याच्या दर्शनी भिंतीचे बहुतेक सारे दगड निखळले आहेत; पण पडलेल्या परिस्थितींतहि ते दगड आपली कहाणी सांगत आहेत, असा भास मला होतो. जणूं त्यांच्या रूपानें त्या ठिकाणचा वास्तुपुरुष जागृत होऊन माझ्याशीं बोलत आहे असें मला वाटतें. त्या वाड्यांतील वास्तु-पुरुष जागृत होत असेल वा नसेल, पण त्या वास्तूंतील मानवी वास्त-व्याच्या साऱ्या खुणा आज पार पुसून गेल्या आहेत. माणूस आणि मृत्यु यांचें सनातन वैर अद्याप संपलेलें नाहीं व अनंतकालपर्यंत तें कधीं संपणार नाहीं या गोष्टीचा पुरेपूर प्रत्यय या पडक्या वाड्याकडे बघून येतो. माणूस म्हटला कीं मृत्यूनें त्याच्यावर झडप टाकावी, असा जणूं शाश्वत स्वरूपाचा संकेत झालेला आहे. आज याच कालाच्या उदरांत सामील झालेली एक महान् व्यक्ति या वास्तूंत अर्ध्या शतकापूर्वी नांदत होती.

गेल्याच वर्षी मी त्या वाड्यावरून जात होतों. आमच्या घरा-पलीकडेच तो वाडा आहे आणि पेठेंत किंवा मळ्यांत जावयाचें असेल तर त्या वाड्यावरूनच आम्हांला जावें लागतें. काय चमत्कारिक योगा-योग आहे पहा. मी त्या वाड्यावरून जात असतांना कोणी तरी 'हा भुतांचा वाडा आहे' असा उच्चार केला. तो उच्चार ऐकून मला मोठा विषाद वाटला. या नव्या पिढीला या ठिकाणीं घडलेल्या चमत्कारांची कसलीहि जाणीव नाहीं या विचारानें माझें मन भारावून गेलें. ही पिढी आपल्या-

पासून फार पुढें गेली आहे, वर्तमानकालांत वावरत असतांना त्या पिढीची दृष्टि भविष्यकाळावर स्थिर आहे आणि आपण वर्तमानकाळांत वावरत असतांना आपले नेत्र भूतकाळावर स्थिरावले आहेत, असें वाटून माझ्या एकलेपणाची मला तीव्र जाणीव झाली. काय विटंबना चालली होती त्या वास्तूची ! एके काळीं पवित्र मंदिरासारखा उभा असलेला हा वाडा आज भुताखेतांचा वाडा म्हणून ओळखला जात होता. गुराढोरांचे सारे नैसर्गिक व्यवहार या ठिकाणीं मुक्ततेनें सुरू होते. उभे असलेले दगड आडवे झाले होते. दगडांमधील चुना मातींत मिसळला होता. वस्तुतः त्या ठिकाणच्या बहुतेक साऱ्याच गोष्टी मातींत गाडल्या गेल्या होत्या, दृष्टिआड झाल्या होत्या. पण म्हणून माझ्या स्मृतींतून त्या थोड्याच नष्ट झाल्या होत्या? वाड्यांत घडलेला सारा इतिहास माझ्या डोळ्यांसमोर उभा होता – अगदी काल-परवां घडावा इतक्या ताज्या अवस्थेंत; आणि तोच इतिहास मी तुम्हांला आतां सांगणार आहें – एका उदात्त आणि पवित्र व्यक्तीचा इतिहास!

* * *

त्या दोघां सावत्र बंधूंचें कधींच फारसें जमलें नाहीं. नाना भापकर आणि त्यांचा धाकटा सावत्र भाऊ लक्ष्मण हे मूळचे अहमदनगर जिल्ह्यांतील कर्जत येथें रहाणारे. तेथें त्यांचा राहण्याचा वाडा व एक मोठा मळा होता. लक्ष्मणचे वडील बंधू नाना भापकर हे आपल्या जमिनीवर देखरेख करून जें काय उत्पन्न येईल त्यांतून प्रपंचाचा खर्च चालवीत. सावत्र संबंध असल्यानें नानांचें धाकट्या भावावर असावें तितकें प्रेम नव्हतें. त्यांतून धाकटा भाऊ लक्ष्मण याचें शिक्षणाकडे विशेष लक्ष नव्हतें. जेमतेम मराठी पांचव्या इयत्तेपर्यंत तो शिकला व त्यानें शाळेला अखेरचा रामराम ठोकला. शिक्षण संपल्यावर उनाड मुलांच्या संगतींत वेळ फुकट दवडणें एवढाच उद्योग त्याला उरला. क्वचित्प्रसंगीं लक्ष्मणाला दोन पैसे खर्चायला लागले तर नाना ते कधीं देत नसत. अशा परिस्थितींत, एकदां आपल्या

खर्चासाठीं त्यानें देव्हाऱ्यांतले चांदीचे टाक नेऊन बाजारांत विकले आणि पैसा केला. नानांना ही गोष्ट कळली तेव्हां त्यांचा क्रोध अनावर झाला आणि त्यांनीं लक्ष्मणाला सांगितलें, " आजपासून तुला या घरांत जेवायला मिळणार नाहीं. तूं आपलें वाटेल तेथें पोट भर. "

अशा तऱ्हेनें लक्ष्मणाचा घरचा आधार तुटला आणि जग त्याला वैराण बनलें. त्या वेळीं मळ्यांतून घरीं बरींच गाजरें आलीं होतीं. लक्ष्मणानें सकाळ-संध्याकाळ गाजरें खाण्यावर सपाटा मारला. पांच-सहा दिवस सतत गाजरें खाल्ल्यामुळें त्याला अमांश झाला आणि तो विकार इतका वाढला कीं, त्याच्या डोळ्यांत अक्षरशः प्राण आले. अशाहि अवस्थेंत नानांनीं त्याच्याकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं. अन्न नाहीं, औषध नाहीं अशा अवस्थेंत लक्ष्मण रात्रीं गुंगून पडला असतांना खोलीच्या दारावर बाहेरून कोणी तरी थाप मारल्याचा आवाज त्याच्या कानीं पडला. लक्ष्मणानें त्या गुंगीच्या अवस्थेंतच खुरडत खुरडत जाऊन दाराची कडी काढली. ती रात्र चांदणी होती. सारें विश्व जणूं एक प्रकारच्या आध्यात्मिक अवस्थेंत निःस्तब्ध झालें होतें. चांदणें पडलेलें असल्यामुळें बाहेर निसर्गाचा स्पष्ट देखावा दिसत होता. पण लक्ष्मणाला त्या देखाव्याऐवजीं बाहेर एक माणूस उभा असलेला दिसला व त्याच्या पलीकडे एक घोडें दिसलें. त्या माणसानें घोड्यावरून पडशी काढलेली त्यानें पाहिली. ती पडशी खोलींत आणून त्या पडशींतील ज्वारी त्या माणसानें खोलींत ओतून ठेवली व नंतर तो म्हणाला, " तूं यापुढें गाजरें खाऊं नकोस. तुझ्यासाठीं ही सहा पायली ज्वारी आणली आहे. कोणाकडून तरी ज्वारीच्या भाकरी करून घेत जा; आणि ताजी भाकरी खात जा. ही ज्वारी संपेपर्यंत तुझी प्रकृति बरी होईल व अंगांत शक्ति येईल. "

या साऱ्या प्रकारानें लक्ष्मण चकित होऊन गेला. तो माणूस कोण, कोठला, त्यानें आपल्यासाठीं ज्वारी कां आणावी या प्रश्नांची मनांतल्या

मनांतहि उत्तरें देण्याची शक्ति त्याच्या अंगांत उरली नव्हती. किंबहुना त्या प्रश्नांचीं उत्तरेंहि त्याला माहीत नव्हतीं. कांहीं वेळानें तोच माणूस पुढें म्हणाला, "ही ज्वारी संपल्याबरोबर तूं ताबडतोब पेडगांवजवळ अजनुज गांव आहे तेथें ये; आणि गोविंदबुवांचा मठ कोठें आहे म्हणून तेथें कोणालाहि विचार; आणि मठांत ये. मी तुला तेथें भेटेन."

असें सांगून तो माणूस घोड्यावर बसून निघून गेला.

दुसऱ्या दिवसापासून लक्ष्मणानें ज्वारीची भाकरी खाण्यास प्रारंभ केला. दिवसेंदिवस त्याला आराम पडूं लागला. त्याची प्रकृति सुधारूं लागली. ज्वारी संपली, पण मग त्या ज्वारीची गरजहि संपली होती. लक्ष्मणाच्या अंगांत आतां भरपूर शक्तीहि आली होती. त्याला स्मरण झालें. त्या माणसानें आपल्याला अजनुज येथील गोविंदबुवांच्या मठांत बोलावलें आहे नाहीं का? आपण तेथें गेलें पाहिजे. आपल्या उपकार-कर्त्याला विसरून कसें चालेल?

आतां थोरल्या भावाला परवानगी विचारण्याचा प्रश्नच नव्हता. थोरल्या भावानें आपलें कर्तव्य थोडेंच बजावलें होतें म्हणून धाकट्या भावानें त्याचें कर्तव्य पार पाडणें इष्ट ठरलें असतें! थोरल्या भावानें आजारीपणांत धाकट्या भावाची चौकशी केली नव्हती. मग बरें झाल्यावर तो त्याची वास्तपूस्त करील ही गोष्ट मुळींच शक्य नव्हती. एके दिवशीं लक्ष्मण कोणालाहि न विचारतां आपल्या घरून उठला आणि अजनुजला गोविंद-बुवांच्या मठांत येऊन दाखल झाला. अजनुज हें श्रीगोंदें तालुक्यांतील गांव कर्जतपासून सुमारें २५ मैल अंतरावर आहे. हा सतरा-अठरा वर्षांचा मुलगा तें २५ मैलांचें अंतर पायीं तोडून गेला. सापत्न भावाला कंटाळून बालध्रुव असाच भगवंताच्या शोधार्थ घराबाहेर पडला नव्हता का?

अजनुजला आल्यावर लक्ष्मण थेट मठांत गेला व तेथें गोविंद-बुवांना भेटला. ज्या माणसानें त्या रात्रीं घोड्यावरून ज्वारीची पडशी

आणून ती लक्ष्मणासमोर ओतली तेच हे गोविंदबुवा. महान् अंतर्ज्ञानी सत्पुरुष. लक्ष्मणाची त्या वेळची अवस्था अंतर्ज्ञानानें ताड्न त्यांनीं त्याच्या घरीं ज्वारी पोहोंचती केली होती व त्याला मृत्यूच्या दाढेंतून बाहेर काढलें होतें.

गोविंदबुवा हे आजन्म ब्रह्मचारी असून महान् योगी होते. त्यांनीं लक्ष्मणाला योगमार्गाची दीक्षा दिली आणि योगाभ्यासासाठीं नर्मदातटाकीं जाण्याची आज्ञा दिली.

गुरूच्या आज्ञेप्रमाणें नर्मदाकांठीं जाऊन लक्ष्मणानें बारा वर्षे योगाभ्यास पुरा केला व त्यानंतर तो पुन्हां आपल्या गांवीं जाऊन दाखल झाला. तेव्हांपासून पुढें त्यानें योगबलावर अनेक अलौकिक चमत्कार करून दाखविले. लोक त्यांना आतां 'लक्ष्मण महाराज' किंवा 'भापकर महाराज' म्हणूं लागले.

* * *

भापकर महाराज नर्मदातीरीं गेल्यावर त्यांच्या सावत्र बंधूंनीं वडिलार्जित मिळकत गहाण टाकून श्रीगोंदें तालुक्यांतील मांडवगण या गांवीं प्रयाण केलें होतें. नर्मदेचें वास्तव्य संपवून भापकर महाराज कर्जतला परत आल्यावर त्यांना ही हकीगत समजली. कर्जतला आतां चरितार्थाचें साधन न उरल्यामुळें महाराज वैराग येथें जाऊन स्थायिक झाले. वैराग हें गांव बार्शी तालुक्यांत आहे. त्या गांवाच्या जवळपास त्यांची सासुरवाडी होती. कर्जतला ते अधूनमधून येत. ज्यांनीं त्यांचा मळा गहाण घेतला होता त्यांच्यावर त्यांनीं गहाण सोडवून घेण्यासाठीं कर्जतच्या कोर्टांत दावा लावला. त्या दाव्याच्या तारखा पडल्या म्हणजे महाराज कर्जतला येत असत. त्या दाव्यांतील एक हकीगत मला चांगली स्मरते.

त्या वेळीं जे न्यायाधीश होते त्यांच्या मनांत भापकर महाराजांचा दावा रद्द करून दाव्यांतील जमीन त्यांच्याच गोटांतील एका माणसास देण्याचा विचार होता. ही गोष्ट जेव्हां महाराजांना समजली तेव्हां ते

उद्गारले, "माझी बाजू खरी असतांना मुनसफांनीं जर माझ्याविरुद्ध अन्यायानें निकाल देण्याचें ठरविलें, तर त्यांना आठ दिवसांत समुद्रतीरावर फेकून देईन."

हे उद्गार मुनसफांच्या कानावर गेले तेव्हां ते लगेच महाराजांकडे आले व वरकरणी महाराजांना म्हणूं लागले, "महाराज, तुम्ही माझ्याबद्दल काढलेले उद्गार मला समजले, पण मी अन्याय कसा करीन ?"

यावर महाराज म्हणाले, "तुमच्या मनांत न्याय करावा असेंच असेल, तर तुम्हांला बदली होण्याची धास्ती बाळगण्याचें कारण नाहीं. पण माझा न्याय्य हक्क बुडवून जर दुसऱ्या माणसाला माझी जमीन द्यायची असा तुमचा व तुमच्या बैठकींतील मंडळींचा विचार झालेला असला, तर आपण येथें राहूं शकत नाहीं इतकेंच मी सांगतों."

या गोष्टीचा लगेच प्रत्यय आला. महाराजांनीं सांगितल्याप्रमाणें नक्की सातव्या दिवशीं मुनसफांची पनवेल येथें म्हणजे समुद्रकांठीच बदली झाली. त्यांच्या हातांत बदलीचा हुकूम पडला. त्यांच्यानंतर जे मुनसफ आले त्यांनीं महाराजांच्या दाव्यांतील खरेदीखत गहाण स्वरूपाचें आहे असें ठरवून मळा गहाणांतून मुक्त करून तो महाराजांच्या ताब्यांत देण्याबद्दल हुकूमनामा केला; त्यावरून महाराजांना जमिनीचा ताबा मिळाला व पुढें ते जमिनीचें उत्पन्न घेऊं लागले.

जमिनीचा दावा साधल्यावर महाराज दरसाल सुगीच्या दिवसांत मळ्याचें उत्पन्न घेण्यासाठीं कर्जतला येत असत. १९०२ सालीं महाराज प्रथमच आमच्या घरीं आले. त्या वेळीं धर्मावर त्यांचें व माझें बोलणें झालें. त्या वेळीं आमचीं बोलणीं खूपच रंगलीं. महाराज कोणत्याहि विषयाचें प्रतिपादन करूं लागले म्हणजे त्या विषयाशीं ते एकरूप होऊन जात, ही गोष्ट माझ्या तेव्हांच ध्यानांत आली. काय योगायोग असेल तो असो पण

महाराजांचें व माझें चांगलेंच जमलें. त्यानंतर पुढें सुमारे चौदा वर्षें त्यांच्या सहवासाचा लाभ मला मिळाला.

नर्मदातटाकीं योगाभ्यास करून परतल्यानंतर महाराज अनेक ठिकाणीं हिंडले. त्यांचा शिष्यवर्ग फार मोठा होता. त्यांत मोठमोठे व्यापारी, सरकारी अधिकारी, देशमुख-देशपांडे, डॉक्टर, वकील अशा मोठ्या लोकांचा भरणा अधिक असे; व सर्वजण त्यांना प्रत्यक्ष देवाप्रमाणें मानीत. महाराज अयाचित वृत्तीनें रहात असत. त्यांनीं आपल्या प्रपंचाकडे कधीं लक्ष दिलें नाहीं किंवा त्याबद्दल कधीं काळजी केली नाहीं. ते बहुतेक परगांवीं हिंडायचे, पण त्यांचे शिष्य वैराग येथील त्यांच्या घरीं चौकशी करून जरूर त्या जिनसा पुरवीत. त्यांनीं महाराजांना कधीं कांहीं कमी म्हणून पडूं दिलें नाहीं आणि महाराजांनींहि स्वतः कोणापासून कांहीं मागितलें नाहीं. अशा तऱ्हेनें त्यांचा योगक्षेम चालत असे.

महाराज समाधि लावत असत. त्यांनीं समाधि लावल्यावर त्यांचा देह जमिनीपासून हातभर उंचीवर अधांतरी रहात असे. याप्रमाणें ते आपलें शरीर कापसाप्रमाणें हलकें करीत असत. सामान्य माणसाला हा चमत्कार वाटेल, कांहीं तथाकथित बुद्धिवादी लोकांचा या गोष्टीवर विश्वासहि बसणार नाहीं. पण तीन-चार हजार वर्षांपूर्वीं पतंजली मुनींनीं आपल्या योगदर्शनाच्या विभूतिपाद या भागाच्या ४२ व्या सूत्रांत या चमत्काराचें सारभूत तत्त्व सांगितलें आहे. मानवी देह हा आकाश-तत्त्वांतूनच निर्माण झालेला आहे. आकाशानेंच हें देहरूप धारण केलें आहे. आकाशावर संयम करून योगी आपला देह कापसासारखा हलका करून हवेंतून इकडून तिकडे गमन करूं शकतो. मग आपल्या समाधि-अवस्थेंत भापकर महाराज हातभर उंचीवर अधांतरी बसत असत यांत आश्चर्य मानण्याचें कांहींच कारण नाहीं.

योगसाधना पुरी झाल्यावर महाराज एकदां दक्षिण हैदराबाद येथें गेले. त्या वेळीं तेथें एक मुसलमान अवलिया राहत असे. पाण्यावर रुमाल टाकून तो नमाज पढत असे. हा त्याचा चमत्कार पाहून त्याच्या भोंवतालीं पांच-सहाशे शिष्य गोळा झाले होते. त्या वेळीं भापकर महाराजांचीहि योगी व ज्ञानी म्हणून सर्वत्र ख्याति झाली होती. महाराज हैदराबादेला आल्याची वार्ता या मुसलमान अवलियाच्या कानीं गेली. आपण पाण्यावर बसून नमाज पढतो हा आपला चमत्कार महाराजांना दाखविण्याच्या हेतूनें त्या अवलियानें आपल्या शिष्यांकरवीं महाराजांना बोलावून घेतलें. अवलियाचें बोलावणें आल्यावर महाराज त्याच्याकडे गेले. त्याच्याबरोबर पांच-पन्नास मंडळीहि गेली होती. थोडा वेळ उभयतांच्या औपचारिक गोष्टी झाल्यावर ते मुसलमान अवलिया महाराजांना म्हणाले, " अबि हमारा नमाज पढणें का वखत हुवा है. हम् नमाज कैसा पढता वो आप देखी है. " असें म्हणून ते अवलिया जवळच्या विहिरींत उतरले व आपल्या एका शिष्यास दस्तरखाना म्हणजे रुमाल आणण्यास त्यांनीं सांगितलें. त्या शिष्यानें त्यांना रुमाल आणून दिला, तो त्यांनीं पाण्यावर टाकला आणि उडी मारून त्या रुमालावर गुढगे टेकून ते नमाज पढण्यासाठीं बसले. हें केल्यावर मागें वळून भापकर महाराजांना त्यांनीं विचारलें, " ऐसा तुमकू आता हैक्या ? "

यावर महाराजांनीं म्हटलें, " नीचे दस्तरखाना कायकू लेते ? "

" फिर कैसा बैठना ? " या अवलियाच्या प्रश्नावर भापकर महाराजांनीं तात्काळ पाण्यावर उडी मारली व यथास्थित आसनमांडी घालून अगदीं बैठकीवर बसल्याप्रमाणें ते पाण्यावर स्वस्थ बसले आणि " ऐसा बैठना " असें म्हणाले. उदान वायूच्या निरोधानें योग्याला पाण्यावर तरंगतां येते. भापकर महाराज हे महान् योगी असल्यामुळें त्यांना ती विद्या चांगलीच अवगत झालेली होती.

भापकर महाराजांना पाण्यावर तरंगतांना पाहून तो अवलिया आश्चर्यचकित झाला आणि कांहींसा खजिल देखील ! मग ते दोघे पाण्यांतून वर आले. रुमालाच्या आधारावांचून पाण्यावर बसण्याची यौगिक प्रक्रिया महाराजांनीं त्या अवलियाला समजावून सांगितली. तेव्हां तो मुसलमान अवलिया महाराजांच्या पायां पडला व सन्मानपूर्वक त्यांनीं महाराजांची पाठवणी केली.

* * *

एकदां महाराज करमाळ्याला गेले. त्या वेळीं तेथें रावसाहेब नूलकर हे मामलेदार होते. नूलकर त्यांनीं एके दिवशीं संध्याकाळीं महाराजांना आपल्या घरीं बोलावून घेतलें. त्या वेळीं कांहीं कामासाठीं म्हणून फौजदार व पोलीस जमादार हेहि नूलकरांकडे आले होते. हे दोघेहि पोलिसअंमलदार मुसलमान होते. सर्वांच्या गप्पागोष्टी चालल्या असतांना रामाची पालखी गांवांतून मिरवीत नूलकर मामलेदारांच्या दारासमोर थांबली. नूलकरांनीं पालखींत एक रुपया ठेवला; 'आणि त्यांना प्रसाद म्हणून मिळालेला नारळ घेऊन ते घरांत आले. तो नारळ फोडून सर्वांना प्रसाद वांटण्यास महाराजांनीं सांगितलें. परंतु फौजदार व जमादार यांनीं तो प्रसाद घेतला नाहीं. ते महाराजांना म्हणाले, " आम्हांला रामाचा प्रसाद नको, तुमचा प्रसाद पाहिजे. "

असें म्हणतांच महाराजांनीं नूलकरांकडून खोबऱ्याचे तुकडे घेतले व प्रत्येक मुसलमानास त्यांनीं दोन-तीन तुकडे दिले. त्यांनीं ते आपल्या खिशांत घातले व काम होतांच ते आपापल्या घरीं निघून गेले. घरीं आपल्या मुलांना ते खोबऱ्याचे तुकडे द्यावे या हेतूनें खिशांत हात घालून पाहातात तो खोबऱ्याच्या तुकड्याऐवजीं कोंबडीचीं अंडीं निघालीं. हा चमत्कार सांगण्यासाठीं लगेच जमादार फौजदाराकडे गेले. फौजदारांच्या घरींहि तोच चमत्कार घडला होता.

मग लगेच ते दोघेहि मुसलमान अंमलदार मामलेदारांच्या घरीं गेले. महाराज तेथें बसलेच होते. त्या दोघांहि पोलिस-अंमलदारांनीं घडलेली हकीगत मामलेदारांना व महाराजांना निवेदन केली व हा चमत्कार कसा घडला हें ते विचारूं लागले. महाराज म्हणाले, "तुम्हांला रामाचा प्रसाद नको होता. तुम्ही माझा प्रसाद मागितला म्हणून तुम्हांला आवडत असलेला प्रसाद मी तुम्हांला दिला. आतां हें कसें झालें हें विचारून काय फायदा?"

मग झालेल्या चमत्काराबद्दल आपल्या मनाशीं आश्चर्य करीत ते दोघे मुसलमान अधिकारी आपापल्या घरीं निघून गेले.

* * *

योगमार्गांतील साऱ्या प्रक्रिया महाराजांना चांगल्याच माहीत होत्या. एका शिष्याला महाराजांनीं प्राणायाम कसा करावा याची माहिती दिली. किती मात्रा पूरक, किती मात्रा कुंभक आणि किती मात्रा रेचक करायचा याची स्वतः प्रक्रिया करून दाखवून त्यांनीं शिष्याला पुरी माहिती करून दिली. त्यानंतर महाराज म्हणाले, "मीं पुन्हां येथें येईपर्यंत कुंभक वाढवायचा नाहीं, अशी माझी सक्त ताकीद आहे."

महाराज गांवाला निघून गेल्यावर शिष्यानें अभ्यासाला प्रारंभ केला. थोडे दिवस झाल्यावर त्याला वाटलें कीं, पूरक झाल्यावर कुंभक जास्त वेळ करून पहावा. वाजवीपेक्षां अधिक वेळ श्वास दाबून धरल्यामुळें त्यानें त्याच्या शरिरांतच वेगळी वाट काढली आणि एका धमनीवाटे तो श्वास भलतीकडे जाऊं लागला. त्याचा असा परिणाम झाला कीं, त्याच्या पाठीवर उंटाच्या मदारीसारखी मोठी मदार उत्पन्न झाली. त्याला ताठ चालतां येईना, वाकून चालावें लागे. ही मदार पाठीवर असल्यामुळें त्या ठिकाणीं मोठी रग लागे व तो त्रास असह्य होई. अशा स्थितींत हाल भोगीत असतां चार-पांच महिन्यांनीं त्याची व महाराजांची गांठ

पडली. त्याला पाहून महाराज एकदम उद्गारले, " तूं झक मारलीस. मीं सांगितल्यापेक्षां जास्त वेळ कुंभक केलास. याच्यापुढें प्राणायाम करणार नाहीं अशी वाहा माझ्या पायाची शपथ! "

त्यानें शपथ वाहिली आणि चूक कबूल केली. नंतर महाराजांनीं त्याला आपल्यासमोर बसवून पूरक करायला सांगितला आणि त्याच्या पाठीच्या एका विवक्षित जागीं आपलें बोट दाबलें. थोड्या वेळानें रेचक करण्यास सांगितला. असें चार-पांच वेळां केलें तेव्हां त्याच्या पाठीवरील मदार खलास होऊन पाठ पूर्ववत् झाली; आणि त्याचा त्रास नाहींसा झाला. महाराज योगमार्गांत पूर्णतेला पोहोंचले होते म्हणूनच ही गोष्ट त्यांना करतां आली.

एके दिवशीं मी व महाराज आमच्या घरीं बोलत बसलें असतांना मी त्यांना म्हणालो, " महाराज मला हठयोगाची माहिती द्याल कां? "

ते म्हणाले, " तुम्हांला त्याची मुळींच आवश्यकता नाहीं; पण मी तुम्हांला ती माहिती देईन. त्या माहितीचा तुम्हीं उपयोग मात्र करतां कामा नये; आणि ती माहिती दुसऱ्या कोणालाहि देतां कामा नये. तुमचा मार्ग राजमान्य आहे, त्यांत कसलाहि धोका नाहीं. म्हणून तुम्ही नित्य त्याच मार्गाचा अवलंब करा. त्यांत तुम्हांला तरी कांहीं शंका येईल, असें मला वाटत नाहीं. तरी पण एखादी शंका आलीच, तर मी आहेच तिचें निरसन करायला. "

पुढें चार-पांच दिवसांनीं महाराज व मी माझ्या खोलींत बसलों असतांना त्यांनीं मला आसनें घालण्यास सांगितलें व बरींच आसनें करवून घेतलीं. दुसऱ्या दिवशीं सर्व प्रकारचे प्राणायाम त्यांनीं माझ्याकडून करवून घेतले व कांहीं प्रक्रियांचीहि माहिती दिली. प्रत्येक आसनाचा व प्राणायामाचा शरिराला काय उपयोग होतो त्याची माहिती दिली. तीन-चार दिवस हा उपक्रम सुरू होता. अखेर त्यांनीं मला पुन्हां बजावून

सांगितलें, " कांहीं अपवाद सोडून तुम्ही स्वतः या माहितीचा उपयोग करूं नका व ही माहिती दुसऱ्या कोणालाहि सांगूं नका. "

महाराजांच्या या उपदेशाचें उल्लंघन मी आजपर्यंत कधींहि केलें नाहीं. त्यांचा उपदेश कानाआड केला म्हणजे त्याचे काय काय परिणाम होतात ही गोष्ट मला पुरेपूर माहीत होती. त्यामुळें त्यांचा उपदेश टाळण्याचा मोह आजपर्यंत मला कधीं झाला नाहीं.

* * *

महाराज वैराग येथें आपल्या घरीं असले म्हणजे रोज पांच वेळां एकान्तांत राहून समाधि लावीत असत. ते बाहेरगांवीं असले म्हणजे सकाळीं सूर्योदयाबरोबर, त्याचप्रमाणें दुपारीं व संध्याकाळीं एकान्तांत समाहित स्थितींत असत. अस्तमान झाल्यावर बरीच मंडळी त्यांच्या दर्शनार्थ येत; आणि एखाद्या विषयावर त्यांना बोलायला सांगत. प्रवचन सुरूं करण्यापूर्वी ते सुमारें पांच मिनिटें डोळे मिटून बसत. स्वामी विवेकानंदांचीहि अशीच पद्धत असे. डोळे मिटून सद्गुरु रामकृष्णांचें स्मरण केल्याखेरीज स्वामीजी आपल्या व्याख्यानाला कधींहि प्रारंभ करीत नसत. भापकर महाराजहि प्रवचन सुरूं करण्यापूर्वी डोळे मिटून बसत, तेव्हां ते कोणाचें स्मरण करीत असत ही गोष्ट मात्र मला माहीत नाहीं. मी त्याबद्दल त्यांना कधीं विचारलें नाहीं आणि त्यांनींहि कधीं सांगितलें नाहीं. एक गोष्ट मात्र खरी. ती ही कीं, प्रवचन सुरूं करण्यापूर्वी त्यांनीं डोळे मिटले म्हणजे लगेच त्या पांच मिनिटांत त्यांची समाधि लागत असे. समाधि उतरल्यावर त्यांचें सारें शरीर घामानें डबडबलेलें असे. घाम पूसून झाल्यावर प्रवचनाला प्रारंभ होई. मग दोन-तीन तास प्रवचन चाले. प्रवचनासाठीं त्यांना कोणींहि कोणताहि विषय सुचवावा. ते त्या विषयावर बोलूं लागत आणि एखाद्या गंगौघाप्रमाणें त्यांचें वक्तृत्व तासन् तास चालू राही. त्यांच्या प्रवचनाचे विषय कधींच पूर्वी ठरलेले नसत आणि

त्या विषयांना कधीं मर्यादा पडत नसे. पदार्थविज्ञान, रसायन, वैद्यशास्त्र, ज्योतिष, योग, वेदान्त, धर्म वगैरे शास्त्रीय विषयांवर मीं त्यांचीं अस्खलित प्रवचनें ऐकलीं आहेत. अमोघ वाणी, समर्पक दृष्टान्त आणि सार्थ उपमा इत्यादि अलंकारांनीं नटलेली त्यांची सोपी पण सुंदर भाषा ऐकून श्रोते त्या त्या विषयाशीं तद्रूप होऊन जात. त्यांचीं अशा प्रकारचीं प्रवचनें ऐकून एका विद्वान् गृहस्थानें त्यांच्याविषयीं 'वक्ता दशसहस्रेषु' असे गौरवपूर्ण उद्गार काढलेले मीं स्वतः ऐकले आहेत. मराठी पांचव्या इयत्तेंत त्यांनीं शाळा सोडली होती. त्यांनीं पुढें कसलेंहि ग्रांथिक वाचन केलें नव्हतें. असें असतांना ही ज्ञानसंपदा त्यांनीं केव्हां हस्तगत केली होती ? किंवा एवढें वक्तृत्व त्यांच्या ठिकाणीं कोठून आलें होतें ? पण या प्रश्नांना एकदां त्यांच्याच प्रवचनांतून मला उत्तर सांपडलें होतें. "यत्ज्ञात्वा न किंचिदिहावेदितव्यमस्ति" म्हणजे जें परमात्म-तत्त्व जाणलें असतां जाणण्याचें असें कांहीं बाकी उरत नाहीं, हें वेदान्त-तत्त्व त्यांच्याच प्रवचनांतून मला ऐकायला सांपडलें होतें. एका परमात्म-तत्त्वाचें ज्ञान झालें म्हणजे माणसाला या विश्वांतील सारें ज्ञान प्राप्त होतें, या गोष्टीचें मूर्तिमंत स्वरूप महाराजांच्या रूपानें माझ्यासमोर उभें राहिलें होतें. पुढें माझ्या वाचनांत 'पातंजल योगदर्शन' हा ग्रंथ आला तेव्हां या गोष्टीचें सारें कूट मला तेव्हांच उलगडलें. धर्म, लक्षण आणि अवस्था या परिणाम-त्रयावर संयम केला म्हणजे माणसाला त्रिकालज्ञान प्राप्त होतें, म्हणजे त्रिकालाच्या उदरांत दडलेलीं ज्ञानें त्याला हस्तगत होतात. हें सूत्र पातंजल योगदर्शनाच्या विभूतिपादांत सांगितलेलें आहे. या तत्त्वानुसार महाराजांना हें ज्ञान होत असलें पाहिजे यांत मला कसलीहि शंका उरली नाहीं.

* * *

पुणें येथील आनंदाश्रमांत एकदां धर्मावर त्यांचें प्रवचन झालें. सर्व्हे खात्यांतील एक अधिकारी श्री. अंजनगांवकर हे त्यांचे शिष्य होते.

त्यांनींच हें प्रवचन घडवून आणलें होतें. लोकमान्य टिळकांचा व महाराजांचा स्नेह होता. टिळकांना महाराजांचा अधिकार ठाऊक होता. आनंदाश्रमांतील प्रवचनाला लो. टिळक, प्रो. भानू, श्री. अंजनगांवकर व इतर बरीच विद्वान् मंडळी आलेली होती. संध्याकाळीं सहा वाजतां प्रवचन सुरू झालें. रात्रीं नऊ वाजतां महाराज समारोप करूं लागले तेव्हां श्रोत्यांनीं त्यांना अधिक बोलण्याचा आग्रह केला. महाराज आणखी एक तास त्या विषयावर बोलले. प्रवचन संपल्यावर लो. टिळकांनीं श्रोत्यांना सांगितलें, "आपल्या प्रांतांत महाराजांची फारशी माहिती नाहीं. परंतु माझा व त्यांचा बराच परिचय आहे. त्यांच्या प्रवचनावरून आपली सर्वांची खात्री झालीच्च असेल कीं, हे मोठे अधिकारी पुरुष आहेत. आतां फार वेळ झाला आहे. तेव्हां त्यांच्याविषयीं मी आपणांस एकाच वाक्यांत सांगतो कीं, ते आधुनिक रामदास आहेत."

दुसऱ्या दिवशीं प्रो. भानू यांनीं महाराजांना आपल्या घरीं नेलें, व त्यांनीं लिहिलेला 'भगवद्गीतेचा उपसंहार' हा ग्रंथ महाराजांना दाखविला. महाराजांनीं सुमारे अर्ध्या तासांत पुस्तकाचा कांहीं भाग वाचला आणि त्यांनीं भानूंना सांगितलें कीं, "तुम्ही भगवद्गीतेचे वरवर ओरखडे काढले आहेत. पुन्हां एकदां गीता व्यवस्थितपणें वाचा म्हणजे तुमच्या चुका आपोआप तुम्हांलाच समजून येतील."

नंतर भानू त्यांना म्हणाले, "महाराज आम्हांला कांहीं चमत्कार करून दाखविल्यावांचून एखादा माणूस सत्पुरुष आहे असें आम्हीं कसें समजावें?"

यावर महाराजांनीं उत्तर दिलें, "एखाद्या सत्पुरुषानें तुम्हांला चमत्कार दाखविले नाहींत म्हणून तो सत्पुरुष नाहीं, असें कसें होईल?"

मग थोडा वेळ थांबून महाराज पुढें म्हणाले, "भानू, तुम्हांला चमत्कार बघायचा आहे का? मिटा डोळे."

भानूंनीं डोळे मिटले. महाराजांनीं लगेच त्यांना डोळे उघडण्यास सांगितलें. भानूंनीं डोळे उघडले आणि पहातात तो पुढें सुमारे पांच-सहा शेर खडीसाखरेचा ढीग! भानू तर आश्चर्यचकितच झाले. काय बोलावें तें त्यांना सुचेना.

महाराज म्हणाले, " भानू, खा खडीसाखर ! "

महाराजांनीं अगोदर त्या ढिगांतील थोडी खडीसाखर खाल्ली व नंतर भानूंनींहि थोडी खाल्ली. पुन्हां महाराजांनीं त्यांना डोळे मिटण्यास सांगितलें. भानूंनीं पुन्हां डोळे उघडल्यावर त्यांना समोर खडीसाखरेचा एकहि खडा दिसला नाहीं.

आश्चर्यचकित झालेल्या भानूंकडे बघत महाराज म्हणाले, " भानू, ही खडीसाखर निमिषार्धांत आली आणि एका क्षणांत ती नाहींशी झाली, हा चमत्कारच नव्हे का? मी तुम्हांला सांगतों कीं, तुमच्यासारखा बुद्धिमान् माणूस अवघ्या सहा महिन्यांत हा चमत्कार करूं शकेल, मात्र श्रद्धा पाहिजे, चिकाटी पाहिजे आणि योग्य मार्गानें गेलें पाहिजे. "

मग भानू म्हणाले, " महाराज, आपला अनुग्रह व्हावा ! "

महाराज म्हणाले, " तुमच्या मनाचा पक्का निश्चय झाला म्हणजे पुढें पहातां येईल. "

नंतर अनुग्रह देण्याबद्दल भानूंचीं महाराजांना बरींच पत्रें आलीं, पण अनुग्रह देण्याच्या बाबतींत महाराज अखेरपर्यंत गप्पच राहिले. भानूंच्यावर पुढें महाराजांनीं अनुग्रह केल्याचें निदान मला तरी माहीत नाहीं.

* * *

एकदां कर्जत मुक्कामीं आम्ही बोलत बसलों होतों. तेव्हां महाराजांचा शोध करीत तेथें एक मारवाडी आला. त्याच्याबरोबर त्याची बारा-तेरा वर्षांची एक मुलगी होती. कर्जतपासून ८० मैलांवर त्याचें गांव होतें. त्याच्या मुलीच्या अंगावर रोज बिब्ब्याच्या फुल्या आपोआप येत

असत. त्यामुळें तिचें अंग सुजत असें व अंगाला ठणका लागत असे. एखाद्या वेळीं तिच्या गळ्याला दोरीचा फांस येत असे व गळा आवळल्यामुळें मुलीचा जीव घाबरा होई. मुलगी जेवायला बसली कीं तिच्या पानांत विष्ठा येत असे. याप्रमाणें त्या मुलीला जवळ जवळ अडीचतीन वर्षें उपद्रव होत होता. मुलीच्या बापानें तिला बरें करण्यासाठीं वाटेल तेवढा पैसा खर्च केला, पण गुण आला नाहीं. शेवटीं त्याला कोणी तरी सांगितलें कीं, ‘ तूं मुलीला घेऊन भापकर महाराज असतील तेथें जा. ते उपाय करतील. ’ म्हणून तो मारवाडी मुलीला घेऊन महाराजांकडे आलेला होता. महाराजांनीं मारवाड्याला कोठून आला, कां आला वगैरे पृच्छा केली. मारवाड्यानें मुलीची हकीगत सांगितली. तिच्या सर्व अंगावरील बिब्ब्याच्या फुल्या दाखविल्या. सुमारें एक इंचाच्या अंतरावर फुली असें सर्व अंग फुल्यांनीं भरलें होतें. महाराजांनीं तो प्रकार आम्हांला दाखविला. तो प्रकार पाहून आम्हीहि अगदीं चकित होऊन गेलों.

त्या मुलीकडे बघून महाराजांनीं मारवाड्याला सांगितलें, “ आजपासून पुढें अंगावर फुल्या येणार नाहींत आणि दुसरेहि प्रकार होणार नाहींत. ”

मारवाडी निघून गेल्यावर महाराज म्हणाले, “ हा भानामतीचा प्रकार बरं का ! असे अनेक प्रकार मीं पाहिले आहेत, पण आतां यापुढें त्या मुलीच्या अंगावर अशा फुल्या येणार नाहींत. ”

तो मारवाडी आठ दिवस कर्जत येथें होता; आणि सकाळ-संध्याकाळ तो महाराजांच्या बैठकींत येऊन बसत असे. आठव्या दिवशीं महाराजांनीं त्याला विचारलें, “ आठ दिवसांत कधीं फुल्या आल्या का ? किंवा दुसरा-तिसरा प्रकार झाला का ? ”

मारवाडी म्हणाला, “ कोणताच प्रकार झाला नाहीं. उलट पूर्वीच्या फुल्यांच्या खपल्या पडून मुलीचें अंग स्वच्छ झालें आहे. ”

महाराज म्हणाले, “ शेटजी, तुम्ही आतां आपल्या गांवीं जा. मुलीला यापुढें कसलीहि बाधा होणार नाहीं. कांहीं काळजी करूं नका. ”

शेटजींनीं विचारलें, “ महाराज, माझ्यावर आपले अनंत उपकार झाले आहेत. मी आपणांला काय देऊं ? ”

आम्ही जवळच होतों. महाराज कांहींहि घेत नाहींत असें आम्हीं शेटजींना सांगितलें. शेटजी व त्यांची मुलगी उभयतां महाराजांच्या पायां पडले आणि ते आपल्या गांवीं आनंदानें निघून गेले.

मारवाड्याच्या मुलीचा चमत्कार पुढें कित्येक दिवस माझ्या मनांत वागत होता; परंतु त्या चमत्काराचा कार्यकारणभाव मला आकलन होत नव्हता. पुढें 'पातंजलयोगदर्शन' हा ग्रंथ मी वाचला तेव्हां मला सर्व कांहीं समजून आलें. सत्यनिष्ठ पुरुषाच्या तोंडून एखादी इच्छा शब्दरूपानें व्यक्त होतांच ती इच्छा हीच एक सृष्टींतील शक्ति असल्यामुळें त्या इच्छाशक्तीच्या प्रभावानें ती इच्छा सफल होईल अशा प्रकारच्या घडामोडी बाह्य सृष्टींत होऊं लागतात; आणि अन्तीं त्याच्या इच्छेप्रमाणें प्रत्यक्ष सृष्टींत त्या गोष्टी घडून येत असतात. योग्याला प्राप्त होणारी वाचाशक्ति ती हीच ! याच शक्तीच्या अनुरोधानें योगी बोलेल तें सत्यसृष्टींत उतरत असतें. भापकर महाराज हे महान् योगी असल्यामुळें “ त्या मुलीच्या अंगावरील फुल्या जातील ” असें म्हटल्यावर त्या फुल्या खरोखरच गेल्या व त्या पुन्हां कधीं आल्या नाहींत. मला त्या चमत्काराचा उलगडा झाला.

* * *

एकदां महाराजांचा मुक्काम पंधरा-वीस दिवस सोलापूर जिल्ह्यांतील रोपळें या गांवीं होता. गांवकरी मंडळी रोज संध्याकाळीं त्यांच्याकडे येत. त्या वेळीं कोणी ना कोणी त्यांना एखाद्या विषयावर प्रश्न विचारीत असे. महाराज त्या विषयावर प्रवचनद्वारां त्याचें समाधान करीत असत. प्रवचनाचा कार्यक्रम दीड-दोन तास चालायचाच. तेथें एक पोस्टमास्तर

होते. त्यांना अपत्य नव्हतें. ते संध्याकाळीं प्रवचन कधींहि चुकवीत नसत. त्यांच्या मनांत महाराजांविषयीं अत्यंत पूज्यभाव वसत होता. मास्तरांना वाटे कीं, संततीबद्दल महाराजांना प्रश्न विचारावा; परंतु त्यांना धीर होईना. महाराज रोपळ्याला आठ-दहा दिवस राहिल्यावर "आम्ही उद्यां मुक्काम हालवणार" असें म्हणूं लागले, पण गांवची मंडळी कांहीं केल्या त्यांना सोडीनात.

एका रविवारीं जेवण झाल्यावर दुपारीं १ वाजतां कोणाला न-कळत महाराज रोपळ्याहून निघाले व तेथून चौदा मैलांवर असलेल्या गांवीं संध्याकाळीं ७ वाजतां जाऊन पोहोंचले. त्या दिवशीं पोस्टाला सुटी होती म्हणून पोस्टमास्तर गांवच्या कांहीं मंडळीबरोबर गांवाबाहेर एका मळ्यांत हुर्डा खाण्यास गेले होते. तिकडून संध्याकाळीं ५ वाजतां ते परत आले. महाराज दुपारीं १ वाजतांच रोपळ्याहून निघून गेल्याचें त्यांना कळलें. पोस्टमास्तरांना या गोष्टीची तळमळ लागून राहिली. रात्रींचें जेवण झालें, पण त्यांना कांहीं केल्या चैन पडेना. अशा स्थितींत त्यांनीं रात्रीं पुढच्या दाराची कडी घातली आणि ज्या खोलींत ते झोंपत होते त्या खोलीचीहि कडी घातली. मास्तरांच्या पत्नीला केव्हांच झोप लागली, पण मास्तरांना मात्र झोप येईना. आम्हांला नकळत महाराज गेले कसे या विवंचनेंतच मास्तर अंथरुणावर पडून होते. त्यांना अर्धवट झोंप लागत होती अशा वेळीं, ज्या खोलींत ते निजले होते त्या खोलीच्या दारावर कोणी तरी थाप मारल्याचा त्यांना भास झाला. मास्तर उठले आणि "कोण आहे ?" म्हणून त्यांनीं विचारलें. "मी लक्ष्मण आहे" असें बाहेरून उत्तर आलें. मास्तरांनीं उठून कडी काढली तेव्हां त्यांना बाहेर महाराज उभे असल्याचें दिसलें. महाराज खोलींत आले. मास्तरांना विलक्षण आनंद झाला व त्यांनीं महाराजांना बसायला पाट दिला. नंतर महाराजांनीं मास्तरांना दोन पाट मांडायला सांगितलें व एकावर मास्तरांना व दुसऱ्यावर

मास्तरांच्या पत्नीला बसायला सांगितलें. ते बसल्यावर महाराजांनीं बाईच्या ओटींत एक नारळ टाकला आणि तो नारळ देवांत ठेवून त्याची रोज पूजा करण्यास त्यांना सांगितलें. मग महाराज म्हणाले, " मास्तर तुम्हांला एक वर्षांत मुलगा होईल. " असें म्हणून महाराज तेथून निघून गेले. मास्तर व त्यांची पत्नी यांना तें ऐकून अवर्णनीय आनंद झाला. आपल्या मनांतील गोष्टी महाराजांना न सांगतांच महाराज आपणहून आपल्या घरीं आले आणि प्रसाद म्हणून त्यांनीं आपल्याला नारळ दिला याबद्दल त्यांना एक प्रकारची धन्यता वाटली. महाराज निघून गेल्यावर मास्तरांनीं खोलीच्या दाराची आंतून कडी लावून घेतली.

मास्तर आतां निजणार इतक्यांत त्यांना शंका आली कीं, महाराज खोलींत आले ते कसे आले ? पुढच्या दाराची तर कडी लावलेली होती व ती आपण उघडलेली नव्हती. खात्री करून घेण्यासाठीं ते पुढल्या दारापाशीं गेले आणि पहातात तों पुढच्या दाराची कडी लावलेली. दुसऱ्या कोणत्याहि बाजूनें वाड्यांत येण्याला मार्ग नव्हता. अशा स्थितींत महाराज घरांत आले कसे व घरांतून बाहेर गेले कसे याचा मास्तरांना मोठा अचंबा वाटला. त्यांना या कोड्याचा उलगडा कांहीं केल्या होईना. महाराज आले होते हा केवळ भ्रम झाला असें म्हणावें तर त्यांनीं दिलेला नारळ प्रत्यक्ष समोर दिसत होता. मास्तर गोंधळांत पडले; आणि महाराज रात्रीं कोणाला भेटले होते का याची चौकशी करण्यासाठीं कंदील घेऊन ते घराच्या बाहेर पडले; आणि जीं माणसें रोज संध्याकाळीं महाराजांच्या सभोंवतीं जमत असत त्यांना जाऊन ते भेटले व घडलेली सर्व हकीगत त्यांना सांगितली. सर्वांनाच झालेल्या चमत्काराचें मोठें आश्चर्य वाटलें. त्यांपैकीं सहा-सात जणांनीं विचार केला कीं, महाराज ज्या गांवीं गेले होते तेथें रातोरात जाऊन, हा काय प्रकार आहे याबद्दल खुद्द महाराजांनाच विचारावें. असा विचार करून

मास्तर व त्यांच्याबरोबर पांच-सहा माणसें कंदील घेऊन निघालीं; आणि महाराज ज्या गांवीं गेले होते त्या गांवीं पहांटे पांच वाजतां तीं मंडळी जाऊन पोहोंचली. त्या वेळीं महाराज बुद्धिबळें खेळत असलेले त्यांना दिसले. चौकशीअंतीं त्यांना समजलें कीं, महाराज दिवेलागणीपासून तेथेंच होते, दुसरीकडे कोठेंहि गेले नव्हते. मास्तरांनीं आपल्या घरीं झालेला प्रकार महाराजांच्या कानावर घातला तेव्हां महाराज नुसते गालांतल्या गालांत हंसले; पण त्या बाबतींत एक शब्दहि बोलले नाहींत. पुढें एक वर्षाच्या आंत मास्तरांना खरोखरच मुलगा झाला.

रोपळ्याहून महाराज परगांवीं गेले आणि पुन्हां रोपळ्याला मास्तरांच्या घरीं ते प्रगट झाले, ही गोष्ट खरोखरच घडली होती. महाराजांनीं एकाच वेळीं दोन रूपें धारण केलीं होतीं. मीं 'गुरुचरित्र' हा प्रासादिक ग्रंथ अनेक वेळां वाचलेला असल्यामुळें या चमत्काराचें मला फारसें आश्चर्य वाटलें नाहीं किंवा तो चमत्कार घडला नाहीं, असाहि अविश्वास माझ्या मनांत निर्माण झाला नाहीं. गाणगापूरचे श्रीनृसिंहसरस्वति हे दिवाळींत एकाच वेळीं आपल्या आठ शिष्यांकडे गेले होते व शिवाय मठांतहि राहिले होते. त्यांनीं एकाच वेळीं हीं नऊ रूपें धारण केल्याची हकीगत मी गुरुचरित्रांत वाचलेली होती. एकाच वेळीं अनेक रूपें धारण करण्याची ही एक प्रकारची योगसिद्धी आहे व ती भापकर महाराजांना प्राप्त झालेली होती, ही गोष्ट मला चांगली माहीत होती. त्यामुळेंच महाराजांना एकाच वेळीं दोन रूपें धारण करणें शक्य झालें. महाराजांच्या ठायीं वाचासिद्धि असल्यामुळें त्यांच्या आशीर्वादाप्रमाणें पोस्टमास्तरांना मुलगाहि झाला होता.

महाराजांना भूतजय ही सिद्धीहि साधली होती. रोपळे येथें महाराजांचें वास्तव्य असतांना दुसरीहि एक हकीगत घडली. एके दिवशीं संध्याकाळीं महाराज व गांवचीं कांहीं माणसें एके ठिकाणीं बसलीं

असतांना तेथील एका देवळांतील पुजारी उठून बाहेर जाऊं लागला. महाराजांनीं त्याला विचारलें, " इतक्या घाईनें कोणीकडे चाललास ? "

पुजारी म्हणाला, " देवळांत दिवा लावायला तेल नाहीं तें आणायला जातो. "

यावर महाराज म्हणाले, " पूर्वीं कांहीं संतांनीं समईत तेलाऐवजीं पाणी घालून दिवे लावल्याच्या गोष्टी आपण ऐकल्या आहेत. तरी त्या संतांचें स्मरण करून समईत पाणी घालून दिवा जळतो कीं काय तें पाहूं या. "

असें म्हणून सर्व मंडळी महाराजांबरोबर आंत देवळाच्या गाभाऱ्यांत गेली. तेथें महाराजांनीं पुजाऱ्यास समईत पाणी घालण्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें समईत पाणी घातलें. महाराज म्हणाले, " आतां लावा दिवा. "

पुजाऱ्यानें काडी ओढली व वातीला लावली. दिवा लागला आणि ज्योत एकसारखी तेवत राहिली. जणूं काय समईत तेलच घातलें होतें.

महाराजांच्या अंतर्साक्षित्वाच्या खुणा तर मला अनेकवार पटल्या आहेत. एवढा अंतर्साक्षी पुरुष निदान माझ्या तरी बघण्यांत नाहीं. एके दिवशीं दुपारीं आम्ही दोघेच बोलत बसलों होतों. वेदान्त आणि व्यवहार एकरूप कसे आहेत हें विशद करून ते मला सांगत होते. ते म्हणाले, " धर्माचीं लक्षणें, ज्ञानाचीं लक्षणें आणि 'पातंजलयोग दर्शनांतील' यमनियम यांत एकरूपता आहे. अहिंसा, सत्य इत्यादि तत्त्वें आत्यंतिक स्वरूपाचीं नसून सापवाद आहेत. अहिंसा किंवा सत्य यांच्या परिपालनानें जर मोठे घातपात व अनर्थ होत असतील आणि अशा ठिकाणीं हिंसा व असत्य यांनीं ते टळत असतील, तर हिंसा व असत्य यांचा अवलंब केला पाहिजे. "

या तत्त्वाला त्यांनीं मनुस्मृति, ज्ञानेश्वरी इत्यादि ग्रंथांतील आधार आणि सामान्य व्यवहारांतील बरीच उदाहरणें दिलीं. त्या दिवशीं आमच्या मळ्यांत मिरच्या काढण्यासाठीं ८०–९० बाया लावल्या होत्या.

महाराजांचें वरील भाषण चालू असतांना माझें लक्ष मळ्याकडे गेलें. तेव्हां महाराज मला एकदम म्हणाले, " दत्तोपंत, मी काय सांगतों तें नीट ऐकून घ्या. मळ्यांत जायला अजून पुष्कळ अवकाश आहे. "

असें म्हणूत ते हंसले व चालू विषयावर पुन्हां बोलूं लागले.

एकदां उन्हाळ्यांत आम्ही दोघेजण आमच्या अंगणांत गाद्या टाकून निजलों होतों. मी नुसते डोळे मिटून पडलों होतों. रात्रीं बारा वाजण्याचा सुमार असेल. माझ्या डोळ्यांसमोर कांहीं एक देखावा दिसत होता. अशा वेळीं महाराजांनीं मला एक थप्पड मारली आणि " अमुक देखावा तुम्हांला दिसतो आहे ना ? " असें विचारलें. मी 'होय' म्हणालों. नंतर आम्ही दोघे उठून बसलों, पानतंबाखू खाल्ली, ध्यानयोगावर बातचीत केली आणि नंतर झोंपलों.

महाराजांच्या अंतर्साक्षित्वाचीं अशीं एक कीं दोन, अनेक उदाहरणें मला माहीत आहेत. एकदां महाराज आमच्या घरीं बसले असतांना तेथें नित्याप्रमाणें बरीच मंडळी जमली होती. त्या वेळीं मामलेदार व मुन्सफ हेहि बसले होते. एकानें महाराजांना प्रश्न केला, " जीवन्मुक्त कोटींतील मनुष्य अमावस्येला, दक्षिणायनांत किंवा कृष्णपक्षांत मृत्यु पावला तर त्याला अधोगति प्राप्त होते का ? "

यावर महाराज म्हणाले, " तुमचा प्रश्न बरोबर नाहीं. मनुष्याला आत्मसाक्षात्कार झाला म्हणजे तो तात्काळ मुक्तच होतो. ' ज्ञानादेवतु-कैवल्यम् ' असा सिद्धान्त आहे. ज्ञानप्राप्ति झाल्याबरोबर तो मुक्त होतो व त्याच्या उर्वरित आयुष्यांतील कर्मांना दग्धबीजाप्रमाणें अंकुर फुटत नाहींत. पापपुण्याप्रमाणें अधोगति किंवा ऊर्ध्वगति प्राप्त होते हा नियम जीवन्मुक्ताला लागू नाहीं. "

जीवन्मुक्ताच्या मृत्युविषयीं आमची ही चर्चा झाली. त्या वेळीं महाराजांसारख्या जीवन्मुक्ताचें महाप्रयाण जवळ आलें असेल या गोष्टीची आम्हांला कल्पनाहि नव्हती. माझ्या व्यक्तिगत आयुष्यांतील एक महान्

तेजस्वी पर्व समाप्त होणार आहे या गोष्टीची मलाहि कल्पना आली नाहीं. चौदा वर्षें त्यांच्या सहवासाची मला संवय झाली होती. त्यांचा सहवास म्हणजे माझ्या जीवनांतील एक अपरिहार्य भागच बनला होता; तो भाग आतां गळून पडणार होता आणि माझ्या जीवनांत पोकळी निर्माण होणार होती. पण तसेंहि म्हणणें युक्त ठरणार नाहीं. कारण मृत्यु हा मानवी जीवनाचा एक अपरिहार्य असा भाग आहे. जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला आज ना उद्यां गेलें पाहिजे, हें मानवी जीवनाचें साधेंसुधें तत्त्व-ज्ञान माझ्या अंगीं मुरलेलें होतें. तें तसें मुरलें नसतें तर महाराजांचा चौदा वर्षांचा निकट सहवास वांया गेला, असेंच ठरलें असतें. पण कांहीं असलें तरी मला त्यांच्या महानिर्याणाची पूर्वकल्पना मात्र आली नाहीं.

महाराजांना मात्र त्यांचा अंतकाळ कळलेला होता. देहपातापूर्वी त्यांनीं आपल्या मुलाला जवळ बोलावून घेतलें. ते म्हणाले, " आतां लवकरच राघू पिंजऱ्यांतून उडून जाणार आहे. तुम्हांला काय सांगायचें तें सांगून ठेवलेलेंच आहे. "

एके दिवशीं आपल्या मुलाबरोबर ते रांतंजनच्या गांवाबाहेर फिरायला गेले असतांना मध्येंच उभे राहिले आणि एका जागेकडे बोट दर्शवून त्याला म्हणाले, " ही जागा किती रम्य आहे ! या ठिकाणींच कायम राहावें असें वाटतें ! "

ही त्यांच्या महाप्रयाणाबद्दलचीच सूचना नव्हती कां ?

महाराजांचा संसार म्हणजे जीवन्मुक्ताचाच संसार ! संसाराची काळजी त्यांनीं कधीं वाहिली नाहीं. एखाद्या अनन्य भगवद्भक्ताप्रमाणें योगक्षेमाचा सारा भार परमेश्वरावर टाकून त्यांनीं निर्धास्तपणानें आपलें सांसारिक जीवन व्यतीत केलें. तेव्हां अशा अशाश्वत संसारपाशांत त्यांचें मन गुरफटून राहील ही गोष्ट शक्यच नव्हती. 'तिकडून' बोलावणें आलें म्हणजे जाण्याची त्यांची तयारी होती. जीवात्मा आतां देहाच्या

पिंजऱ्यांतून उडून जाणार, ही गोष्ट एखाद्या नित्याच्या गोष्टीप्रमाणें त्यांनीं आपल्या मुलाला सहज सांगितली.

मुलाशीं वरीलप्रमाणें बोलणें झाल्यावर तीनचार दिवसांनीं महाराज आपल्या गादीवर दुपारीं डोळे मिटून स्वस्थ पडून राहिले. रात्रीं त्यांच्या अंगांत ताप भरला. महाराजांनीं आपल्या मुलाला विचारलें, " उत्तरायण लागलें कां ? "

मुलानें सांगितलें, " परवां उत्तरायण लागतें. "

उत्तरायण लागेपर्यंत भीष्माचार्य असेच शरपंजरीं शयन करून पडले होते. मग एकादशी केव्हां आहे, या गोष्टीची महाराजांनीं चौकशी केली. मुलानें तोहि दिवस सांगितला. अंगांत ताप होताच. सोलापुराहून, बार्शीहून डॉक्टर मंडळी आली. महाराजांच्या अंगाला हात लावला असतांना तो भाजत असे, पण डॉक्टरांनीं थरमॉमिटर लावला त्यांत मात्र ताप चढलेला दिसेना. महाराज हंसून म्हणाले, " आमचा ताप तुमच्या थरमॉमिटरमध्यें येणारा नाहीं. "

या चमत्काराचें डॉक्टरांना आश्चर्य वाटलें. हाताला चांगला ताप लागतो आहे, पण त्याची थरमॉमिटरमध्यें नोंद मात्र होत नाहीं; या गोष्टीचें मनाशीं आश्चर्य करीत डॉक्टर निघून गेले.

उत्तरायण लागलें. एकादशीचा दिवस उगवला. त्यांनीं दिग्दर्शित केलेल्या त्या दिवशीं देहाच्या पिंजऱ्यांतून जीवात्मा उडून गेला. महाराजांचा पार्थिव देह थंड झाला. तेजांत तेज मिसळलें.

महाराजांच्या जीवनाचें सोनें झालें. त्यांतील कांहीं सुवर्णकण माझ्याहि वांट्याला आले, पण ते गेल्या क्षणापासून मला मात्र दशदिशा शून्य वाटूं लागल्या.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा,
वा. क्र. ८१०५ नों. दि
वि. ... बा-वा ... ६



आपल्या इष्टदेवतेची उपासना केल्यानंतर उपासकाला कांहीं समाधिसिद्धि प्राप्त होतात; आणि या सिद्धींच्या बळावर तो चमत्कृतिजन्य अशीं अलौकिक कृत्यें करूं शकतो. उपासक आपलीं सारीं कर्में ईश्वरार्पणबुद्धीनें करीत असतो; आणि त्यांतूनच भक्ताच्या ठिकाणीं अलौकिक सिद्धि प्रगट होत असतात. अशा श्रेष्ठ उपासकानें केलेले चमत्कार मानवी बुद्धीला थक्क करून सोडतात. समक्ष बघितलेले वा मला माहीत असलेले असे कांहीं चमत्कार खरोखरच सांगण्यासारखे आहेत.

महान् गाणपत्य गणपतिबुवा म्हसकर यांची उपासना खरोखरच दांडगी होती; आणि त्यांना उपसनासिद्धीहि तशीच प्राप्त झाली होती. रत्नागिरीजवळ शिरगांव या नांवाचें एक लहान गांव आहे. गणपतिबुवा या गांवचे रहाणारे. त्यांच्या बालपणीं घरांत अठराविश्वें दारिद्य वास करीत होतें. गणपतिबुवा वीस वर्षांचे असतांना एकदां त्यांच्या घरांतील आवश्यक अशा धार्मिक संस्काराला खर्चासाठीं एक पै सुद्धां शिल्लक नव्हती. त्या वयांत त्यांना पुढील श्लोक तोंडपाठ येत होता. ‘ कऱ्हेच्या तिरीं एकसे मोरगांव । तिथें नांदतो मोरया देव पाहूं ॥ चला जाऊं यात्रे महापुण्य आहे । मनीं इच्छिलें मोरया देत आहे ॥ ’ हा श्लोक गणपतिबुवा मोठ्या भक्तिभावानें म्हणत. आमच्या लहानपणीं जेवणाच्या पंक्तींत लहान मुलें हा श्लोक म्हणत असत. हा श्लोक म्हणतांना गणपतिबुवांच्या मनांत येई कीं, ‘ मोरगांवचा मोरया मनीं इच्छिलें तें देतो. तेव्हां तेथें जाऊन आपलें दारिद्र्य दूर कर, अशी त्याला प्रार्थना करायला काय हरकत आहे ? ’

परंतु मोरगांव कोठें आहे, तेथें कोणत्या मार्गानें व कसें जावयाचें या गोष्टींचा उलगडा त्यांच्या बालमनाला होत नसे. पण मोरगांवला जाण्याची उत्कट इच्छा त्यांच्या मनांत निर्माण झाली होती आणि ती त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हती.

मोरगांवाचा शोध करावयाचा या उत्कट इच्छेनें प्रेरित होऊन गणपतिबुवा एके दिवशीं मुंबईला निघाले. अनंतऋषींच्या वाडींत त्यांच्या परिचयाचे एक गृहस्थ होते; त्यांच्या घरीं ते उतरले. त्यांना पाहिल्याबरोबर त्या गृहस्थानें विचारलें, " तूं येथें कशाला आलास ? "

गणपतिबुवा म्हणाले, " मला मोरगांवला जायचें आहे. तरी मोरगांव कोठें आहे याचा तपास करून मला सांगा. "

त्या गृहस्थानें चौकशी करून सांगितलें कीं, मोरगांव पुण्यापासून सुमारें ४० मैल लांब आहे.

त्या वेळीं फक्त ठाण्यापर्यंत आगगाडी झाली होती. गणपतिबुवांनीं त्या गृहस्थाकडून वाटखर्चासाठीं थोडे पैसे घेऊन ते ठाण्यापर्यंत आगगाडीनें आले. पुढें पुण्यापर्यंत त्यांनीं पायानें मजल मारली व पुण्याहून विचारपूस करीत ते मोरगांवीं येऊन दाखल झाले.

गणपतिबुवा मोरगांवीं आले पण त्या ठिकाणीं त्यांची कोणाशींहि ओळख नव्हती. त्यांनीं देवळांत जाऊन मोरयादेव मात्र डोळे भरून पाहून घेतला. आपलें दारिद्र्याचें गाऱ्हाणें त्यांनीं मनांतल्या मनांत त्याच्या कानावर घातलें. त्यांच्याजवळ खायला कांहींहि नव्हतें. शेंगादाणे, फुटाणे खाऊन ते एका ओवरींत स्वस्थ बसून राहिले. आपलें दारिद्र्य दूर व्हावें ही त्यांच्या मनांतील इच्छाहि तशींच मनांत बसून राहिली.

त्या वेळीं मोरगांवला एक गाणपत्य सिद्ध पुरुष रहात होता. एके दिवशीं गणपतीचें दर्शन घेऊन प्रदक्षिणा घालीत असतांना एका ओवरींत गणपतिबुवा सचिंत असे बसलेले त्यांना दिसले. त्यांनीं गणपतिबुवांची

चौकशी केली व मोरगांवाला येण्याचें कारण विचारलें. गणपतिबुवांनीं आपली सारी हकीगत सांगितली व मोरगांवला येण्याचें कारणहि सांगितलें.

त्या सिद्ध पुरुषाला त्यांची कींव आली व त्यांनीं गणपतिबुवांना लगेच गजाननाची उपासना दिली. ते सिद्ध पुरुष म्हणाले, " मी दिलेल्या मंत्राचें एकवीस दिवसांत पुरश्चरण कर म्हणजे गजानन महाराज तुझे मनोरथ पूर्ण करतील. कांहीं काळजी करूं नकोस. "

मोठ्या भक्तिभावानें गणपतिबुवांनीं एकवीस दिवसांत त्या सिद्ध पुरुषानें सांगितलेल्या एकाक्षरी मंत्राचें पुरश्चरण केलें. त्या कालावधींत गणपतिबुवांनीं नुसते शेंगादाणे खाऊन कडकडीत उपवास केला. बरोबर एकविसाव्या दिवशीं रात्रीं त्यांना दृष्टान्त झाला. त्यांच्या स्वप्नांत प्रत्यक्ष गणेशमूर्ति आली आणि तिनें गणपतिबुवांना सांगितलें, " उद्यां तुला प्रदक्षिणेच्या वाटेवर माझी सुवर्णमूर्ति सांपडेल, ती घेऊन मुंबईला जा. "

सकाळीं उठल्याबरोबर गणपतिबुवांनीं आपलें स्वप्न आपल्या गुरूला निवेदन केलें व ' पुढें काय करूं ? ' असें विचारलें. त्या सिद्ध पुरुषानें सांगितलें, " प्रदक्षिणेच्या वाटेवर तुला गणपतीची मूर्ति मिळेल, ती घेऊन तूं प्रथम मुंबईला जा. पुढें काय होणार आहे तें तुला तेथे गेल्यावर कळेल. "

गणपतिबुवांचें स्वप्न खरें ठरलें होतें. त्यांना प्रदक्षिणेच्या मार्गावर खरोखरच गणपतीची मूर्ति मिळाली होती. ती मूर्ति त्यांनीं आपल्या गुरूला दाखवून गणपतीबुवांनीं त्यांना वंदन केलें आणि गुरूची आज्ञा घेऊन गणपतिबुवा मोरगांवाहून मुंबईस जाण्यास निघाले.

मुंबईला येऊन पोहोंचल्यावर गणपतिबुवा आपल्या उपास्यदेवतेच्या पूजेंत व गुरूंनीं सांगितलेल्या जपांत अगदीं रंगून गेले. मुंबईला येऊन एक-दोन दिवस गेले नाहींत तोंच एका रात्रीं त्यांना स्वप्न पडलें कीं,

" उद्यां तुझ्याकडे दोन माणसें येतील व जहाजाविषयीं प्रश्न विचारतील. तरी त्यांना सांग कीं, विलायतेहून माल भरून आलेलीं तुमचीं जहाजें बुधवारीं दुपारीं समुद्राच्या किनाऱ्याला येऊन लागतील. त्या माणसांकडून तुला काय मागायचें तें मागून घे. "

तिकडे त्या दोन जहाजांचे मालक खरोखरच चिंतेंत पडले होते. कारण विलायतेहून निघालेलीं त्यांचीं जहाजें वेळेवर किनाऱ्याला लागलेलीं नव्हतीं. त्या रात्रीं त्या दोघांनाहि एकच स्वप्न पडलें कीं, " अनंतऋषींच्या वाडींत गणपतिबुवा म्हसकर आहेत त्यांना जहाजाविषयीं तुम्ही प्रश्न विचारा. ते तुमची काळजी निवारण करतील. "

दुसऱ्या दिवशीं त्या जहाजांचे दोघे मालक एकमेकांस भेटले. त्यांपैकीं एकानें रात्रीं पडलेलें स्वप्न दुसऱ्याला कथन केलें तेव्हां दुसरा म्हणाला, " मलाहि रात्रीं अगदीं तेंच स्वप्न पडलें. "

त्या चुकलेल्या जहाजांत लाखों रुपयांचा माल असल्यानें मालक चिंतेंत पडले होते. स्वप्नाप्रमाणें ते दोघेहि मालक अनंतऋषींच्या वाडींत गेले व तेथें गणपतिबुवा म्हसकरांचा शोध करूं लागले. त्यांना तेथील लोकांनीं सांगितलें, " वरच्या मजल्यावर कोणी शिरगांवचा गणपति म्हसकर आला आहे खरा. तुम्ही वर जाऊन तपास करा. "

ते दोघे व्यापारी वर माडीवर गेले व त्यांनीं गणपतिबुवांना गांठलें. त्या वेळीं गणपतिबुवा पूजेंत गर्क झाले होते. त्या दोन व्यापाऱ्यांकडे बघितल्याबरोबर गणपतिबुवांनीं एकदम प्रश्न केला, " तुमचींच जहाजें बेपत्ता झालीं आहेत ना ? "

तो प्रश्न ऐकून ते दोघेहि व्यापारी आश्चर्यचकित होऊन गेले. गणपतिबुवांना जहाजांची हकीगत कोणींहि सांगितली नसतांना ती त्यांना कशी कळली, हा प्रश्न दोघांच्याहि मनांत उभा राहिला. गणपतिबुवांच्या वरील प्रश्नाचें ते दोघेजण आश्चर्य करीत असतांनाच गणपतीबुवा

पुढें म्हणाले, " घाबरूं नका. तुमचीं जहाजें वादळांत सांपडलीं होतीं पण तीं आतां सुरक्षित आहेत. तीं येत्या बुधवारीं दुपारीं तीन वाजतां किनाऱ्याला येऊन लागतील."

थोडा वेळ थांबून गणपतीबुवा त्या दोघांकडे बघत पुढें म्हणाले, " पण त्या दिवशीं मालासह जहाजें सुरक्षित आलीं तर श्रीपुढें तुम्ही काय ठेवाल ? "

जहाजाच्या मालकांनीं एक लाख रुपये देण्याचें मान्य केलें आणि ते दोघे निघून गेले.

बुधवार केव्हां उगवतो असें मालकांना झालें. अखेरीस बुधवार उगवला. दुपारचे तीन वाजले; आणि काय आश्चर्य ? गणपतीबुवांनीं सांगितल्याप्रमाणें नक्की तीन वाजतां जहाजें सुरक्षित येऊन किनाऱ्याला लागलीं. त्या मालकांचा हर्ष गगनांत मावेनासा झाला. लाखो रुपयांना ते मुकणार होते पण गणपतीबुवांच्या कृपेनेंच त्यांना वांचविलें होते. लगेच धांवत ते गणपतीबुवांकडे गेले व त्यांच्या पायाशीं त्यांनीं लाख रुपयांच्या हुंड्या ठेवल्या.

आपलें दारिद्र्य दूर व्हावें या उत्कट इच्छेनें गणपतीबुवांनीं घर सोडलें होतें. ' मनीं इच्छिलें मोरया देत आहे ' या आश्वासनावर त्यांची परम श्रद्धा होती. अंतःकरणांत ती श्रद्धा बाळगून ते तपास काढीत मोरगांवीं गेले होते. तेथें गेल्यानंतर त्यांना एका सिद्ध पुरुषाचें मार्गदर्शन लाभलें होतें. त्यांना प्रत्यक्ष गजाननानें दृष्टान्त दिला होता आणि अखेरीस द्रव्यार्जनाचा त्यांचा मनोरथ पूर्ण झाला होता. कोणतीहि गोष्ट प्राप्त करून घेण्याची माणसाला उत्कट तळमळ लागली म्हणजे परमेश्वर त्याच्या साहाय्यार्थ धांवून येत असतो हीच गोष्ट खरी !

गणपतीबुवांना एक लाख रुपये मिळाले खरे, पण त्याच क्षणीं त्यांच्या अंतःकरणांतून द्रव्यतृष्णा पार निघून गेली. त्यांना वाटूं लागलें

कीं, गजाननाची आपणांवर पूर्णपणें कृपा झालेली आहे; गजानन आपला योगक्षेम चालवील. मग योगक्षेमाचा सारा भार गजाननावर टाकून गणपतीबुवांनीं मिळालेले एक लाख रुपये एका निराळ्याच कार्यांत खर्चून टाकले. ते शिरगांवीं गेले व आपल्या मातृभूमीवर त्यांनीं गणपतीचें सुंदर मंदिर उभारलें. उरलेला सारा पैसा त्यांनीं दानधर्मांत खर्च केला व आपलें गांव सोडून ते संचाराला निघाले. हिंडतां हिंडतां ते पुन्हां मोरगांवला गेले. तेथें त्यांनीं, चार-पांच वर्षें गणपतीच्या सेवेंत काढलीं व ते ग्वाल्हेरला गेले. ग्वाल्हेरचे शिंदे सरकार यांनीं गणपतीबुवांची योग्यता ओळखून त्यांना माळव्यांत एक गांव व बडोद्याजवळ एक गांव अशीं दोन गांवें इनाम म्हणून दिलीं. हीं दोन्ही गांवें प्रतिवर्षी बारा हजार रुपये उत्पन्न देणारीं होतीं. हीं गांवें पुढें कित्येक वर्षें त्यांच्या वंशजांकडे चालत आलेलीं होतीं. तिकडील माणसांकडून मला कांहीं वर्षांपूर्वीं असें समजलें कीं, ज्या वेळीं गणपतीबुवा स्वर्गवासी झाले त्या वेळीं त्यांच्याजवळ रोख वीस लाख रुपये होते. शिवाय दोन इनाम गांवें होतींच. दरिद्री माणूस उपासनेच्या बळावर प्राप्त झालेल्या परमेश्वरी कृपेनें रंकाचा राव कसा बनतो याचें गणपतीबुवा हें डोळ्यांत भरण्याजोगें असें उदाहरण आहे. त्यांच्या उदाहरणावरून " अनंत हस्तें कमलावरानें देतां किती घेशिल दो करानें " ही कवीची उक्ति सार्थ वाटूं लागते.

माझे वडील मुंबईला अनंतऋषींच्या वाडींत रहात असतांना गणपतीबुवांची ही हकीगत त्या वेळीं त्या वाडींत महशूर झालेली होती. मी स्वतः गाणपत्य असल्यामुळें वडिलांच्या तोंडून मी जेव्हां गणपतीबुवांची सारी हकीगत ऐकली तेव्हांपासून त्या महापुरुषाविषयीं मला फारच आदर वाटूं लागलेला होता. गणपतीबुवांनीं त्यांना मिळालेल्या लाख रुपयांतून शिरगांवीं बांधलेलें भव्य गणपति-मंदिर मी तेथें जाऊन प्रत्यक्ष पाहिलें आहे. सुमारें साठ-बासष्ट वर्षांपूर्वीं त्या मंदिरांत जाऊन मीं

पाहिलेली गणपतीची मूर्ति आजहि माझ्या डोळ्यांसमोर उभी आहे; आणि माझ्या स्मरणांत गणपतीबुवांची हकीगतहि अगदी ताजी आहे.

* * *

उपासनामार्गातील आणखी एका सिद्ध पुरुषाची हकीगत सांगतों. हे सिद्ध पुरुष माझ्या वडिलांचे गुरु होते. त्यांचें नांव यज्ञेश्वर दीक्षित. माझ्या वडिलांच्यावर म्हणजे पर्यायानें आमच्या घराण्यावर त्यांनीं अनंत उपकार करून ठेवलेले आहेत. आज आमच्या घराण्यांत चालत आलेला श्रीगजाननाचा एकाक्षरी महामंत्र या सिद्ध पुरुषानें प्रथम माझ्या वडिलांना दिला. या मंत्राचा प्रभाव खरोखरच महाविलक्षण असा आहे.

दक्षिण महाराष्ट्रांत यज्ञेश्वर दीक्षित यांचा संचार चालला असतांना पुणें जिल्ह्यांतील सासवड येथें कांहीं दिवस त्यांचा मुक्काम होता. सासवड येथील कांहीं मंडळींनीं त्यांचा उपदेश घेतला होता. भाऊ विठ्ठल खळदकर या नांवाचे मराठी शाळेचे हेडमास्तर त्या वेळीं तेथें होते. भाऊराव खळदकर हे महान् श्रद्धाळू आणि सत्वस्थ गृहस्थ होते. त्या सुमारास माझेहि वडील सासवडला मुखत्यार वकील म्हणून काम करीत होते. भाऊराव मास्तर व माझे वडील यांचा चांगलाच स्नेह होता. यज्ञेश्वर दीक्षितांच्या सासवड येथील मुक्कामांत भाऊरावांनीं त्यांच्याकडून उपदेश घेतला होता व त्यांना कांहीं अनुभवहि आले होते.

एके दिवशीं मोठ्या आपुलकीनें भाऊराव माझ्या वडिलांना म्हणाले, " बाबासाहेब, यज्ञेश्वर दीक्षित हे एक मोठे अधिकारी पुरुष आहेत. मीं त्यांचा उपदेश घेतला आहे; आणि थोड्याच दिवसांत त्यांच्या सांगण्याप्रमाणें मला अनुभवहि आला आहे. तेव्हां तुम्हीहि त्यांचा उपदेश घ्या म्हणजे तुमचेंहि ऐहिक व पारमार्थिक कल्याण होईल."

बाबासाहेबांनीं त्यांच्या म्हणण्याला मान्यता दिली आणि ते यज्ञेश्वर दीक्षितांकडे गेले. यज्ञेश्वरांनीं माझ्या वडिलांना गजाननाची व

त्रिपुरसुंदरीची उपासना दिली. त्यानंतर दीक्षितांचा सासवडला सुमारें एक महिनाभर मुक्काम होता. भाऊ मास्तर व बाबासाहेब रोज त्यांच्या जवळ जाऊन बसत. त्यांच्या अनुभवाच्या गोष्टी ऐकतांना भाऊ मास्तर व बाबासाहेब अगदीं रंगून जात.

एके दिवशीं बाबासाहेबांच्या मनांत आलें कीं, जप करायला आपल्यापाशीं माळ नाहीं तरी एखादी माळ मिळविली पाहिजे. हा विचार बाबासाहेबांच्या मनांत आला तेव्हां दीक्षित आपल्या रुद्राक्षाच्या माळेनें जप करीत होते. त्यांचा जप झाल्यावर ते बाबासाहेबांना म्हणाले, " तुम्हांला जप करायला माळ हवी आहे ना ? हात पुढें करा पाहूं ! "

असें म्हणून यज्ञेश्वर दीक्षितांनीं आपली माळ बाबासाहेबांच्या हातावर टाकली आणि त्यांना सांगितलें, " बाबासाहेब, ही माळ माझ्या गुरूंची आहे. हिच्यावर आजवर माझ्या गुरूंचा व माझा कोट्यवधि जप झालेला आहे. या माळेचा फार दांडगा प्रभाव आहे. या माळेला मी आजपर्यंत जीव कीं प्राण म्हणून जपत होतों. तुम्हीहि या माळेची अशीच जपणूक करा. हिच्यावर मीं सांगितलेला जप सतत चालू ठेवा. "

कांहीं वेळ थांबून यज्ञेश्वर पुढें म्हणाले, " ही माळ घ्यायला तुम्ही पात्र आहांत अशी मला आंतून स्फूर्ति झाली म्हणून या माळेचा प्रसाद मी तुम्हांला दिला. ही माळ तुमचें कल्याण करील याविषयीं मनांत मुळींच शंका बाळगूं नका. "

बाबासाहेबांना जपमाळ हवीच होती. त्यांच्या मनांत माळेबद्दल विचार आला. लगेच ती गोष्ट त्यांच्या गुरूनें अंतर्ज्ञानानें ताडली आणि त्यांना प्रसाद म्हणून आपली स्वतःचीच माळ दिली.

ती माळ स्वीकारतांना आपल्या गुरूंच्या अंतर्ज्ञानाबद्दल बाबा-साहेबांची खात्री तर पटलीच; परंतु ती माळ घेतांना त्यांना एक प्रकारची जबाबदारीहि वाटूं लागली. यज्ञेश्वर दीक्षितांची माळ म्हणजे साधीसुधी

गोष्ट नव्हती. त्या माळेवर त्यांच्या गुरूंचा व त्यांचा स्वतःचा कोट्यवधि जप झालेला होता. ती माळ आतां आपल्याकडे आलेली आहे याचा अर्थ ती जप-परंपरा आपणहि त्याच सातत्यानें पुढें चालविली पाहिजे, ही गोष्ट बाबासाहेबांच्या मनासमोर आली; परंतु त्याचबरोबर अशा प्रकारची श्रेष्ठ परंपरा असलेली ती जपमाळ गुरूंनीं स्वतः होऊन देऊं केल्याबद्दल बाबासाहेबांना परमावधीचा आनंद झाला आणि त्याच क्षणीं आपल्या गुरूंची जप-परंपरा पुढें सातत्यानें चालविण्याचा त्यांनीं निर्धार केला.

बाबासाहेबांनीं त्या माळेवर खरोखरच अगणित जप केला. प्रपंचाचा गाडा चालवीत असतांना कधीं काळीं जर दुर्घट संकट येऊन कोसळलें तर त्यावर त्या जपाचा तोडगा यज्ञेश्वरांनीं सुचवून ठेवला होता. नेहमीं जरी नाहीं तरी क्वचित्प्रसंगीं बाबासाहेबांनीं त्या परंपरागत जप-माळेवर ठराविक जप करून आपल्यावर कोसळलेल्या संकटाचें निवारण करून घेतलेलें मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. बाबासाहेबांची मूळचीच वृत्ति धीरगंभीर असे; आणि कोठल्याहि दुर्घट संकटावर मात करण्याची त्यांची सिद्धता असे; परंतु कित्येक वेळां संकटाची शक्ति अधिक होई आणि मग बाबासाहेबांना त्या जपमाळेचा व गुरूंनीं सांगितलेल्या मंत्राचा आश्रय घ्यावा लागे. परंतु त्यानंतर त्या दुर्घट प्रसंगांतून त्यांची मुक्तता झालेली मीं स्वतः अनेक वेळां बघितलेली आहे. त्यांचें कशाला, मला स्वतःला माझ्या व्यक्तिगत आयुष्यांत त्याच जपमाळेचा व त्याच जपमंत्राचा अनेकवार अनुभव आलेला आहे. माझ्या वडिलांच्यानंतर ती जपमाळ व तो जपमंत्र परंपरेनें माझ्याकडे आला. ती परम पवित्र जपमाळ आजहि माझ्या संग्रहीं गोमुखींत आहे. कोणत्याहि संकटांत सांपडावें आणि या जपमंत्राच्या बळावर त्या संकटांतून अचानक मुक्तता व्हावी, असे अनेक प्रसंग माझ्या व्यक्तिगत आयुष्यांत आले. त्या गोष्टींची पक्की नोंद माझ्यापाशीं मीं करून ठेवलेली आहे. परंतु अखेरीस हा श्रद्धेचा आणि

व्यक्तिगत अनुभवाचाच प्रांत आहे. केवळ बुद्धिबळावर असल्या प्रश्नांचा निकाल कधींच लागत नाहीं.

सासवडचा मुक्काम हालवून यज्ञेश्वर दीक्षित यांनीं अनेक ठिकाणीं संचार केला. आपल्या संचारांत ते धार या संस्थानांत गेले. त्यांची कीर्ति तेथील महाराजांच्या कानावर गेली तेव्हां महाराजांनीं त्यांचा सन्मान करून उपदेश घेतला व त्यांचें शिष्यत्व पत्करलें. यज्ञेश्वर दीक्षितांचा धार येथें मुक्काम असतांना त्यांच्याच व्यक्तिगत आयुष्यांत एक विलक्षण प्रसंग घडून आला. त्यांची दिनचर्या चालू असतांना त्यांची पत्नी एके दिवशीं सकाळीं उठली त्या वेळीं तिच्या अंगावर सर्वत्र पांढरें कोड फुटल्याचें दिसून आलें. प्रथम तिच्या अंगावर कोडाचा एक सुद्धां ठिपका नव्हता; पण एके दिवशीं तिचें सारें अंग पांढरें फटफटीत पडलें. स्वतःच्या पत्नीच्या अंगावर फुटलेलें कोड यज्ञेश्वर दीक्षितांनीं बघितलें, पण त्यांच्या मनांत यत्किंचितहि खळबळ उडाली नाहीं. ते अगदीं शांत होते.

धारच्या महाराजांना ही बातमी समजली तेव्हां त्यांनाहि त्या गोष्टीचें आश्चर्य वाटलें. आपल्या गुरुपत्नीच्या बाबतींत हा प्रकार झाल्यामुळें महाराजांच्या मनाला रुखरुख लागली. काय वाटेल तें करून हा प्रकार नाहींसा झाला पाहिजे, असें त्यांच्या मनानें घेतलें आणि महाराज स्वतः यज्ञेश्वर दीक्षितांकडे धांवत आले आणि म्हणाले, "मुंबईहून एखाद्या चांगल्या डॉक्टरला बोलावून घेऊं का?"

यावर दीक्षित हंसून म्हणाले, "राजा, माझ्या बायकोचें कोड बरें करण्यासाठीं आम्हांला तुमच्या नाकाडोळ्यांच्या डॉक्टरची गरज नाहीं."

आणि थोडा वेळ थांबून दीक्षित पुढें म्हणाले, "आमची सप्तश्रृंगीला जाण्याची तयारी कर."

महाराजांनीं त्याप्रमाणें सर्व तयारी केली. दीक्षितांच्याबरोबर आवश्यक असें सर्व सामानसुमान व माणसें देऊन त्यांची धारहून

सप्तश्रृंगीला रवानगी करण्यांत आली. दीक्षित आपल्या पत्नीसह सप्त श्रृंगीस आले.

त्या ठिकाणीं देवीसमोर एकवीस दिवस उपोषण करून त्यांनीं अनुष्ठान केलें. बरोबर एकविसाव्या रात्रीं दीक्षितांना दृष्टान्त झाला कीं, देवीच्या तीर्थानें बाईला स्नान घाल म्हणजे ती कुष्ट-मुक्त होईल.

दृष्टान्तांत झालेल्या आज्ञेप्रमाणें २२ व्या दिवशीं त्यांनीं आपल्या पत्नीला देवीच्या तीर्थानें स्नान घातलें. अंग पुसतांना कातडीवरील कोंडा जाऊं लागला व सर्व कोड नाहींसें होऊन त्यांच्या पत्नीचा देह पूर्ववत् झाला.

मंत्रजपाच्या अनुष्ठानानें देवता प्रसन्न करून घेण्याचें दीक्षितांच्या ठिकाणीं केवढें महान् सामर्थ्य होतें याची वरील उदाहरणावरून कोणालाहि सहज कल्पना येऊं शकेल.

आज हाच मंत्र परंपरेनें माझ्या घराण्यांत आलेला आहे. त्या मंत्राचा वापर करतांना मला त्या मंत्राविषयीं परमादराची भावना तर वाटतेच, पण त्या मंत्राचा धाकहि वाटतो. कारण गुरुपरंपरा टिकविण्याची केवढी मोठी जबाबदारी आपल्या अंगावर येऊन पडलेली आहे असें मला वाटतें; पण तीहि गोष्ट गुरुकृपेनेंच साध्य होते नाहीं का ?

* * *

शिवकांची येथें अप्पय्या दीक्षित या नांवाचे असेच एक सिद्ध पुरुष होऊन गेले. त्यांनीं उपासनेच्या बळावर अशाच अनेक महासिद्धि हस्तगत करून घेतल्या होत्या. अप्पय्या दीक्षित हे विद्वान् साहित्यिक होते. 'कुवलयानन्द' या नांवाचा अलंकारशास्त्रावरील ग्रंथ त्यांनीं लिहिला. त्या ग्रंथांत त्यांची विद्वत्ता प्रतीत होते; परंतु विद्वत्तेपेक्षांहि त्यांना लाभलेली उपासनासिद्धि ही अलौकिक होती. त्या सिद्धीच्या बळावर त्यांनीं अनेक चमत्कार केले. म्हैसूरचे महाराज त्यांच्या दर्शनासाठीं जेव्हां शिवकांचीला

आले तेव्हां त्यांनीं केलेला चमत्कार ऐकण्यासारखा आहे. म्हैसूरचे महाराज त्यांना गुरुस्थानीं लेखत. आपल्या गुरूंना अर्पण करण्यासाठीं महाराजांनीं एक भरजरी शाल आणली होती. दीक्षित अग्निहोत्री असल्यानें ते त्या वेळीं अग्नीला आहुति देत होते. महाराजांनीं त्याच वेळीं त्यांना शालजोडी अर्पण केली. शालजोडीचा स्वीकार करून अप्पय्यांनी ती अग्नि-समोर धरली आणि " अग्नेय स्वाहा अग्नय इदं न मम " असें म्हणून त्यांनीं ती शालजोडी धगधगलेल्या अग्निकुंडांत अर्पण करून टाकली.

आपल्या गुरूनें केलेला तो प्रकार पाहून महाराजांना मनस्वी वाईट वाटलें, पण गुरूपुढें बोलण्याची सोय नव्हती. दीक्षितांनीं महाराजांना प्रसाद घेऊन जाण्याची आज्ञा केली, पण जेवत असतांना महाराजांचें मन मुळींच स्वस्थ नव्हतें. आपल्या गुरूंनीं बहुमोलाची शालजोडी अग्नींत खुशाल टाकून दिली याचें शल्य महाराजांना एकसारखें बोचत होतें.

सकाळचें सारें आन्हिक उरकल्यावर हे गुरुशिष्य एकत्र बसले. त्यांचें आवांतर बोलणें चालू असतांना दीक्षित मध्येंच महाराजांना म्हणाले, " तूं दिलेली शालजोडी मी अग्निकुंडांत टाकून दिली यामुळें तुझा विरस झाला आहे हें मी जाणतों; परंतु माझा उपदेश घेऊन तूं अद्याप माझ्यांत आणि अग्नींत फरक मानतोस याबद्दल मला आश्चर्य वाटतें. "

असें म्हणून दीक्षितांनीं महाराजांना अग्निकुंडाजवळ नेलें आणि कुंडांतील अग्नि थोडा बाजूला करून खालीं असलेल्या शालजोडीचा कोपरा धरला. नंतर त्यांनीं सबंध शालजोडी वर ओढली आणि तिच्या-वरील राख झटकून ती पूर्वीं होती त्या स्थितींत राजापुढें टाकली.

आपणच दिलेली ती शालजोडी पाहून गुरूच्या सामर्थ्याची महा-राजांना खात्री पटली आणि गुरूबद्दल मनांत विकल्प आणल्याबद्दल त्यांना फार वाईट वाटलें. गुरूची क्षमा मागून महाराज म्हैसूरला परतले.

अप्पय्या दीक्षितांनीं आपल्या हयातींत अनेक लोकोत्तर चमत्कार केले. आजहि तुम्ही त्या भागांत गेलांत तरी त्या चमत्कारांच्या गोष्टी तुमच्या कानीं येतील. अप्पय्या दीक्षितांची वरील त्रोटक हकीगत सांगण्याचें कारणहि तसेंच आहे. त्यांच्या घराण्यांत जन्म पावलेले सिद्ध पुरुष व्यंकटशास्त्री द्रवीड हे माझ्या वडील बंधूंचे गुरु होत. व्यंकटशास्त्री हे अप्पय्या दीक्षितांपासून पांचव्या पिढींतील पुरुष. ते जगदंबेचे महान् उपासक होते आणि त्या उपासनेच्या बळावर त्यांनाहि अनेक सिद्धि प्राप्त झाल्या होत्या. माझ्या वडील बंधूंनीं त्यांचा उपदेश घेतला होता. त्यालाहि तसेंच कारण घडलें.

त्या वेळीं पुण्यांत अनेक मोठमोठ्या लोकांनीं व्यंकटशास्त्रींचा उपदेश घेतला होता. रास्ता पेठेंत रहाणारे रास्ते, विष्णुपंत रानडे कॉन्ट्रॅक्टर ही मंडळी त्यांची शिष्य बनली होती. या मंडळींना केव्हांहि पैशाची अडचण पडली कीं, तें शास्त्रीबुवांकडे जात आणि आपलें गाऱ्हाणें त्यांच्यापुढें मांडीत. " अमक्या दिवशीं तुमच्या हातीं पैसा येईल आणि तुमची अडचण निवारण होईल " असें शास्त्रीबुवा त्यांना बिनतोड सांगत. त्यांच्या अडचणी निवारण झालेल्या माझ्या बंधूंनीं समक्ष पाहिलेल्या होत्या. माझे वडील बंधु कै. गंगाधर महादेव ऊर्फ तात्यासाहेब खेर हे १८९० सालीं पुण्यास न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक होते. एल्‌एल्. बी.च्या टर्म्स भरण्यासाठीं मुंबईला जाण्याचा त्यांचा विचार होता. त्यासाठीं शाळाखात्याचे डायरेक्टर चॅटफिल्डसाहेब यांच्याकडे त्यांनीं नोकरीसाठीं अर्ज केला होता. मुंबई येथील एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें मास्तर म्हणून नेमणूक व्हावी अशी त्यांनीं त्या अर्जांत विनंती केली होती. डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपॉल सेल्बी व फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. वामनराव आपटे यांचीं उत्कृष्ट शिफारसपत्रेंहि त्या अर्जासोबत जोडलीं होतीं.

परंतु बरेच दिवस त्या अर्जाचें उत्तरच आलें नाहीं म्हणून एक दिवस त्यांनीं शास्त्रीबुवांच्याकडे जाण्याचें ठरविलें. घरीं जाऊन त्यांनीं शास्त्रीबुवांना विचारलें, " अद्याप माझ्या अर्जाचें उत्तर कां आलें नाहीं ? "

शास्त्रीबुवांनीं सांगितलें, " मुंबईच्या शाळेंत तुला जागा देण्याचें साहेबांनीं निश्चित केलें आहे, पण अजून तुला पगार किती द्यावा हें ठरलें नाहीं. परंतु बरोबर आठव्या दिवशीं तुझ्या नेमणुकीच्या हुकमावर साहेबांची सही होईल आणि इतरांपेक्षां तुझी जास्त पगारावर नेमणूक होईल. "

आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे शास्त्रीबुवांनीं सांगितलेल्या दिवशींच माझ्या बंधूंच्या नेमणूक-हुकमावर चॅटफिल्डसाहेबांची सही झाली आणि एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें त्यांची नेमणूक झाली. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे त्या कामीं बी. ए. झालेल्या माणसाची नेमणूक प्रथम ४५ रुपयांवर होत असे व एम्. ए.ची नेमणूक ६० रुपयांवर होत असे. माझे बंधु त्या वेळीं बी. ए.च होते; परंतु सेल्बी व आपटे यांच्या शिफारशींप्रमाणें माझ्या बंधूंची नेमणूक ६० रुपये पगारावर झाली. या नेमणुकीविरुद्ध खात्यांतील कांहीं माणसांनीं तक्रारी केल्या, पण त्यांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. माझ्या बंधूंची नेमणूक कायम झाली. शास्त्रीबुवांचें सांगणें अशा तऱ्हेनें अगदीं बिनतोड ठरलें होतें.

त्या सुमारास माझ्या बंधूंनीं शास्त्रीबुवांकडून उपदेश घेतला व त्यांच्याकडून शंकराची उपासना मिळविली. अखेरपर्यंत त्यांनीं ती उपासना कधीं सोडली नाहीं. दांडगे उपासक म्हणून त्यांचीहि ख्याति होती. त्या उपासनेचे अनेक अनुभव त्यांच्या गांठीशीं बांधलेले होते.

माझे बंधु न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक असतांना पानसे या नांवाचे एक गृहस्थ त्याच शाळेंत पर्शियन भाषेचे शिक्षक होते त्यांनाहि शास्त्रीबुवांच्या उपासनासिद्धीची चांगलीच प्रचीति आलेली होती. त्यांच्या बहिणीचा नवरा कांहीं संकटांत सांपडल्यामुळें पानसे यांनीं एका सावकारा-

कडून १२०० रुपये काढून ते आपल्या मेव्हण्यास दिले होते. ती रक्कम दोन महिन्यांनीं श्री. पानसे यांना द्यावयाची होती. रक्कम परत आली म्हणजे ती सावकाराला परत करावयाची असा त्यांचा बेत होता. दोन महिने झाले, चार महिने झाले, पण मेव्हणा रक्कम परत देण्याचें बोलेना. इकडे सावकाराचा तगादा लागलेला. अशा पेचांत पानसे पडले होते. पानसे हे स्वतः संपूर्ण नास्तिक होते. देवाधर्मावर किंवा साधुसंतांवर त्यांची कसलीहि श्रद्धा नव्हती. माझे बंधु भाविक तर पानसे नास्तिक. तरी पण ते एकमेकांचे परम स्नेही होते. पानसे यांनीं वरील हकीगत माझ्या बंधूंना एकदां सहज सांगितली. त्यावर बंधु त्यांना म्हणाले, " तुम्ही माझ्याबरोबर आमच्या गुरूकडे चला. ते तुम्हांला अडचणीमधून बाहेर पडण्याचा मार्ग सुचवतील."

पानसे यांनीं विचारलें, " त्यांना कांहीं पैसे द्यावे लागतील कां ? "

" तुम्हीं कांहीं दिलें तरी ते घेणार नाहींत. " या माझ्या बंधूंच्या बोलण्यावर पानसे म्हणाले, " असें असेल तर तुम्ही सांगाल त्या दिवशीं मी तुमच्याबरोबर येतों, पण माझा मात्र या लोकांवर बिलकुल विश्वास नाहीं. "

यावर बंधु म्हणाले, " आमच्या गुरूपाशीं तुमच्या विश्वासाचा प्रश्न मुळींच उपस्थित होत नाहीं. "

शास्त्रीबुवा आठवड्यांतुन फक्त मंगळवारीं आणि शुक्रवारीं पृच्छकांच्या प्रश्नास उत्तरें देत असत. एका मंगळवारीं पानसे यांना बरोबर घेऊन माझे बंधु शास्त्रीबुवांकडे गेले व पानसे यांची हकीगत त्यांच्या कानावर घातली.

ती हकीगत ऐकल्यानंतर शास्त्रीबुवा पांच मिनिटें डोळे मिटून स्तब्ध बसले. डोळे उघडल्यावर ते पानसे यांना म्हणाले, ' तुम्हांला ७०० रुपये मिळण्याची व्यवस्था झालेली आहे. तुमचे मेव्हणे येत्या शुक्रवारीं ७०० रुपये आणून देतील. "

यावर पानसे यांनीं विचारलें, " बाकीचे रुपये केव्हां मिळतील ? "

शास्त्रीबुवा म्हणाले, " प्रथम ७०० रुपये तुमच्या हातांत पडले म्हणजे बाकीच्या रकमेबद्दल सांगूं. "

शास्त्रीबुवांनीं सांगितल्याप्रमाणें रुपये येतात किंवा काय याची पानसे आतुरतेनें वाट पहात बसले. मंगळवारपासून शुक्रवारपर्यंतचे दिवस केव्हां निघून जातात असें त्यांना होऊन गेले.

अखेरीस शुक्रवारचा दिवस उजाडला. सकाळीं आठ साडेआठ वाजतां पानसे यांच्या बहिणीचा सासरा त्यांच्याकडे आला आणि त्यांनीं ७०० रुपये पानसे यांच्या हवालीं केले. शास्त्रीबुवांची वाणी खरी ठरली. शास्त्रीबुवांच्या अंगीं कांहीं अलौकिक सामर्थ्य असलें पाहिजे असें पानसे यांना वाटूं लागलें. नंतर पुन्हां उरलेल्या रकमेबद्दल पानसे यांनीं शास्त्रीबुवांना प्रश्न केला तेव्हां तोहि दिवस शास्त्रीबुवांनीं सांगितला; आणि त्यांनीं सांगितल्याप्रमाणें बरोबर नेमलेल्या दिवशीं पानसे यांची राहिलेली रकम परत आली.

या प्रसंगानें पानसे यांचा शास्त्रीबुवांविषयींचा आदर परमावधीचा वाढला. एवढेंच नव्हे तर पानसे प्रथम नास्तिक होते ते पूर्ण ईश्वरवादी बनले. पुढें त्यांच्या ठिकाणीं आस्तिक्यबुद्धि निर्माण झाली. शास्त्रीबुवांकडून त्यांनीं उपासना घेतली आणि त्यांच्या उपदेशाप्रमाणें रोज ते इष्टदेवतेच्या गुरूपदिष्ट मंत्राचा जप करूं लागले.

मी शास्त्रीबुवांना नेहमीं पहात असे. त्यांची गौरवर्ण, सतेज, रुबाबदार मूर्ति माझ्यासमोर आजहि उभी रहाते. तुम्हांला सांगितलें तर आश्चर्य वाटेल, पण त्यांची उंची जवळ जवळ सात फूट होती. असा उंचापुरा पुरुष मीं आयुष्यांत कधींहि पाहिला नाहीं. ते देवीचे महान् उपासक असल्यामुळें त्यांच्या भालप्रदेशावर मोठा कुंकुमतिलक असे. डोक्याला मोठें पागोटें, अंगावर एक साधें उपरणें, अंगांत बाराबंदी अंगरखा आणि पायांत पुणेरी

जोडा आणि मस्तकावर तो कुंकुमतिलक अशी त्यांची मूर्ति आजहि पुण्यांत वावरत आहे असा भास मला कित्येक वेळां होतो.

वर सांगितलेले चमत्कार मीं स्वतः डोळ्यांनीं पाहिलेले आहेत. सन १८९१ सालीं माझे बंधु एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें शिक्षक म्हणून गेले व मी सहावी इयत्ता संपवून न्यू इंग्लिश स्कूलमधून १८९२ सालीं मॅट्रिकसाठीं मुंबईस एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें जाऊन दाखल झालों. आम्हां उभयतां बंधूंचा पुण्याचा संबंध संपला आणि आम्ही मुंबईकर बनलों. आम्ही मुंबईला असतांना पुढें दोनतीन वर्षांतच व्यंकटशास्त्री द्रवीड हे स्वर्गस्थ झाल्याचें समजलें. त्या दिवशीं आम्ही दोघेहि बंधू अस्वस्थ झालों.

* * *

आतां कांहीं योगी पुरुषांच्या गोष्टी सांगतों त्याहि मोठ्या ऐकण्यासारख्या आहेत. योगबळावर अनेक सिद्धि प्राप्त करून घेऊन या मंडळींनीं अनेक चमत्कार केले. अर्थात् त्यांचें सारें जीवन उजेडांत आलें नाहीं. किंबहुना त्यांचें सारें जीवन झांकाळलेलें होतें. मानवी वस्तीपासून दूर अंतरावर रानावनांत अनेक सुगंधी सुमनें फुलतात, वाऱ्यावाटे त्यांचा सुगंध त्या परिसरांत दरवळतो. पण त्या सुगंधाचा आस्वाद घेण्यास त्या ठिकाणीं मानवी वस्तीच नसते. तीं सुमनें एकाकीं फुलतात तशींच तीं अज्ञातांत कोमेजून जातात. अशाच प्रकारचें या सर्व योगी पुरुषांचें जीवन होतें. त्यांचें मूळ ठिकाण कोणाला फारसें कधीं कळलें नाहीं. अज्ञातांतून ज्ञात अवस्थेंत ते आले. तेवढ्यापुरताच त्यांच्या जीवनावर प्रकाश पडला आणि तेवढ्यापुरतेंच जगाला त्यांचें दर्शन घडलें.

आतां, चिलवडी येथील हाच अवलिया योगी पहा. या महान् योग्याची कथा मला कर्जत येथील त्या वेळचे हेडमास्तर श्री. संभाजीनाना सागडे यांनीं स्वतः सांगितली. नगर जिल्ह्यांतील कर्जत तालुक्यांत राशीन या नांवाचें एक गांव आहे. तेथून चार-पांच मैल अंतरावर चिलवडी या

नांवाचें एक खेडें आहे. राशीन आणि चिलवडी या दोन गांवांच्या मध्यभागीं एका झोंपडींत एक अवलिया रहात असे. आपल्या झोंपडींतून तो कधीं बाहेर जात नसे. झोंपडीच्यासमोर एक मोठें पटांगण होतें. त्या पटांगणांत गायी, बैल, उंदीर, मांजरें, कुत्रीं वगैरे बऱ्याच प्रकारचीं जनावरें व प्राणी होते. हे सर्व प्राणी म्हणजे त्या अवलियाचा परिवार होता अशी लोकांची समजूत होती. त्या रस्त्यावरून जो जाई तो या अवलिया बाबांना उद्देशून हांका मारी, " काय बुवासाहेब ! काय चाललें आहे ? "

त्यावर त्या अवलियानें उत्तर द्यावें, "आदाब."

त्याच्या झोपडींत एक चूल होती. तिच्यावर नेहमीं एक भांडें असे. चुलींत फक्त दोनच लांकडें एकावर एक तिरपी ठेवलेलीं असत. बुवांना कोणीं 'काय चाललें आहे' म्हणून विचारलें तर " रसई पकावत है " असें ते उत्तर देत; पण चुलींतील लांकडें पेटलेलीं आहेत किंवा चुलींत विस्तव आहे असें कोणाला कधीं दिसलें नाहीं; किंवा बुवांना कधीं जेवतांना किंवा खातांना कोणी बघितलें नाहीं. मधूनच कोणीतरी त्यांच्याकडे जावें आणि म्हणावें, " बुवा भूक लागली आहे. "

यावर बुवा त्याला कोपऱ्यांत असलेल्या मडक्यांच्या उतरंडींतील एखाद्या मडक्यांत हात घालायला सांगत. त्यानें हात घातला म्हणजे त्याला त्या ठिकाणीं पेढे, बर्फी, शेंगादाणे, मुरमुरे, फुटाणे, यांपैकीं कांहीं तरी जिन्नस हमखास मिळे आणि त्याची भूक भागे. हे जिन्नस बुवांच्या झोंपडींत कसे आले हें कोणाला कधीं कळलें नाहीं; आणि आपल्या झोंपडींतून भीक मागायला किंवा हे पदार्थ आणायला बुवा कधीं बाहेर पडले आहेत असेंहि कोणाला कधीं दिसलें नाहीं. त्यांनीं झोंपडी तर कधींच सोडली नाहीं. पण कोणापासून कधीं कांहीं स्वीकारलें नाहीं. झोंपडींत मडक्यांची उतरंड लावलेली असे, पण तीं मडकीं सदैव रिकामींच असत. असें असतांना तेथें जाणाऱ्या प्रत्येक माणसाला त्या मडक्यांत हात घातला कीं, त्याला

हवा असलेला पदार्थ मिळे. बुवांच्या झोंपडींत जाऊन अशा अनेक पदार्थांचा समाचार घेतलेली अनेक मंडळी त्या वेळीं मला माहीत होती.

उन्हाळ्याचे दिवस होते. उन्हाचा ताप अनावर होत होता. अशा उन्हांत एके दिवशीं दुपारीं दोन वाजण्याच्या सुमारास एक वाटसरू बुवांच्या झोंपडीवर आला आणि पिण्यासाठीं पाण्याची चौकशी करूं लागला. झोंपडींत पाणी नव्हतें. झोंपडी माळरानांत एका उंचवट्यावर होती. त्या तहानेलेल्या माणसाकडे बुवांनीं बघितलें आणि म्हटलें, "झोंपडी-बाहेर जमीन खण म्हणजे तुला पाणी मिळेल!"

प्रथम त्या माणसाला थट्टाच वाटली; पण बुवांनीं पुन्हां सांगितल्या-वरून त्या माणसानें बाहेर येऊन थोडा खोल खड्डा खणला; आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या खड्ड्यांत एका बाजूच्या झऱ्यावाटे स्वच्छ पाणी वर येऊं लागलें. त्या तहानेलेल्या माणसानें मनसोक्त पाणी पिऊन आपली तहान भागविली आणि बुवांना धन्यवाद दिले. इतक्या उंचीच्या जागेंत जमिनीच्या पृष्ठभागापासून फक्त एक हात खोलीवर पाणी लागतें या गोष्टीचें त्या वाटसरूला मोठें नवल वाटलें. पोटभर पाणी पिऊन तो वाटसरू आपल्या वाटेनें आश्चर्य करीत निघून गेला. ही आश्चर्यकारक हकीगत त्या वेळीं आमच्या कर्जत गांवापर्यंत येऊन पोहोंचली होती.

झोंपडीसमोरील पटांगणांत जीं जनावरें होतीं त्या प्रत्येकाला बुवांनीं नांव दिलें होतें. बुवांनीं एखादें नांव घेऊन हांक मारली कीं, नेमकें तेंच जनावर त्यांच्यापुढें येऊन उभें रहात असे. कधीं कधीं उंदीर व मांजरें एकत्र येत व तीं एकमेकांबरोबर खेळूं लागत, पण एखाद्या मांजरानें कधीं एखाद्या उंदराला दगा दिला आहे असें कधीं घडलें नाहीं. बुवांच्या सहवासांत तीं जनावरें आपलें जन्मजात वैर पार विसरून गेलीं होतीं.

या साऱ्या हकीगती संभाजीनाना सागडे यांनीं स्वतः मला सांगित-लेल्या होत्या. चिलवडी हें त्यांचें कुलकर्णी वतनाचें गांव. त्यामुळें

कर्जतला जरी त्यांची हेडमास्तर म्हणून नेमणूक झाली होती तरी चिलवडी येथें त्यांचें जाणें-येणें असें. एकदां त्यांनीं स्वतःची हकीगत मला सांगितली ती येथें मुद्दाम नमूद करावीशी वाटते. एके दिवशीं रात्रीं ते चिलवडीहून पलीकडे राशीनला जाण्यासाठीं निघाले. ते निघाल्यावर थोड्याच वेळांत वादळ झालें. विजांचा चमचमाट व मेघांचा गडगडाट सुरू झाला आणि तुफान पाऊस कोसळूं लागला. रानांतून आणि रस्त्यांतून पाणीच पाणी झालें. संभाजीनाना कसेबसे बुवांच्या झोंपडीजवळ आले आणि त्यांनीं 'बुवासाहेब' म्हणून हांक मारली.

बुवा नेहमींच्या पद्धतीनें "आदाब" म्हणाले आणि नानांना पाहून आश्चर्यानें उद्गारले, "नाना, ये क्या बाहर:निकालनेका बखत? अब इतनी रात करकें कहांसे आये? जाते हैं किधर?"

यावर नानांनीं सांगितलें, "चिलवडीहून निघालों. थोडी वाट चालून आलों तर एकदम वादळ झालें आणि पाऊस कोसळला. जमिनी-वर पाणीच पाणी झालें. वाट दिसेना. कसाबसा येथें येऊन पोहोंचलों."

बुवा म्हणालें, "अच्छा! आब के साथ राशीनतक हमारे आदमी देतां हूं. उनके साथ आब राशीनकू जा सकते."

असें म्हणून बुवांनीं नांवें घेऊन दोघाजणांना हांका मारल्या. तेव्हां त्यांच्यासमोर दोन दांडगे बैल येऊन उभे राहिले. त्यांना उद्देशून बुवा म्हणाले, "नानाके साथ तुम राशिनतक जाव."

हें ऐकून त्या दोन दांडग्या बैलांनीं राशीनकडे आपली तोंडें वळविलीं. नाना मध्यें आणि दोन बैल दोन बाजूंना. हे दोन बैल राशीनच्या वेशीपर्यंत गेले. राशीनची वेस आली. बैल तेथें थांबले आणि नाना वेशीच्या आंत गेले. नाना आपला मार्ग चालूं लागलेले पाहून बैल पुन्हां परतले.

ज्या दिवशीं सकाळीं या अवलिया बुवाला मृत्यु आला त्या दिवशीं त्याच्या झोंपडीसमोर पटांगणांत असलेलीं सर्व जनावरें माना खालीं घालून अश्रु ढाळीत बसलेलीं दिसलीं. बुवा गेल्याची वार्ता वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. लगेच गांवोगांवचे लोक गोळा झाले आणि त्यांच्या पार्थिव देहाला त्यांनीं पृथ्वीच्या पोटांत नेऊन विसांवले. त्यावर कबर बांधली आणि दुःखित अंतःकरणानें सारे लोक घरोघरीं परतले. मग त्या ठिकाणीं त्या अवलियाचीं जनावरेंच फक्त शिल्लक उरलीं. त्यांच्या माना खालींच होत्या आणि त्यांचे अश्रु जमिनीवर सांडत होते. त्यांचा वाली निघून गेला होता आणि तीं जनावरें आतां बेवारशीं बनलीं होतीं. मग गांवच्या कुळकर्ण्यानें त्या बेवारशीं जनावरांसंबंधीं कर्जतचे मामले-दारसाहेब यांच्याकडे रिपोर्ट केला. तीं सारीं बेवारशीं जनावरें लिलांवा-साठीं तालुक्याच्या गांवांत घेऊन येण्याविषयीं मामलेदारसाहेबांनीं पाटील व कुलकर्णी यांना हुकूम सोडला; परंतु त्या जनावरांपैकीं एकहि जनावर हातीं लागलें नाहीं. सर्व जनावरें तेथून रात्रीं कोणीकडे गेलीं त्याचा कोणालाहि पत्ता लागला नाहीं. मामलेदार स्वतः चिलवडी या गांवीं आले आणि त्यांनीं स्वतः चौकशी केली, पण एकहि जनावर सांपडलें नाहीं. एवढेंच नव्हे तर त्या पुढेंहि त्या जनावरांचा ठावठिकाणा कोणाला कधीं लागला नाहीं. त्या अवलियाच्या झोंपडीसमोर असणारीं जनावरें हा जणूं भास होता. खरोखर त्या महान् योगीपुरुषाची ती माया होती का ? मला तरी हा प्रश्न कधीं सुटला नाहीं.

* * *

नगर जिल्ह्यांत श्रीगोंदें या नांवाचा तालुका आहे. त्या ठिकाणच्या शेख महंमद या नांवाच्या योग्याची हकीगत मोठी मनोरंजक आहे. हे योगी मुसलमान होते, पण त्यांची उपासना मात्र श्रीगजाननाची होती. चिंचवडचे मोरया गोसावी, जयरामस्वामी वडगांवकर व शेख महंमद हे

समकालीन होते. शेख महंमद यांचे गुरु ब्राह्मण होते व त्यांनींच त्यांना गजाननाची उपासना दिली. शेख महंमद यांनीं 'योगसंग्राम' या नांवाचा वेदान्तावर एक ग्रंथ लिहिला असून तो प्रसिद्धहि झाला आहे.

शेख महंमद यांनीं गुरूंच्या सांगण्याप्रमाणें श्रीगजाननाची मनोभावे उपासना केली. गजाननाचें दर्शन व्हावें म्हणून ते एकवीस दिवस एका शिळेवर ध्यानस्थ बसले होते. त्या एकवीस दिवसांत त्यांनीं अन्नाचा एकहि कण वा पाण्याचा एकहि थेंब ग्रहण केला नाहीं. बरोबर एकोणिसाव्या दिवशीं एक मोठा वाघ डरकाळी फोडीत त्यांच्यापुढें आला. ते त्या वाघाकडे बघून म्हणाले, " मला या स्वरूपांत तुझें दर्शन नको. तूं येथून खुशाल चालता हो. "

वाघ मुकाट्यानें चालता झाला. विसाव्या दिवशीं एक मोठा नाग फूत्कार टाकीत त्यांच्यासमोर मोठी फणा काढून डोलूं लागला. त्यालाहि उद्देशून शेख महंमद म्हणाले, " तूं आज दुसरें सोंग आणलेंस होय ? मला तुझी गरज नाहीं. तूं खुशाल येथून चालता हो. "

नाग निघून गेला. एकविसाव्या दिवशीं श्रीगजाननांनीं त्यांना प्रत्यक्ष दर्शन दिलें व नंतरच शेख महंमद त्या शिळेवरून उठले.

सिद्धावस्था प्राप्त झाल्यावर शेख महंमद कीर्तनें करीत. एका कीर्तनांत त्यांचें भाषण चालू असतांना कीर्तनाचा विषय सोडून एकदम ते " अरेरे ! " असें मोठ्यानें ओरडले आणि त्यांनीं आपले दोन्ही पंजे एकमेकांवर चोळले. कीर्तनाला जमलेल्या मंडळींनीं काय झालें म्हणून विचारलें तेव्हां शेख महंमद म्हणाले, " वडगांवांत जयरामस्वामी मंडपांत कीर्तन करीत आहेत. कीर्तन ऐन रंगांत आलेलें आहे. तें ऐकण्यांत लोक गढून गेलेले आहेत. इतक्यांत मंडपाला आग लागली. कोणाचें तिकडे लक्ष गेलें नाहीं. म्हणून मी तेथें जाऊन हातांनीं आग विझवली. "

असें म्हणून आपले हात जमलेल्या मंडळींना त्यांनीं दाखविले. त्यांचे हात अगदीं काळे झालेले होते.

या प्रकाराचें आश्चर्य वाटून कुतूहल असलेल्या कांहीं मंडळींनी वडगांवाहून माहिती मिळविली. तेव्हां नक्की त्याच वेळीं जयरामस्वामींचें कीर्तन चालू असतांना मंडपाला आग लागली होती व ती आपोआप विझली अशी हकीगत त्यांना कळली. या प्रकारानें सारीच मंडळी अगदीं आश्चर्यचकित होऊन गेली.

एकदां एका अंमलदारानें शेख महंमद यांना वेठीला धरलें. त्यांच्या डोक्यावर एक पेटी देऊन त्यांना त्या अंमलदाराच्या शिपायानें आपल्या बरोबर चालविलें होतें. चालतां चालतां ती पेटी त्यांच्या डोक्यावर सुमारें एक हात उंचीवरून आपोआप चालूं लागली. शेख महंमद खालून चालले आहेत आणि त्यांच्या डोक्यावर आधांतरी पेटी चालली आहे. हा चमत्कार पाहून त्या अंमलदाराला वाटलें कीं, हा कोणी मोठा अवलिया असला पाहिजे. मग शेख महंमद यांना वेठीला धरल्याबद्दल त्या अंमलदाराला पश्चात्ताप वाटूं लागला. तो त्यांच्या पायां पडला व त्यानें त्यांची माफी मागितली.

शेख महंमद एकदां चिंचवड येथें मोरया गोसावी यांच्या भेटीसाठीं गेले होते. त्यांच्या घराच्या दारांत जाऊन 'भिक्षा वाढा' असा त्यांनीं पुकारा केला. देवडीवाल्यानें मूठभर पीठ त्यांच्या कटोऱ्यांत घातलें. शेख महंमद म्हणाले, "कटोरा भरून पीठ वाढ."

देवडीवाला आंत गेला व ओंजळी भरभरून त्यानें पीठ वाढलें, पण कटोरा कांहीं केल्या भरेना. इतक्यांत घरांतून एक मुलगी आली व तिनें मूठभर पीठ वाढल्याबरोबर कटोरा भरून पीठ बाहेर उतूं जाऊं लागलें. हा चमत्कार देवडीवाल्यानें पाहिला. आपण इतकें पीठ वाढलें पण कटोरा कांहीं भरला नाहीं व मुलीनें पिठाची लहान मूठ घातल्यावर

कटोरा भरून सांडूं लागला. या चमत्काराचा देवडीवाल्याला विस्मय वाटला. तो तडक आंत मोरया गोसावी यांच्याकडे गेला व झालेल्या प्रकाराची वर्दी त्यानें त्यांना दिली. त्या वेळीं मोरया गोसावी पूजा करीत होते. पण तो प्रकार ऐकून ते पूजेंतून उठले व त्या फकिराला भेटण्यासाठीं बाहेर आले. फकीर या वेळेपर्यंत बराच लांब गेला होता. मोरया गोसावी सोवळ्यानेंच त्याच्या मागें गेले व शेख महंमद यांना त्यांनीं गांठलें. मोरया गोसावी यांनीं विचारलें, " तुम्ही केव्हां आलांत ? "

शेख महंमद म्हणाले, " तुम्ही गणपतील माळ घालीत असतां तिचा गुंता झाला. तो गुंता काढण्यांत तुम्ही गुंतला असतां मी तुमच्या दाराशीं उभा होतों. "

खरोखरच त्या वेळीं मोरया गोसावी हे मानसपूजेंत गुंतले होते. मनःकल्पित पुष्पहार ते गणपतीच्या गळ्यांत घालणार इतक्यांत त्याचा थोडा गुंता झाला म्हणून मोरया गोसावी तो गुंता सोडवीत होते. त्यांचा हा सर्व प्रकार मानसपूजेच्या वेळीं मनांतल्या मनांतच चालला होता. या गोष्टीचा दाखला शेख महंमद यांनीं मोरया गोसावी यांना दिला. अर्थात् मोरया गोसावी यांना अंतरींची खूण पटली. शेख महंमद यांचा अधिकार ते जाणून होते. अशा तऱ्हेनें या दोन संतांच्या भेटीचा तो अपूर्व योग घडून आला. मोरया गोसावी यांनीं त्यांना जेवायला ठेवून घेतलें. जेवण झाल्यावर त्या उभयतांच्या गप्पागोष्टी चांगल्याच रंगल्या. मग शेख महंमद पुन्हां आपल्या गांवीं जाण्यास निघाले.

शेख महंमद यांचा 'योगसंग्राम' हा ग्रंथ मराठी भाषेंत आहे. ते मुसलमान असून मराठी भाषेवर त्यांचें प्रभुत्व किती होतें ही गोष्ट तो ग्रंथ वाचल्यास कोणासहि कळून येईल. त्यांनीं एका अभंगांत म्हटलें आहे, " आम्ही जातीचे ब्राह्मण । आमुचे सोयरे मुसलमान ॥ " अशा या मुसलमान संताची कबर श्रीगोंदें येथें आजहि उभी असल्याचें दिसतें. त्या

कबरीवर अभिषेक करून व फात्या मारून हिंदु व मुसलमान मोठ्या श्रद्धेनें त्या कबरीला आपली मानवंदना आजहि देत असतात.

* * *

याच श्रीगोंदें गांवाचा हा ममद्या वेडा. हाहि योगी व ज्ञानी होता. पण लोक त्याला ' ममद्या वेडा ' म्हणत. सुमारें पासष्ट वर्षांपूर्वी श्रीगोंद्याला या ममद्याला भीक मागतांना अनेकांनीं बघितलें असेल. पारमार्थिक दृष्टीनें त्याचा दर्जा उंचावलेला होता या गोष्टीची कोणाला यत्किंचितहि कल्पना नव्हती. त्याची वृत्ति अत्यंत शांत व समाधानी होती. त्यानें कोणाला कधीं उपद्रव दिला नाहीं किंवा त्यालाहि कोणीं कधीं उपद्रव दिला नाहीं.

श्रीगोंद्याचे बाळाबुवा अग्निहोत्री एकदां अक्कलकोट स्वामींच्या दर्शनास गेले. त्यांनीं स्वामी महाराजांना नमस्कार करतांच स्वामी बाळाबुवांना म्हणाले, " तूं येथें कशाला आलास ? तुझ्या गांवच्या ममद्याकडे जा आणि त्याला नमस्कार कर. "

बाळाबुवा आगगाडींतून परत यावयास निघाले आणि श्रीगोंद्यापासून चार मैल असलेल्या पिंपरी या गांवीं उतरले. स्टेशनांतून बाहेर पडतांच ममद्या त्यांच्यासमोर दत्त म्हणून उभा राहिला. ममद्यानें त्यांना विचारलें, " स्वामींचें दर्शन झालें ना ? "

बाळाबुवांनीं त्याला सांगितलें, ' स्वामींचें दर्शन झालें पण त्यांनीं तुझ्याकडे जायला सांगितलें. ' हें ऐकून ममद्या नुसता हंसला. बाळाबुवा टांग्यांतून श्रीगोंद्याकडे जाण्यास निघाले. त्यांचा टांगा सर्वांत पुढें होता. तो गांवांत अगोदर पोहोंचला. बाळाबुवा टांग्यांतून उतरले, परंतु पुन्हां गांवांतहि ममद्या त्यांच्यापुढें उभा ! तो प्रकार पाहून बाळाबुवांना चमत्कार वाटला व ते त्याच्या पायां पडले. तेव्हांपासून ममद्या हा वेडा तर नाहींच पण तो एक अंतर्ज्ञानी सत्पुरुष आहे अशी त्यांची खात्री झाली. ही हकीगत खुद्द बाळाबुवांनीं मला सांगितलेली आहे.

आतां दोन महान् भक्तांच्या कथा सांगतों. त्या गोष्टीला सुमारें पंचाहत्तर वर्षें होऊन गेलीं असतील. नाशिक येथील डि. कोर्टांत येवल्याचे देशपांडे हे दरमहा दीडशें रुपये पगारावर शिरस्तेदार होते. त्यांना एकुलता एक मुलगा होता. शिरस्तेदारसाहेब व त्यांच्या पत्नी यांची परमेश्वरावर दृढ श्रद्धा असे. त्यांच्या मुलाला सुद्धां लहानपणापासून दत्ताची भक्ति जडली. रोज ताजीं फुलें आणून दत्ताची पूजा करावी असा त्याचा नित्य क्रम असे. मराठी शिक्षण पुरें झाल्यावर त्याच्या वडिलांनीं पुणें येथें त्याला इंग्रजी शिकण्याकरितां ठेवलें. तेथें त्याची पूजा चालूच होती. आपल्या मुलानें चैनींत रहावें आणि शिकून चांगलें तयार व्हावें अशी वडिलांची इच्छा होती म्हणून त्याच्या खर्चाकरितां ते दरमहा पंचवीस रुपये त्याला पाठवीत असत. त्याच्याबरोबर असलेल्या विद्यार्थ्यांत कांहीं विद्यार्थी वार लावून जेवीत, तर कांहीं मधुकरी मागून आपला उदारनिर्वाह करीत. शिरस्तेदारांच्या मुलाला या गरीब विद्यार्थ्यांची ती गरीबीची स्थिति पाहून अनुकंपा येत असे व आपण बेताबाताचा खर्च करून बाकी राहिलेल्या पैशांची तो मुलगा अशा होतकरू गरीब विद्यार्थ्यांना मदत करीत असे. असा क्रम चालू असतांना शिरस्तेदारांचा मुलगा केशव याच्या मनांत आलें कीं, इतर गरीब विद्यार्थी जसे मधुकरी मागतात तसे आपण कां करूं नये ! तो मनाशीं म्हणाला, " मी मधुकरी मागितली तर माझे हे खाणावळीचे पैसे वांचतील आणि त्या पैशाचा गरीब विद्यार्थ्यांना उपयोग होईल. "

मग केशवनें मधुकरी मागण्यास सुरुवात केली. या वेळीं तो मॅट्रिकच्या वर्गांत गेला होता. आपला मुलगा मधुकरी मागतो ही गोष्ट वडिलांना समजली. ते म्हणाले, " केशवा, तूं काय मधुकरी मागत असतोस ? "

मुलानें होय म्हटल्यावर त्यांनीं पुन्हां विचारलें, " मग खाणावळीच्या पैशाचें काय करतोस ? "

मुलानें उत्तर दिलें, "गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना देऊन टाकतो."

कालांतरानें आपल्या मुलाचें लग्न करावें असें वडील व मातोश्रींच्या मनांत होतें, पण केशवानें त्यांना सांगितलें, "माझें मन कोठेंच लागत नाहीं. म्हणून मी कांहीं दिवस कोठें तरी क्षेत्रांत जाऊन रहाण्याचा विचार केला आहे. लग्न करून संसारांत पडण्याची माझी इच्छा नाहीं."

अशा रीतीनें हे केशवबुवा सर्वसंगपरित्याग करून घरांतून निसटले ते कायमचेच निसटले आणि अखंड तीर्थयात्रा करूं लागले. यात्रा करीत असतांना एकदां यात्रा-मार्गावर ब्रह्मेन्द्रस्वामींची व त्यांची गांठ पडली. केशवबुवांनीं त्यांचा उपदेश घेतला. हे ब्रह्मेन्द्रस्वामी म्हणजे ग्वाल्हेर संस्थानचे अधिपति श्रीजयाजीराव शिंदे यांचे गुरु. सुमारें बहात्तर वर्षांपूर्वी हे ब्रह्मेन्द्रस्वामी पुणें येथील रास्ता पेठेंत एका मंदिरांत श्रीदत्तमूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यास पुण्यास आले होते. माझ्या वडिलांच्या निमंत्रणावरून ते त्या वेळीं आमच्याकडे जेवायला आले होते. त्या वेळीं त्यांचें वय एकशेंपंधरा वर्षांचें होतें असें त्यांनीं सांगितल्याचें मला स्मरतें. त्या वेळीं त्यांच्या मुद्रेवरची दिव्यकांति पाहून आम्हां सर्वांनाच आश्चर्य वाटलें होतें. याच ब्रह्मेन्द्र-स्वामींच्याबरोबर केशवबुवांनीं अनंत ठिकाणीं यात्रा केली. त्यांच्याबरोबर ते सतरा वेळेला काशीला गेले. पाठीला नेहमीं गुरुचरित्राची पोथी बांधून केशवबुवा हिमालयांत वावरले आणि त्यांनीं मानससरोवरहि गांठलें. हिमालयांत संचार करीत असतांना त्यांना किमयेची माहिती झाली आणि वेळप्रसंगीं त्यांनीं त्या विद्येचा परोपकारार्थ उपयोगहि केला.

केशवबुवा कोणापासून कांहींहि घेत नसत. पण पंधरा-तीन वार झाले कीं, ही स्वारी लंगोटी नेसून डोंगरांत जात असे आणि तेथें भट्टी लावून आठ-दहा तोळे सोनें बनवून ते परत येत. आपल्या शिष्यांजवळ तें सोनें देऊन केशवबुवा त्यांना सांगत कीं, हें सोनें विकून जी काय रक्कम येईल त्यांतून जितकीं माणसें जेवायला घालतां येतील तितकी घाला. शिष्यवर्गानें त्या

सोन्याची विक्री करून जी रक्कम येईल तिचा माल खरेदी करावा आणि हजार-बाराशें लोकांना उत्कृष्ट जेवण द्यावें, असा क्रम महिना-पंधरा दिवसांनीं चालू असायचा. आपल्या आयुष्यांत त्यांनीं हजारों लोकांना अन्नदान केलें; पण तें केवळ या किमयेच्या बळांवर.

आमच्या घरीं केशवबुवा नेहमीं येत असत. त्यांचा मुक्काम आमच्याच घरीं असे. या किमयेसंबंधीं बोलतांना ते एकदां मला म्हणाले, “ हें सोनें तयार करण्यासाठीं आम्हीं ‘चंद्रवल्ली’ या नांवाची वनस्पति वापरतो. हिमालयांत ही वनस्पति भरपूर सांपडतें. ही वनस्पति इकडे फारशी आढळत नाहीं. मीं स्वतः श्रीशैल्य पर्वतावर तिची लागवड केलेली आहे. या वनस्पतीपासून सोनें तयार करण्याची कला मी तुला सांगेन.”

परंतु अशा किमयेचा उपयोग केला असतां वंशखंडन होतें अशी माझी पूर्वापार दृढ समजूत असल्यानें मी त्या विद्येच्या वाटेला गेलों नाहीं आणि त्या वल्लरीपासून सोनें तयार करण्याचा हव्यास कधीं धरला नाहीं. केशवबुवा घरीं आले म्हणजे तो विषय निघे आणि ते दृष्टीआड झाले म्हणजे तो विषयहि दृष्टीआड होई.

एका वांटपाच्या दाव्यांत केशवबुवांना बारा हजार रुपये मिळाले. त्या रकमेंतून त्यांनीं येवलें येथें दत्तमंदिर बांधून देवाची पूजा-अर्चा, नैवेद्य वगैरेची कायमची व्यवस्था लावून दिली; आणि त्यानंतर हा बैरागी पुनः तीर्थयात्रेला निघाला. त्यांचा हा तीर्थयात्रा-संचार चालू असतांनाच सुमारें साठ वर्षांपूर्वी केशवबुवांनीं आपला देह श्रीदत्तचरणीं अर्पण केला.

* * *

देव मामलेदार या नांवानें प्रसिद्ध असलेले सत्पुरुष हे महान् भगवत्भक्त होते. त्यांना लोक नेहमीं यशवंतराव महाराज म्हणत. त्यांच्यावर ईश्वराची पूर्ण कृपा होती. सत्यवाणी हें त्यांचें ब्रीद असें. कसलाहि प्रसंग

गुदरला तरी ते खोटें म्हणून बोलले नाहींत. सत्यव्रतपरिपालनाचें फळ त्यांना मिळालेलें होतें. ते बोलत तें खरें होत असें. एवढें मोठे मामलेदार पण अतिथींचा अनादर त्यांनीं कधींहि केला नाहीं. उलट अतिथींचा सत्कार करणें हें आपलें कर्तव्य आहे असें ते मानीत. या त्यांच्या स्वभावा-मुळें त्यांच्याकडे नेहमीं साधुसंत, बैरागी, यात्रेकरू यांची रीघ लागलेली असे. त्या साऱ्यांची जेवण्याखाण्याची सोय ते करीत असत.

एकदां देव मामलेदार यांच्याजवळ पैसा नव्हता. कोणाकडून तावडतोब उसनी रक्कम मिळण्यासारखीहि नव्हती; आणि अशा वेळीं बैराग्यांचा भला मोठा तांडा त्यांच्या घरीं मुक्कामाला आला. त्या बैराग्यांना जेवण्यावांचून विन्मुख धाडावयाचें नाहीं हा देव मामलेदारांचा निर्धार होता. तेव्हां अगदीं नाईलाज होऊन त्यांनीं आपल्या फडणीसाला सांगितलें, " मी सरकारी खजिन्यांतून तूर्त पांचशें रुपये घेतों. पैसे हातीं आल्याबरोबर खजिन्यांत त्या रकमेचा भरणा करीन. "

फडणीस म्हणाले, " रावसाहेब, ही गोष्ट जर वरिष्ठांना कळली तर माझ्यावर खटला होऊन माझी नोकरी जाईल. "

यावर मामलेदार म्हणाले, " तुम्ही त्याची काळजी करूं नका. अगदीं निर्धास्त रहा. "

असें म्हणून मामलेदारांनीं खजिन्यांतून पांचशें रुपये काढले आणि बैराग्यांना जेवण घातलें. इकडे फडणीसांनीं झालेल्या हकीगतीचा कलेक्टर-साहेबांना 'रिपोर्ट' केला. कलेक्टरसाहेब तांतडीनें तालुक्यांत आले व त्यांनीं फडणीसांना बोलावून खजिना तपासला; आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, खजिना अगदीं बरोबर भरला.

खोटा रिपोर्ट केल्याबद्दल कलेक्टरांनीं फडणीसांना जाब विचारला. तेव्हां ते म्हणाले, " साहेब, मीं खोटा रिपोर्ट केला नाहीं. जी हकीगत

घडली तीच मीं आपणास कळविली. आपण वाटल्यास मामलेदार-साहेबांना विचारा."

कलेक्टरसाहेब मग देव मामलेदारसाहेबांच्या घरीं गेले व मामलेदारांना त्यांनीं विचारलें, "फडणीसांनीं आमच्याकडे रिपोर्ट धाडला आहे कीं, तुम्हीं खजिन्यांतून पांचशें रुपये घेतले आणि बैराग्यांना जेवण घातलें ही गोष्ट खरी आहे का ?"

मामलेदार म्हणाले, "होय, फडणीसांचा रिपोर्ट खरा आहे."

कलेक्टरसाहेबांनीं पुन्हां विचारलें, "मग तुम्ही खजिन्यांत पांचशें रुपये भरले का ?"

मामलेदार म्हणाले, "अजून भरले नाहींत, पण रुपयांची तजवीज झाली म्हणजे भरणार आहे."

हें ऐकून कलेक्टरसाहेब तर आश्चर्यानें थक्कच झाले. मामलेदार म्हणतात कीं, रुपये घेतले व ते खजिन्यांत भरले नाहींत; आणि खजिना मोजला तर तो बरोबर भरला. त्यांत पांचशें रुपये कमी आले नाहींत ! हा काय चमत्कार आहे याचा कोणासच उलगडा होईना. ही रक्कम खजिन्यांत कोणी भरली व केव्हां भरली या गोष्टीचा पत्ता कोणासच लागला नाहीं. मंगळवेढ्याच्या दामाजींची ज्यानें रक्कम भरली त्यानेंच देव मामलेदारांसाठीं हे पांचशें रुपये भरले, असें जो तो म्हणूं लागला. पांडुरंगच मामलेदारांचा पाठीराखा बनला.

रावसाहेब हे नाशिक जिल्ह्यांत सटाणें या तालुक्याला मामलेदार होते त्या वेळीं मध्यभागाचे कमिशनरसाहेब तेथें मामलेदार कचेरीच्या तपासणीस आले. त्या वेळीं कमिशनरसाहेबांचा घोडा आजारी झाला आणि मरणाच्या पंथाला लागला. त्यानें खाणें-पिणें वर्ज्य केलें. घोड्याचा जो मोतद्दार होता त्याला कोणीं सांगितलें कीं, देव मामलेदारांचा अंगारा घोड्याला लावला असतांना घोडा तावडतोब बरा होईल. मोतद्दार

मामलेदारांकडे आला. घोडा अत्यवस्थ असल्याचें त्यांना सांगितलें व त्यांना अंगारा मागितला. मामलेदारांनीं त्याला राख आणून दिली आणि घोड्याच्या अंगाला ही लाव म्हणून सांगितलें. मोतद्दारानें घोडयाच्या अंगाला ती राख लावतांक्षणींच तो घोडा अंग झाडून उठला व गवत खाऊं लागला. त्याचें सर्व दुखणें पार नाहींसें झालें. जणूं काय घोडयाला कसलाहि आजार झालेला नव्हता. मोतद्दारानें ही सर्व हकीगत कमिशनर-साहेबांना सांगितली. कमिशनरसाहेबांनीं देव मामलेदारांना लगेच बोलावून घेतले, घोडा बरा केल्याबद्दल त्यांचे आभार मानले आणि त्यांना विचारलें, " मी तुमच्याकरितां काय करूं ? "

मामलेदार म्हणाले, " साहेब, लोक कोंडवाडयांत जनावरें घालतात त्यामुळें मुक्या जनावरांचे हाल होतात, तरी कोंडवाडयाचा कायदा तेवढा रद्द करण्याची खटपट करा. "

यावर साहेब म्हणाले, " मला कायदा रद्द करतां येणार नाहीं, पण तुम्ही ज्या तालुक्याला मामलेदार म्हणून काम कराल त्या तालुक्यांत तुम्ही असाल तोंपर्यंत त्या कायद्याची अम्मलबजावणी करण्याची माफी मिळेल अशी व्यवस्था मी सरकारतर्फे करूं शकेन. "

त्याप्रमाणें साहेबांनीं सरकारकडून खरोखरच मंजुरी आणविली आणि देव मामलेदार ज्या वेळीं ज्या तालुक्याला काम करीत असतील त्या तालुक्याला कोंडवाड्याची माफी झाली होती.

देव मामलेदार सेवानिवृत्त झाल्यावर एकदां पुण्याला आले होते. त्या वेळीं आम्ही तांबड्या जोगेश्वरीच्या बोळांत पुराणिकांच्याच वाड्यांत रहात होतों. देव मामलेदार आमच्यासमोर गोडबोल्यांच्या वाड्यांत उतरले होते. त्यांच्या दर्शनासाठीं माणसांची एकसारखी रीघ लागलेली असे. त्या वेळीं आमच्यासमोर एक चमत्कार घडला तो सांगण्यासारखा आहे. एका श्रीमंत बाईनें तिला मुलगा झाल्यावर देव मामलेदारांना नथ

अर्पण करण्याचा नवस केला होता. त्या बाईला नवसाप्रमाणें मुलगा झाला होता. तो मुलगा देव मामलेदारांच्या पायांवर घालून त्या बाईनें त्यांना आपली नथ अर्पण केली. ही गोष्ट जेव्हां तिच्या नवऱ्याला समजली तेव्हां तो आपल्या बायकोवर मनस्वी रागावला व तडक मामलेदारांकडे येऊन त्यांना म्हणाला, " तुम्ही भोंदू आहांत. लोकांच्या बायकांना नादीं लावून त्यांच्या नथा तुम्ही उपटतां ! "

मामलेदारांनीं त्या गृहस्थाला विचारलें, " तुम्ही आमच्यावर कां रागावलांत ? मीं तुमचा कोणता अपराध केला आहे तें तर सांगा ! "

त्या गृहस्थानें सांगितलें, " तुम्ही आमच्या बायकोची नथ घेतली असें मला समजलें आहे. "

यावर मामलेदार पुन्हां म्हणाले, " मी तुमची नथ कशाला घेऊं ? मला त्या नथीबद्दल कांहींच माहिती नाहीं. "

हें बोलणें चाललें असतां एका माणसानें देव मामलेदारांच्यापुढें नारळ ठेवून त्यांना नमस्कार केला तेव्हां त्यांनीं त्या माणसाला नारळ फोडण्यास सांगितलें. त्यानें नारळ फोडला त्याबरोबर एक नथ त्या नारळांतून बाहेर पडली.

ती नथ पाहून देव मामलेदार त्या बाजूला बसलेल्या गृहस्थांकडे पाहून म्हणाले, " काय हो, हीच का तुमची नथ ? ही जर आपली नथ असेल:तर ती:नथ घेऊन जा. "

त्या गृहस्थानें आपली नथ ओळखली, पण ती नारळांतून कशी निघाली हें मात्र त्याला कळेना. तो चमत्कार पाहून तो अगदीं थक्क होऊन गेला. काय बोलावें तें त्याला उमजेना. शेवटीं त्यानें देव मामलेदारांची क्षमा मागितली व त्या नथीला हात न लावतां तो गृहस्थ आल्या पावलीं निघून गेला. देव मामलेदारांचा हा चमत्कार त्या वेळीं पुण्यांत अनेक लोकांच्या तोंडीं झाला होता.

जेव्हां देव मामलेदारांचे अखेरचे दिवस आले तेव्हां ते आपल्या पत्नीला म्हणाले, " आम्ही आतां लवकरच जाणार. तुमचा काय बेत आहे ? आमच्याबरोबर तुम्हांला यायचें असेल तर तुम्हांला पुन्हां जन्म घ्यावा लागेल आणि आमच्यामागें एक वर्ष थांबणार असाल तर तुम्ही मुक्त व्हाल ! "

थोडा वेळ थांबून ते पुन्हां म्हणाले, " मला वाटतें मी गेल्यावर तुम्ही एक वर्ष काढावें हें बरें. "

देव मामलेदार मार्गशीर्ष वद्य एकादशीला इहलोक सोडून गेले. नाशिक येथें त्यांनीं आपला देह ठेवला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे बरोबर एक वर्षानें त्यांच्या पत्नीनें या जगांतून निर्याण केलें. पतीनें सांगितल्याप्रमाणें अर्थात् त्यांना मुक्ति मिळालीच असली पाहिजे.

* * *

विठोबाअण्णा कऱ्हाडकर या सत्पुरुषाची हकीगत पासष्ट वर्षांपूर्वी मी वडिलांच्या तोंडून ऐकली ती जशीच्या तशी देत आहें.

विठोबाअण्णा यांचा शिष्यपरिवार फार मोठा होता. आपले पांच-पन्नास शिष्य बरोबर घेऊन ते एकदां कोंकणांत जाण्यासाठीं निघाले. सर्वांचा पायींच प्रवास चालला होता. ही सर्व मंडळी सह्याद्रीच्या घाटांत आली असतां एका पट्ट्या वाघानें गगनभेदी अशी आरोळी ठोकली. ती ऐकून बरोबरच्या शिष्यगणांची घाबरगुंडी वळली. प्रत्येकजण दिसेल त्या झाडावर चढून उंच फांदीवर जाऊन बसला. विठोबाअण्णा खालींच एका मोठ्या दगडावर मांडी ठोकून बसले. इतक्यांत तो पट्ट्या वाघ त्यांच्या जवळच थोड्या अंतरावर दिसला. वाघ चालतांना लंगडत होता. विठोबा-अण्णा त्याला उद्देशून म्हणाले, " बाबारे, इकडे ये पाहूं. "

वाघानें जणूं हे शब्द ऐकून आपला मोर्चा विठोबाअण्णांच्या बाजूला वळविला व थोड्याच वेळांत त्यांच्याजवळ येऊन तो माणसाळलेल्या

जनावराप्रमाणें स्तब्ध उभा राहिला. वाघ त्यांच्याजवळ आलेला पाहून शिष्यांना वाटलें कीं, आपल्या गुरुमहाराजांची आजच पुण्यतिथि होणार. अण्णा वाघाशीं बोलूं लागले, " बाबा, पायांत कांटा मोडला होय ! तुझा पाय दे पाहूं इकडे. "

असें म्हणून अण्णांनीं आपला हात पुढें केला. वाघानें आपला पाय उचलून त्यांच्या हातांत दिला. अण्णांनीं तो नीट तपासून पाहिला. हा प्रकार इतका संथपणानें चालला होता कीं, जणूं काय एखादा वैद्य रोगाचें निदान करण्यासाठीं आपल्याकडे आलेल्या रोग्याची अगदीं शांतपणानें नाडी पाहून तपासणी करीत आहे ! वाघाच्या पायांत कांटा मोडल्याचें ठिकाण अण्णांना सांपडलें. त्यांनीं आपल्या बटव्यांतून सुई, चिमटा, चिम्बा वगैरे सामान बाहेर काढलें वाघाच्या पायांत जेथें कांटा मोडला होता ती जागा अण्णा सुईनें टोकरूं लागले. पाय दुखला कीं, वाघानें मोठी आरोळी ठोकावी आणि आपला पाय अण्णांच्या हातांतून ओढून घ्यावा असा प्रकार चार-पांच वेळां घडला. अखेरीस. कांट्याच्या आसपासची जागा अण्णांनीं टोकरून मोकळी केली आणि कांटा चिमट्यांत सापडतांक्षणींच अण्णांनीं तो कांटा उपसून बाहेर काढला.

कांटा निघाल्यानंतर वाघ जाऊं लागला. अण्णा त्याला म्हणाले, " थांब थोडा, बाबा. "

तें ऐकून वाघ त्यांच्याजवळ येऊन अगदीं स्वस्थ बसला. अण्णांनीं आपल्याजवळ असलेल्या चकमकीनें विस्तव पाडून एक रानगोवरी पेटविली. बिब्ब्याचें तेल कांटा टोंचलेल्या जागेवर लावून गोवरीच्या विस्तवानें त्या जागेवर तीन-चारदां चटके दिले. प्रत्येक चटक्याच्या वेळीं वाघ मोठ्यानें आरोळी ठोकी. शेवटीं वाघाच्या पाठीवर थोपटून अण्णा त्याला उद्देशून म्हणाले, " जा बरं बाबा आतां, तुझा पाय बरा होईल. "

नंतर वाघोबा जाऊं लागले. मागें-पुढें पहात पहात दहा-बारा पावलें चालून गेल्यावर त्या वाघानें एक आरोळी ठोकली आणि भराभर उड्या टाकीत तो त्या घनदाट जंगलांत दृष्टीआड झाला. हा सर्व प्रकार पहात असतांना सर्व शिष्यांच्या जिवांत जीव नव्हता. कारण आपल्या गुरूंची महति त्यांना कळलेली नव्हती. चित्तांत हिंसावृत्ति केव्हांहि उत्पन्न न होणें ही अहिंसेची प्रतिष्ठा होय. ही वृत्ति ज्या योग्याच्या, भक्ताच्या किंवा उपासकाच्या चित्तांत उत्पन्न झाली असेल त्याच्या सान्निध्यांत जे जे येतील त्यांच्या चित्तांतील वैराचा निरास होतो, अशा अर्थाचें 'पातंजलयोगदर्शनां'तील सूत्र त्या शिष्यांच्या गांवींहि नव्हतें.

विठोबाअण्णा हे खऱ्या अर्थानें अहिंसाप्रतिष्ठेचें एक ढळढळीत उदाहरण होतें. म्हणून वाघाच्या चित्तांतील नैसर्गिक हिंसाप्रवृत्ति ते नाहींशी करूं शकले.

* * *

जे साधुसंत मला स्वतःला माहीत होते किंवा ज्यांच्याविषयींची विश्वसनीय माहिती मला मिळाली होती ती मीं या पुस्तकांत नमूद केली आहे. ज्या हकीगती सांगितल्या त्यांच्यापेक्षां अद्याप अशा किती तरी हकीगती माझ्या संग्रहीं शिल्लक आहेत; पण केव्हां तरी आणि कोठें तरी माणसानें थांबलेंच पाहिजे — मी येथें थांबतों एवढेंच !

परिशिष्ट

## मांत्रिकांचे कांहीं चमत्कार

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

कर्म, भक्ति व ज्ञान यांच्या बळावर मनुष्याला ज्या सिद्धि मिळतात त्या त्याच्या आत्मिक बळावर मिळत असतात. परंतु शाबरी मंत्रांच्या सामर्थ्यावर मनुष्य कांहीं सिद्धि मिळवितो याविषयीं मला जी विश्वसनीय माहिती मिळाली आहे, ती येथें देत आहें. यांपैकीं कांहीं चमत्कार तर मीं स्वतः पाहिलेले आहेत. हे मांत्रिक शाबरी मंत्र सिद्ध करून घेऊन त्याच्या जोरावर जारण, मारण व उच्चाटण इत्यादि प्रयोग करीत असतात.

सुमारें ७५ वर्षांपूर्वींची गोष्ट. त्या वेळीं माझे वडील पुणें येथें कलेक्टर कचेरींत कारकून होते. एके दिवशीं दक्षिण हैदराबाद येथील काशीरावबाबा या नांवाचे एक मांत्रिक पुण्यास आले होते. त्यांचे मंत्रशक्तीचे प्रयोग त्या रात्रीं व्हावयाचे होते आणि माझ्या वडिलांना ते प्रयोग पहाण्यासाठीं निमंत्रण आलें होतें.

रात्रीं लवकर जेवण करून वडील ते प्रयोग पहाण्यासाठीं गेले. तेथें मंडळींची बरीच गर्दी जमलेली होती.

काशीरावबाबांनीं प्रयोगांना प्रारंभ केला. त्यांनीं आपल्या अंगावर एक मोठें धोतर पांघरून घेतलें. त्या धोतरानें त्यांनीं आपल्या मांड्या आणि पायहि झांकून घेतले. मग जमलेल्या मंडळींना ते म्हणाले, " प्रथम येथें जमलेल्या मंडळींसाठीं पानसुपारीचा बेत करूं. "

सारी मंडळी उत्सुकतेनें त्यांचें बोलणें ऐकत होती व ते आतां काय करणार इकडे लक्षपूर्वक पहात होती.

इतक्यांत त्यांच्या अंगावरील धोतराच्या आंत त्यांच्या पायापुढें सुमारें एक हात उंचीचा पदार्थ निर्माण झाल्याचें लोकांना दिसलें.

इतक्यांत जवळच बसलेल्या एका गृहस्थाला त्यांनीं धोतराच्या आंतील जिन्नस काढून घेण्यास सांगितलें. त्या गृहस्थानें तो जिन्नस बाहेर काढला. ती एक करंडी होती आणि तिच्यांत दोन-अडीच हजार उत्कृष्ट पिकलेलीं पानें व्यवस्थित लावून ठेवलेलीं आढळलीं. नंतर काशीराव-बाबांनीं कात, चुना, फोडलेली सुपारी आणि सुवासिक जर्दा, वेलदोडे, लवंगा असे पदार्थ काढून दिले. मग त्यांनीं स्वतः जमलेल्या मंडळींना पानसुपारी वाटली. यांत सुमारें अर्धा तास निघून गेला.

पुढें काशीरावबाबांनीं सर्वांना सांगितलें, " कोणाला काय हवें असेल तें मला सांगा. मी तें काढून देतों. "

एक गृहस्थ म्हणाला, " आम्हांला आतां खिचडी खाण्याची इच्छा झाली आहे, तरी खिचडी आणून द्या. "

काशीरावांनीं सुमारें पांच मिनिटें डोळे मिटले. नंतर डोळे उघडून त्या गृहस्थाला ते म्हणाले, " या आणि खिचडीचें भांडें काढून घ्या. "

त्या गृहस्थानें काशीरावांच्या पांघरलेल्या धोतरांतून गरम खिच-डीचें भांडें काढून घेतलें. सर्व लोकांनीं तें पाहिल्यावर काशीराव म्हणाले, " तुम्हांला यांतील खिचडी खायची असेल तर खा; पण ती महाराच्या चुलीवरून आणली आहे. खायची नसेल तर तें भांडें मजजवळ द्या, मीं तें ज्याच्या घरांतून आणविलें आहे त्याच्या घरीं पोहोंचतें करतों. "

त्या गृहस्थानें तें भांडें काशीरावांच्या स्वाधीन केलें. त्यांनीं तें घेऊन त्याच्यावर धोतराचें आच्छादन घातलें. क्षणांत भांडें नाहींसें झालें.

नंतर एक गृहस्थ बाबांच्यापुढें येऊन म्हणाला, " माझें एक महत्त्वाचें पत्र रात्रींच्या गाडीनें यावयाचें आहे. तें आलें असल्यास मला तें उद्यां पोस्टांतून मिळेल. पण तें येथील पोस्ट ऑफिसांत आलें आहे किंवा नाहीं तें समजलें तर बरें होईल. "

बाबा किंचित् विचार करून म्हणाले, " तुमचें पत्र आलें आहे. तुम्हांला आतां पहाण्यासाठीं हवें आहे का तें ? "

तो गृहस्थ उद्गारला, " मिळालें तर बरें होईल. "

असें म्हणतांच बाबांनीं आपल्या पांघरुणांतून त्याचें पत्र काढून दिलें. त्याच्यावर पोस्टाचा शिक्का नव्हता. त्या गृहस्थाची पत्राबद्दल खात्री झाल्यावर बाबांनीं तें मागून घेतलें आणि " पोस्टाचा शिक्का मारण्यासाठीं तें पत्र परत करतों " असें त्याला सांगितलें. त्यांनीं तें पत्र आपल्या पांघरुणांत घेतलें आणि पत्र पोस्टांत गेल्याचें सांगितलें.

अशा प्रकारचे नानाविध प्रयोग दाखवून काशीरावांनीं मंडळींना आश्चर्यचकित करून सोडलें.

परंतु त्यांनीं जो अखेरचा प्रयोग केला त्यानें मात्र सर्वजण नुसते आश्चर्यानें थक्क झाले इतकेंच नव्हे तर ते भयभीतहि झाले.

प्रयोग पहाणाऱ्या प्रेक्षकांत पुण्याचे हुजूर ट्रेझरी ऑफिसर हजर होते. सरकारी खजिना त्यांच्या ताब्यांत होता. त्या खजिन्यांत दोन कुलपांच्या आंत बरीच मोठी रक्कम कायम ठेवलेली होती. दोन हजार रुपयांचा एक याप्रमाणें चाळीस हजार रुपयांचें वीस तोडे तेथें होते.

बाबांनीं ट्रेझरी ऑफिसरला विचारलें, " तुमच्या खजिन्यांतून रुपयांचे तोडे आणूं का ? "

ट्रेझरी ऑफिसरला ही केवळ थट्टा वाटली. तो मनाशीं म्हणाला, " आमचा सरकारी खजिना. त्यांतून चाळीस हजार रुपयांचे तोडे दोन कुलपांच्या आंत बंदोबस्तांत आहेत. दोन हजार रुपयांचा तोडा खजिन्याच्या गजांतून बाहेर पडणें अशक्य आहे. अशा स्थितींत बाबा काय तोडे आणतात ? "

तोडे आणणें ही अशक्य कोटींतील गोष्ट समजून ट्रेझरी ऑफिसर उघडपणानें त्यांना म्हणाला, " बाबा तुम्ही काय माझी थट्टा करतां का ? "

यावर बाबा म्हणाले, " मला थट्टा करून काय करायचें आहे ? तुम्ही म्हणत असाल तर सांगाल तितके रुपयांचे तोडे तुमच्या समोर आणून ठेवतों. "

" ही गोष्ट खरी कां ? " या ऑफिसरच्या प्रश्नावर बाबा पुन्हां म्हणाले, " परवानगी द्या म्हणजे खरें किंवा खोटें काय तें कळेल. "

" आणाच तर मग सगळे तोडे ! "

असें त्यांनीं म्हटल्यावर बाबा त्यांना उद्देशून म्हणाले, " बसा समोर आणि घ्या एक एक तोडा ओढून. "

असें म्हणून त्यांनीं पांघरलेल्या धोतराखालून रुपयांचा एक एक तोडा ओढून घेण्यास सांगितलें. आणि आश्चर्य असें कीं, रुपयांचे सीलबंद वीस तोडे बाबांनीं प्रेक्षकांपुढें ठेवले.

हा प्रकार पाहून ट्रेझरी ऑफिसर अत्यंत घाबरला. आपली नोकरी कशी बचावते याची त्याला काळजी लागली. ही गोष्ट वरिष्ठ अधिकाऱ्यांना समजली तर त्याचे परिणाम काय होणार याची त्याला धास्ती वाटूं लागली. रुपयांचे तोडे आणा म्हणून बाबांना सांगितल्याबद्दल त्याला पश्चात्ताप झाला. पण आतां त्याचा काय उपयोग होता ?

बाबांनीं वीस तोड्यांपैकीं एक तोडा फोडला आणि त्यांतील दोन हजार रुपये जमलेल्या लोकांना वाटून दिले; आणि बाबा त्यांना म्हणाले, " उद्यां सकाळीं हे रुपये माझ्यापाशीं आणून द्या म्हणजे मी ते सरकारी खजिन्यांत धाडून देईन. नाहीं तर खजीनदार रावसाहेब यांच्यावर पैसे खाल्ल्याबद्दल खटला होऊन त्यांना तुरुंगांत जावें लागेल. "

त्या माणसांनीं घरीं जाऊन रुपये जपून ठेवले होते. खजीनदारांचा जीव तर टांगला होता. काय करावें हेंच त्यांना समजेना.

बाबांनीं केलेले हे सारे प्रयोग पाहून प्रेक्षकांना अत्यंत आश्चर्य वाटलें; आणि ते आपापल्या घरीं निघून गेले.

बाबांनीं ज्यांना रुपये दिले होते ते सकाळीं पाहूं लागले तेव्हां ठेवलेल्या ठिकाणीं एकहि रुपया त्यांना दिसला नाहीं.

खजीनदार सकाळीं घाईघाईनें खजिन्यांत गेले. खजिना उघडला आणि पहातात तों चाळीस हजार रुपयांचे वीस सीलबंद तोडे दोन कुलपांच्या आंत जसेच्या तसे ठेवलेले त्यांना आढळून आले. तेव्हां खजीनदारांच्या जिवांत जीव आला; आणि त्यांना काशीरावबाबा यांच्या अचाट सामर्थ्याची खात्री पटली.

हें सामर्थ्य मात्र शाबरी मंत्रांच्या योगानें बाबांच्या अंगीं आलें होतें हें विसरून चालणार नाहीं. शाबरी मंत्रांच्या सिद्धि गौण मानल्या जातात. कर्ममार्ग, उपासनामार्ग, भक्तिमार्ग इत्यादि जे मोक्षाचे उपाय श्रीमद्भगवद्गीतेंत सांगितले आहेत, त्या मार्गांनीं ज्या सिद्धि प्राप्त होतात त्यांची योग्यता अर्थात् फार मोठी आहे.

* * *

नगरपासून सुमारें दोन मैलांवर भिंगार या नांवाचें एक गांव आहे. तेथें सुमारें सत्तर वर्षांपूर्वी एक जागल्या रहात होता. त्याला विंचवाचा एक विलक्षण मंत्र येत होता. गांवांत विंचू उतरण्याच्या कामीं त्याची ख्याति होती. कोणाला विंचू चावला कीं दुसऱ्या कोणीहि माणसानें त्या जागल्याला जाऊन सांगावें. जागल्यानें आलेल्या माणसाला म्हणावें कीं, " अरे त्याला नाहीं चावला विंचू. तो तुला चावला. "

असें म्हणतांच, ज्याला खरोखर विंचू चावला असेल त्याचा विंचू उतरत असे आणि त्याच्या वेदना पार नाहींशा होत व सांगायला आलेल्या माणसाच्या अंगांत तीव्र आणि असह्य वेदना सुरू होत. नंतर त्या जागल्यानें म्हणावें, " अरे, तुला नाहीं विंचू चावला, या दगडाच्या पायरीला चावला. "

असें म्हणतांक्षणींच त्याच्या अंगांतील वेदना नाहींशी होऊन दगडाच्या पायरीचा एक पैशाएवढा कळपा उडत असे.

भिंगारला आमचे एक स्नेही मुलींच्या शाळेंत शिक्षक होते. त्यांनीं हा विंचवाचा मंत्र मिळविण्यासाठीं त्या जागल्याला पटेल तें केलें पण त्यानें तो मंत्र त्यांनाच काय पण कोणालाहि सांगितला नाहीं. अखेरीस तो जागल्या मेला, तेव्हां ती मंत्रविद्याहि त्याच्याबरोबरच गेली.

* * *

मी स्वतः पाहिलेली आणि अनुभविलेली एक गोष्ट सांगतों. एकदां मी मुंबईहून दौंड स्टेशनवर आलों. मला नगरच्या गाडीनें जावयाचें होतें; परंतु गाडीला तीन तास अवकाश होता. दौंडच्या दवाखान्यांतील डॉक्टर श्री. सायलू सायन्ना पेंटा हे माझे स्नेही होते म्हणून मी त्यांच्याशीं गप्पा मारीत बसलों होतों. सकाळीं ८ वाजण्याची वेळ होती. इतक्यांत स्टेशनमध्यें मोठा आरडाओरडा उठला. कित्येक माणसें धांवत जातांना दिसली. काय भानगड आहे म्हणून मीहि स्टेशनांत गेलों. तेथें एक मोठा नाग दगडांच्या राशींत गेल्याचें समजलें. स्टेशनवरीलच एक माणूस म्हणाला, “ आपल्या मेहतरला जलदी घेऊन या. ”

थोड्या वेळांत मेहतर तेथें आला. तेथें जमलेल्या मंडळींत त्यानें विचारलें, “ नाग कोठें आहे ? ”

त्यांनीं सांगितलें, “ तो या दगडांच्या राशींत गेला आहे ! ”

मेहतर त्या दगडापाशीं गेला आणि नागाला उद्देशून म्हणाला, “ फत्तर के अंदर कायकू रहिते, बाहर आव. ”

मेहतरानें हें म्हणण्याचा अवकाश. इतक्यांत नागानें दगडांतून आपलें तोंड बाहेर काढलें आणि तो मेहतराजवळ आला. नाग माणसाच्या दंडाएवढा जाड व जवळ जवळ सहा फूट लांब होता.

नाग बाहेर आल्यावर मेहेतरानें त्याला धरलें आणि आपल्या हाताच्या कोपराभोंवतीं त्याला गुंडाळून तो चालूं लागला. स्टेशनांतून गांवांत जाण्यासाठीं पूल आहे. मेहतर त्या नागाला घेऊन त्या पुलावरून जाऊन खालीं उतरला, आणि तेथून थोडें अंतर चालून गेल्यावर त्यानें वाळू घेतली आणि जमिनीवर चार बाजूंना टाकून तेथें त्या नागाला त्यानें ठेवून दिलें, आणि मेहेतर तेथून निघून गेला. नाग पुढें काय करतो हें पाहाण्यासाठीं आम्ही कांहीं लोक त्या पुलाच्या आसपास अर्धा-पाऊण तास उभे राहिलों. आमच्यासमोर नाग इकडे तिकडे त्या रंगणांत फिरत होता. पण मेहतरानें रंगणाच्या बाहेर वाळू टाकल्यामुळें नाग त्या वाळूच्या रेषेजवळ गेला कीं एकदम दचकून मागें फिरत असे. अशा रीतीनें तो नाग रंगणाच्या आंत अडकून पडलेला होता. त्याला कोण-त्याहि बाजूनें बाहेर जातां येईना. तो चमत्कार पाहून मी थक्क झालों. पुढें माझी गाडीची वेळ जवळ आल्यानें मी तेथून स्टेशनांत परत आलों. मेहतर मोठा मांत्रिक आणि जादूगार आहे असें मला तेथें समजलें.

एकदां मी आगगाडींतून मुंबईला चाललों होतों. दौंड स्टेशनवर तोच मेहतर आमच्या डब्यांत येऊन आमच्या शेजारीं येऊन बसला. मीं त्याला विचारलें, " तुम्ही मेहतर ना ? "

तो म्हणाला, " तुम्हीं मला कसें ओळखलें ? "

थोड्या दिवसांपूर्वीं मीं पाहिलेली नागाची हकीगत त्याला सांगितली. त्यावरून ओळख पटली. मीं त्याला विचारलें, " तुम्ही एवढ्या मोठ्या नागाला हांक मारल्याबरोबर तो तुमच्याकडे कसा आला, तुम्ही न भितां त्याला एखाद्या दोरीसारखे गुंडाळून एका रंगणांत नेऊन त्या नागाला बंदिवासांत टाकलें, हें पाहून आम्हांला मोठा चमत्कार वाटला. पण तुम्ही हें सारें कसें करतां ? "

तो म्हणाला, " हें सर्व मी मंत्रांच्या सामर्थ्यावर करीत असतों. शिवाय टेबलासारखी निर्जीव वस्तु चालविणें, प्रेक्षक मागेल ते जिन्नस त्याला काढून देणें वगैरे प्रयोग मी मंत्रसामर्थ्यानें करीत असतो. "

मीं त्याला विचारलें, " आम्हांला एखादा चमत्कार दाखवाल काय ? "

त्यानें माझ्याकडून एक पैसा मागितला. मी खिशांतून पैसा काढला. त्यानें मला माझ्या सहीचीं आद्याक्षरें त्यावर घालण्यास सांगितलें. मीं चाकूच्या टोकानें पैशावर आद्याक्षरें घातलीं. नंतर त्यानें तो पैसा गाडीच्या बाहेर टाकण्यास सांगितलें. मी खिडकींतून बाहेर डोकावून तो पैसा जोरानें खालीं फेकला तो एका खडकावर आदळला. पैसा पडल्याचें ठिकाण मीं पाहिलें आणि पैशाचा आवाजहि ऐकला. पुन्हां मी आपल्या जागेवर येऊन बसलों. माझ्याजवळ एक इसम बसला होता. त्याला मेहतर म्हणाला, " भाऊसाहेबांचा पैसा तुम्ही घेतला असून तो तुमच्या टोपींत आहे. "

असें म्हणून मेहतरानें दोन्ही हातांनीं त्याच्या डोक्यावरील टोपी वर उचलली तेव्हां त्याच्या टोपींतून एक पैसा खालीं पडला. मेहतर मला म्हणाला, " भाऊसाहेब, पहा बरें हा पैसा तुमचाच आहे का ? "

मीं पैसा उचलून पाहिला. ज्या पैशावर मीं चाकूनें आद्याक्षरें कोरलीं होतीं व जो पैसा मीं गाडीच्या बाहेर फेकून दिला होता तोच पैसा मला परत मिळाला. आम्हांला या प्रयोगाचें फारच आश्चर्य वाटलें.

* * *

कांहीं वर्षांपूर्वी नगर येथेंहि असाच एक मांत्रिक आला होता. त्याचे प्रयोग पहाण्यासाठीं बरीच माणसें उपस्थित होतीं. प्रथम त्यानें पानें, सुपारी वगैरे अनेक पदार्थ काढले. नंतर त्यानें एक अतिशय विलक्षण प्रयोग केला. प्रथम त्यानें बसलेल्या मंडळींना सांगितलें, " तुमच्याजवळून एक मोठी विंचवांची मिरवणूक जाणार आहे तेव्हां त्यांना जाण्यासाठीं

एका भिंतीपासून दुसऱ्या भिंतीपर्यंत फक्त एक-दीड फूट रुंदीचा मार्ग मोकळा ठेवा. ”

मंडळींनीं थोडें मागें सरकून त्यानें सांगितल्याप्रमाणें मार्ग मोकळा करून ठेवला. नंतर मांत्रिक एका भिंतीकडे पाहून म्हणाला, “ तुमचा मार्ग मोकळा झाला आहे; आतां येऊं द्या तुमची मिरवणूक. ”

असें म्हणतांच त्या भिंतीच्या तळाशीं एक मातीचा कळपा उडाला आणि तेथें एक मोठें भोंक पडलें. त्यांतून विंचू येण्याला सुरुवात झाली. त्यांच्याकरितां मोकळ्या केलेल्या वाटेनें विंचू चालूं लागले. एकामागून एक असे विंचू त्या भोंकांतून निघूं लागले. त्यांची रांगच रांग लागली. समोरच्या भिंतीला एक भोंक होतें त्या भोंकांत हे विंचू शिरूं लागले. मंडळी विंचवांची रांग पाहून घाबरूं लागले. मांत्रिक म्हणाला, “ घाबरूं नका; तुम्हांला ते कांहीं करणार नाहींत. ”

सुमारें पांच मिनिटेंपर्यंत विंचवांची ही मिरवणूक चालली होती. त्या मिरवणुकींत एक इंचापासून सात-आठ इंच लांबीचे आणि पांढरे, तांबडे, काळे असे अनेक रंगांचे विंचू होते. मोठा विंचू फार तर दोन-अडीच इंच लांबीचा असतो, परंतु सात-आठ इंच लांबीचे विंचू मात्र कोणीं पाहिले नव्हते. सुमारें पांच मिनिटेंपर्यंत असंख्य विंचवांची ही मिरवणूक चालल्यावर मांत्रिक म्हणाला, “ आतां यांचे राजेसाहेब येतील. ”

असें म्हणतांच त्या बिळांतून एक मोठा पांढराशुभ्र विंचू बाहेर आला; आणि मागून दहा-पंधरा विंचू आले आणि हे सर्व विंचू समोरच्या भिंतींत असलेल्या बिळांत जाऊन नाहींसे झाले.

तो भयंकर देखावा पाहून जमलेल्या मंडळींत एक प्रकारची घबराट निर्माण झाली होती. अशा मनःस्थितींतच सर्वांनीं तो भयंकर देखावा पाहिला. ही मिरवणूक केव्हां संपते असें त्यांना झालें होतें.

IRBK-0108196
IRBK-0108196
म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा
क्र. ९६६ नों. दि.